साप्ताहिक २९ सप्टेंबर ८५ / दोन रुपये

# माणूस

## पुरुषोत्तम करंडक



## मोठ्या शहरांचा प्रश्न 'जनपौरे'

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : सतरा

२१ सप्टेंबर १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर
छायाचित्र : पुरुषोत्तम करडक मिळवलेल्या 'आसाचा फेरा' या एकांकिकेतील प्रसंगात – शुभदा शहा व गगनविहारी बोराटे

पुणे वार्ता

## नवे विक्रीकर विधेयक घरबांधणी महागणार

केंद्र अथवा राज्य सरकारे जेव्हा नवी विधेयके सभागृहापुढे माडतात आणि त्याद्वारे जेव्हा धोरणात्मक बदल घडवू पहातात तेव्हा त्याच्या दूरगामी परिणामाची चर्चा होणे आवश्यक असते समाजाला त्यामुळे होणाऱ्या फायद्या–तोटयाच्या संदर्भात मार्गदर्शन होणे आवश्यक असते.

४६ व्या घटना दुरुस्तीने राज्य सरकाराना विक्रीकराची व्याप्ती वाढविण्याचे अधिकार दिले. यात 'विक्री' या मूलभूत कल्पनेचा विस्तार राज्य सरकाराना करता आला व त्यानुसार काही नव्या व्यवहारांवर विक्रीकर आकारण्याचे महाराष्ट्र राज्य सरकारने ठरविले व त्या सदर्भात नुकतेच एक विधेयक मजूर करण्यात आले आहे या विधेयकाचा परिणाम दूरगामी व सर्वसाधारण नागरिकावर होणार आहे या विधेयकाचे स्वरूप व त्याच्या परिणामाविषयी चर्चा करण्यासाठी नुकत्याच दोन सभा पुण्यात आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक मराठा चेंबर ऑफ कॉमर्समध्ये दि १ सप्टेंबरला झाली तर दुसरी टिळक स्मारक मदिरात दि. ६ सप्टेंबरला.

या सभामधून श्री. सी टी दिघे, निवृत्त न्यायाधीश, श्री. मनोहर जोशी, श्री. शातिलाल शहा, श्री. एस्. जी. देसाई, श्री मोर्जे अशा पुण्या–मुबईतील विक्रीकराशी सबधित असलेल्या व्यक्तीची भाषणे झाली यातून पुढे आलेले या नव्या विधेयकाचे स्वरूप व त्याचे परिणाम असे आहेत–

### नव्या करांचे स्वरूप

विधी मडळात मजूर करण्यात आलेल्या विधेयकामुळे पुढील दोन व्यवहारावर नवे कर लागू होतील.

१) मालमत्ता किंवा वस्तू वापरण्याच्या हक्काचे हस्तातरण. ( मालमत्ता किंवा वस्तू वापरण्यासाठी भाडयाने देणे )

२) कत्राटी पद्धतीचे व्यवहार ( मजुरीच्या स्वरूपाची कामे )

यापैकी पहिल्या प्रकारात सहा घद्याचा समावेश करण्यात आला आहे त्यात प्रामुख्याने–

१) टी व्ही सेट्स, व्ही. डी. ओ उपकरणे, सिनेमा फिल्म्स व उपकरणे, कॅसेट रेकॉर्डर्स वगैरे

२) यत्र सामुग्री, ऑफिस साहित्य, कॉम्प्युटर्स, एअर कडीशनर्स व उपकरणे भाडयाने देणे.

३) ट्रक्स, ट्रॅक्टर, बसेस, विमाने, बोटी इ भाडयाने देणे.

या स्वरूपाच्या व्यवहारावर एका आर्थिक वर्षात रु. ५००००/– पेक्षा अधिक उलाढाल झाल्यास कर भरावा लागेल. यासाठी वेगळा नोंदणी क्रमाक घ्यावा लागेल या स्वरूपाच्या व्यवहारावर कराचे प्रमाण अद्याप निश्चित झाले नसले तरी कमाल १५ टक्के कर आकारण्याचा अधिकार राज्य सरकारकडे आहे.

दुसऱ्या स्वरूपाच्या व्यवहारामध्ये एकूण १७ धद्याचा समावेश केला आहे. त्यापैकी प्रमुख उद्योग असे–

१) इमारती, रस्ते, पूल याचे बाधकाम व त्याची दुरुस्ती.

२) खिडक्या, फ्रेम्स, ग्रील्स वगैरे बसविणे.

३) टाईल्स, स्लॅब वगैरे बसविणे.

४) पार्टिशन, फर्निचर, गृह सजावटीचे सामान बसविणे.

५) सॅनिटरी फिटिंग्ज व प्लंबिंग वगैरेची कामे.

६) जमिनीत पाईप लाईन्स टाकणे

७) एअर कडीशनचे साहित्य बसविणे

या स्वरूपाच्या व्यवहारावर एका आर्थिक वर्षात रु. पाच लाखापेक्षा अधिक उलाढाल झाल्यास कर भरावा लागेल यासाठी वेगळा नोंदणी क्रमाक घ्यावा लागेल याही स्वरूपाच्या व्यवहारावर कराचे प्रमाण अद्याप निश्चित झाले नसले तरी कमाल १५ टक्के कर आकारण्याचा अधिकार राज्य सरकारकडे आहे.

या नव्या कराचे परिणाम दूरगामी ठरू शकतात. सर्व प्रथम कत्राटी स्वरूपाच्या

व्यवहारावर कर लागू केल्याने व त्यात प्रामुख्याने गृह निर्माण व गृह रचनेच्या संदर्भातील विविध उद्योग ( गृह सजावट, फर्निचर, सॅनिटेशन वगैरे) याचा समावेश केल्यामुळे घर बांधणीचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढेल व घर अधिकाधिक महाग होईल. या संदर्भात श्री मोर्जे म्हणाले की, ज्या देशात लोकांना राहण्याची सोय होऊ शकत नाही त्या देशातील लोकशाही कधी यशस्वी होणार नाही

एकीकडे झोपडपट्टयांचे प्रश्न राज्याला सतावत असताना घराच्या किंमतीत अशा प्रकारे भरमसाठ वाढ सुचविणे राज्य सरकार कसे करू शकते, याबद्दल सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले.

परिणामाच्या संदर्भात आणखी सखोल विचार करता असे लक्षात येते की, जे वेगवेगळे धंदे या कायद्याखाली आणले आहेत, त्यामुळे उत्पादनाचा खर्च वाढेल यंत्रसामुग्री ऑफिस साहित्य, कॉम्प्युटर्स याच्या भाड्याने देण्यावर तसेच यंत्रसामुग्री वगैरेच्या बांधकामावर कर लागू केल्याने उत्पादन खर्च वाढेल व त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादनाच्या किंमती वाढून त्याचा बोजा अंतिम उपभोक्त्यावरच पडेल म्हणजेच सर्वसाधारण नागरिकाचा या गोष्टीशी प्रत्यक्ष संबंध नसला तरीही त्यास भूर्दंड सोसावा लागेल आणखी एक महत्त्वाचे म्हणजे ट्रक्स वगैरे भाड्याने देण्यावर कर आकारल्याने वहातूक खर्चातही वाढ होणार आहे आधीच पेट्रोल, डिझेल इ इंधने महाग झाल्याने व जकात करामुळे वहातूक महाग झाली आहे, त्यात भरच पडेल व पुन्हा महागाईत वाढ होईल.

या स्वरूपाच्या व्यवहारासाठी वेगळा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असल्याने व त्याचे निर्धारण विक्रीकर खात्याकडूनच पण वेगळ्या यंत्रणेद्वारे होणार असल्याने काही व्यवहारावर दुहेरी कर येण्याची शक्यता आहे. उदा. कंत्राटी स्वरूपाच्या कामावर कर आकारणी करताना त्यात जो माल कोणत्याही स्वरूपात वापरला जाईल त्याच्या किंमतीवर कर आकारला जाईल असे म्हटले आहे म्हणजेच एखाद्या गृह सजावटीच्या कामामध्ये 'क्ष' रुपयाचे फर्निचर वापरले तर त्यावर हा कर आकारला जाईल, परंतु या 'क्ष' रुपयाच्या फर्निचरमध्ये असलेल्या वस्तूवर (प्लायवूड, काचा, किंवा कदाचित कपाट वगैरे) मुंबई विक्रीकर कायद्यानुसारही कर भरलेला असेलच, म्हणजेच दुहेरी कराचा धोका संभवतो.

या विधेयकामध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले अर्थात सर्वच त्रुटींचा परामर्श येथे घेणे शक्य नाही व त्याचे प्रयोजनही नाही प्रामुख्याने कोणत्या रकमेवर हा कर आकारायचा त्या संदर्भात विवाद्य मुद्दे निघू शकतात व त्यामुळे ह्या कराची प्रकरणे न्यायप्रविष्ट होऊ शकतात व करदात्यास अनेक क्लिष्ट प्रकारांना तोंड द्यावे लागेल.

या विधेयकाच्या अनुषंगाने कर आकारणीसाठी जो नियम आवश्यक आहेत ते अजून तयार झालेले नाहीत मात्र हे विधेयक घाईघाईने मंजूर करण्यात आले आहे नियमाशिवाय त्याची अमलबजावणी होऊ शकणार नाही

या संदर्भात काही विक्रीकर सल्लागाराशी बोलली असता त्यांनी या प्रकारावर नाराजी व्यक्त केली बांधकाम उद्योगातील संघटना आणि इतर अनुषंगिक संस्था राज्य सरकारकडे शिष्टमंडळे पाठविणार आहेत. पुण्यातील एक विक्रीकर सल्लागार श्री शांतिलाल शहा यांनी सातारा, सांगली, नगर व नासिक येथे या कराच्या संदर्भात सभा घेतल्या तसेच मुंबईत विक्रीकर सल्लागारांच्या संघटनेने ॲंबॅसॅडर हॉटेल येथे या कायद्यावर चर्चा केली. मात्र कुणाकडेही निश्चित असा कार्यक्रम आढळला नाही.

मध्यंतरी विक्रीकर काढून टाकण्याविषयी बरीच चर्चा झाली. परंतु राज्याच्या एकूण उत्पन्नात विक्रीकराचा वाटा ६५ ते ७५ टक्क्यापर्यंत असल्याने तो आवश्यक आहेच. मात्र नवे कर लादून विक्रीकराचा कायदा अधिक क्लिष्ट करण्यापेक्षा विक्रीकर व्यवस्थापनात कार्यक्षमता आणल्यास सरकारी तिजोरीत अधिक भर पडेल. न पेक्षा वाढत्या विक्रीकराची एकमेव शिकार ठरणारा सर्वसामान्य नागरीक त्याच्या वाढत्या बोजाखाली अधिकाधिक दबून जाईल.

◻

# हस्तलिखितांचा प्रवास

सनावळ्या सोडल्या तर इतिहास नेहमीच रंजक, आकर्षक वाटतो. ( निदान मला तरी माझ्या शालेय जीवनात या सनावळ्यांनी सतत चीत केले आहे ) आणि इतिहासाचा अभ्यास सोडता इतिहास वाचणे किंवा पहाणे नेहमीच मनोरंजक ठरले आहे त्यामुळेच म्हणाना, इतिहास संशोधकांना मनमोकळी दादही देऊन टाकता येते ( बिचारे ! जुन्या पुराण्या, फिकट पिवळ्या कागदाच्या सहाय्याने काही बाही शोधत असतात. )

सांगायचे निमित्त एवढेच की, भारत इतिहास संशोधक मंडळाने नुकतेच एक प्रदर्शन आयोजित केले होते– जुन्या, पुराण्या हस्तलिखित पोथ्यांचे आणि या माध्यमातून काहीसा वेगळा असा हस्तलिखितांचा– पोथ्यांच्या बांधणीचा इतिहास आपल्यापुढे मांडला जुनी हस्तलिखिते, पोथ्या त्यांची मांडणी, बांधणी हे इतिहास संशोधनाचे दुवे त्यांचाही असा वेगळा इतिहास असतो. इ. स. ११०० ते इ स. १९०० पर्यंतच्या ८०० वर्षातील हस्तलिखितांचा हा प्रवास आपल्याला केवळ थक्क करून सोडतो.

या प्रदर्शनाचे दालन लहानसेच असले तरी समृद्ध आहे. सुरवातीसच आपल्याला रुंदीने लांब अशा ताडपत्रावर कोरलेली अक्षरे आढळतात. हे ताडपत्र इ. स ११०० मधील आहे याचबरोबर ताडपत्रावर कोरलेली शिवपुराणातली चित्रेही आढळतात काश्मिरातील भूर्जपत्रावरचे लेखनही आढळते आणि रेशीम कापडावरील सुबक हस्ताक्षरातील पोथीसुद्धा.

कागदाच्या जन्माबरोबरच लेखनात सहजता आली. सुटसुटीतपणा आणि हस्तलिखितातील वळणदार अक्षरे सहज नजरेत भरतात या प्रवासात आपल्याला बंगाली, तेलगू, तामीळ, मराठी, गुजराथी, फारसी या साऱ्या भाषातील हस्तलिखिते आढळतात आणि त्यांचे वैशिष्ट्यही चटकन सामोरे येते.

चित्रकला, रंग आणि रेषांचे विविध नमुने या प्रदर्शनातून दिसतात. १२ व्या शतकातील ताडपत्रावरील चित्रकला आणि १९ व्या

शतकातील पंचांगातील चित्रे आपल्याला या ८०० वर्षांचा प्रवास नकळत सांगून जातात. प्रदर्शनात १८ व्या शतकातील एक योगासनांची पुस्तिका मांडली आहे. त्यात विविध आसने चित्ररूपाने स्पष्ट केली आहेत. हा या चित्रांच्या प्रवासातील एक उत्कृष्ट नमुना. याचबरोबर कातडी मुखपृष्ठावरील चित्रे आणि काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवरील सोनेरी उठावदार चित्रे हे आणखी वैशिष्टच.

चित्रकलेबरोबरच सजावटीतील कल्पकता आपले लक्ष वेधून घेते. पोथीच्या मुखपृष्ठाची मांडणी, त्यातील रंगसंगती, सजावट आणि नंतर प्रत्येक पानावर आखलेल्या वेधक चौकटी सारेच सुबक ! १८ व्या शतकातील एका पंचांगातील नक्षी आणि प्रत्यक्ष मजकूर यांचे प्रमाण याची साक्ष देते.


या प्रदर्शनात आपल्याला अक्षरांचे विविध नमुने भेटतात. मोठ्या वळणदार अक्षरांपासून अतिसुक्ष्म साध्या डोळ्यांनी वाचता न येणाऱ्या अक्षरापर्यंत ! लेखनामध्येही रंगाचा वेधक वापर केल्याचे आपल्याला आढळते. अक्षरांच्या विविध आकारांबरोबरच पोथ्यांचे विविध आकारही आपल्याला आढळतात. बोटभर लांबीचे पंचांग, बोटाच्या एका पेराएवढ्या लांबीची गीता हे काही नमुने !

या साऱ्या प्रदर्शनातून अक्षरे, रंग, रेषा, मांडणी, बांधणी यातील कल्पकता हळूहळू उत्क्रांत होताना आढळते. विशाल इतिहासातील हे थोडेसे नमुने पण तेही आपल्याला आश्चर्यचकित करतात. भारतात हस्तलिखितांची परंपरा जुनी आहे. विविध पोथ्या, बाडे यांचे लेखन करणे पुण्यकर्म मानले जात असे त्यामुळेच आपल्या विशाल ग्रंथसंपदेपैकी काही ग्रंथ आजही आपल्याला उपलब्ध होऊ शकतात. एका अर्थाने हे प्रदर्शन आपल्या या पैलूवरही प्रकाश टाकते.

तर असे हे एक उपयुक्त दर्जेदार प्रदर्शन–आवर्जून पहावे असे !

–मनोहर सोनवणे

## आज तो नाही ....



परवाच मुंबईला जातानाची गोष्ट. लोणावळ्याला सात–आठ मुलं गाडीत चढली. नुकतीच कॉलेजात जायला लागलेली मुलं असावीत. थोड्या वेळानं एकानं त्याचं पुस्तक बाहेर काढलं. आजूबाजूला बसलेली बाकीची मुलं डोकावून डोकावून त्या पुस्तकात बघत होती. हसत होती. आश्चर्यचकित होत होती, वाचत होती. प्रेमानं त्या पुस्तकाच्या गुळगुळीत कागदावरून हात फिरवत होती. त्या मुलांचा जवळजवळ तासभर त्या पुस्तकाच्या संगतीत गेला मग या हातातून त्या हातात पुस्तक जायला लागलं. ते पुस्तक म्हणजे विवेकनं प्रसिद्ध केलेला निसर्गकोषाचा पहिला खंड होता. आपली सृष्टी आपले धन. विवेकच्या नजरेनं, कॅमेऱ्यानं, त्याच्या जाणिवेनं आणि त्याच्या तरुणपणानं टिपलेलं निसर्गाचं अनुपम धन, विवेक कायम ज्यांच्या सगतीत असायचा अशाच कोवळ्या तरुण मुलांच्यात पोचत होतं. त्या मुलाला विचारलं, 'हे पुस्तक तू विकत घेतलंस ?' साध्या कपड्यातला तो मुलगा 'हो' म्हणाला आणि पुढे म्हणाला अजून चार खंड निघणार आहेत.

पुण्यात परत येताना लक्षात होतं की, विवेक भेटला को त्याला हे सांगायचं. की तू ज्याच्यासाठी जिवाचं रान केलंस, निसर्ग लोकांसमोर ठेवण्यासाठी धडपडलास, जगभर फिरलास ते सगळं हवं तसं, हव्या त्या लोकांमध्ये बरोबर पोचतंय. विवेकच्या पुढच्या खंडाचं, खंडाच्या पाच भाषातल्या भाषांतराचं काम झपाट्यानं सुरूही झालं होतं, पण त्या मुलांचा तो प्रसंग सांगितल्यावर त्याला खूप आनंद झाला असता, नेहमीसारखं निरागस हसला असता आणि लगेच पुढच्या क्षणी त्याच्या खास शैलीत पुढच्या खंडाचं, प्रेस कॉन्फरन्सचं, त्याच्या पुढच्या परदेश दौऱ्याचं काही तरी सांगायला लागला असता, पण विवेकला हे सांगायचं राहूनच गेलं.

विवेक डॉक्टर होता, उत्तम छायाचित्रं काढत होता, अतिशय सहज, प्रवाही लिहीत

होता. डोंगर-नद्याइतकच त्याला छोट्या-मोठ्या किटक-प्राण्याबद्दल प्रेम होत हिमालयातल्या शिखराबद्दल त्याला जस आकर्षण होत, तसच बर्फाखाली दडलेल्या छोट्या-छोट्या सजीव सृष्टीबद्दल होतं सोनाली सिंहिणीच्या तोंडात तो हात देऊ शकत होता, सापाना अंगावर खेळवत होता, खिशात ठेवत होता आणि आजारी प्राण्याना विवेकच घर म्हणजे हक्काच घर होत. विवेकला निसर्गाची भाषा कळली होती निसर्गाची ओळख होण्यापूर्वी तो माणसाच्या गर्दीशी नात शोधायला बघत होता

विवेकन नाटकं केली, राजकारणात भाग घ्यायचा प्रयत्न केला, पण नाही निसर्ग त्याला ओढून नेत होता आणि विवेक त्यात मनापासून रमत होता.

विवेक कधी एकटा नव्हता त्याच्याभोवती कायम मुला-मुलींची गर्दी असायची. आपल्याभोवती गर्दी जमवून सहज, हसत-हसत त्याच पुढारीपण करायची छान कला त्याला अवगत होती नेचर कॅम्पमधल्या मुलाच आणि विवेकच नात त्यामुळेच पक्क झाल. त्याला संगिताची आवड होती, स्वत: करून खाण्याची आवड होती. तो नकला छान करायचा आणि अस बरच काही .

शुक्रवारी जीपमधून विवेक सिंहगडला गेला होता रात्री उतरताना जीपला अपघात झाला. त्यानतर शनिवारी पाहिला तो हाराच्या गर्दीत शात झोपलेला विवेक न बोलणारा, न हसणारा त्या शेवटच्या क्षणी खरच त्याला काय काय आठवल असेल? घरातली प्रेमळ माणस तर असतीलच, पण त्याचे शेकडो मित्र, असख्य प्राणी-पक्षी, प्रसिद्ध व्हायचे राहिलेले खड, तो बनवणार होता त्या फिल्मस् .. की यातल काहीच आठवल नसेल? तेवढाही अवधी त्याला मिळाला नसेल?

'यापुढे आम्ही अशा फिल्मस् काढू ज्या जगात कुणी काढल्या नसतील.'

'परदेशी ग्रँटची गरजच काय... यापुढे आम्हीच परदेशी लोकाना ग्रँट देऊ...'

अशी वाक्य आत्मविश्वासान, हसत-हसत सहज बोलणारा आणि ती खरी करण्यासाठी झपाटून काम करणारा लाखामध्ये एखादाच अठ्ठावीस वर्षाचा विवेक असतो... आणि ज्याची स्वप्न बघत आपणही नकळत फुलायला शिकतो असा विवेक एका क्षणानतर आपल्यात नसतो हे दुःख खरच किती मोठ आहे... सतत सलणार आहे... उमेद घालवणारं आहे

—मेधा राजहंस

# पुरुषोत्तम स्पर्धा : यशस्वी सांगता

मिलिंद संगोराम


पुरुषोत्तम करंडकाच्या या २१ व्या वर्षाचा निकाल लागला आणि किती तरी वर्षांनी अनुकूल कॉमेंटस् मिळत गेल्या. पहिली काही वर्षं रडतखडत प्रवास करणाऱ्या या स्पर्धेला आता प्रतिसादाची चिंताही उरलेली नाहीये. प्राथमिक फेरीत या वर्षी एकूण ३३ एकांकिकातून जवळ जवळ ७०० स्पर्धक कलावत स्टेजवर हजेरी लावून गेले या ३३ एकांकिकांपैकी काही एकांकिकानी वेळेची मर्यादा पाळली नाही म्हणून त्याचा विचारच केला गेला नाही. प्राथमिक फेरीच्या परीक्षकाच काम त्यामुळे सुकर झाल आणि पर्यायानं निकालही समाधानकारक लागला

'युवक आणि समाज याच्यातील ताणतणावाचं दर्शन त्या त्या वर्षी घडवणारी स्पर्धा' असा जो 'पुरुषोत्तम'चा लौकिक आहे तो याही वर्षी टिकवला गेला भ्रष्टाचार, हिंसाचार आणि विकृत मनोवृत्तीचा वेध जवळ जवळ प्रत्येक एकांकिकेत घेतला गेला हा वेध घेत असताना रगमचीय क्लृप्त्याच्या नादात काहीचा तोल सुटत गेला. एकांकिका भडक होत गेल्या, पण त्या मागची विद्यार्थ्यांची भावना प्रामाणिक होती हे लक्षात घ्यायला हवं जवळजवळ सगळ्याच स्पर्धकाना सामाजिक बांधिलकीच भान आहे ही किती सुखद गोष्ट आहे! नियमाच्या चाळणीत अडकलेल्या 'तक्षक' आणि 'माठ व युरेका' या नाटिका कायमची आठवण ठेऊन गेल्या पैकी 'माठ आणि युरेका'नं तर बांधिलकीच्या 'त्या' उष्णतेतून हलक्या फुलक्या आणि तरीही अर्थपूर्ण परिहासाचा रिलीफ मिळवून दिला. या नाटिकाच्या 'पालक-सयोजकानी' नियमाकडं पुरेस लक्ष दिल नाही याची खत वाटते

मॉडर्न महाविद्यालय याही वर्षी पुरुषोत्तम करंडकाचे मानकरी ठरले. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण ज्या एकांकिकेचा दिग्दर्शक आपल्या संचाला घेऊन ठाण्याच्या वारली आदिवासी जमातीत ३०-४० दिवस राहून येतो, तिथल्या लोकांच्या सवेदना टिपून त्या जशाच्या तशा सादर करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हाच या परिश्रमावर आणि प्रतिभेवर 'करंडक' त्याच्या नावावर जमा होतो 'आसाचा फेरा' ही एकांकिका सादर करून 'मॉडर्न'नं एका आदिवासी जोडप्याच्या शोषणाच भेदक चित्रण त्यात घडवल हे करत असताना एकांकिका व्यक्तिगत मर्यादेतच गुरफटून राहणार नाही याचीही लेखक जगतकुमार पाटील आणि दिग्दर्शक गगनविहारी बोराटे यानी पुरेपूर काळजी घेतली गगनविहारीच दिग्दर्शन धीट होत त्यात सकोच नव्हता तर विषयाच्या आवश्यकतेची पूर्तता करण्याचा इमानी प्रयत्न होता. एकांकिकेतील काही दृश्ये ही इतर सदर्भात भडक वाटली असती परंतु इथे त्या दोन-चार सेकंदाच्या दृश्याने पंधरावीस सवादाचा सक्षेप होऊ शकला. या एकांकिकेत 'लक्ष्मी'ची भूमिका करणाऱ्या शुभदा शहानं अभिनयाच्या प्रत्येक अगात आपलं श्रेष्ठत्व सिद्ध केल. सर्वोत्कृष्ट अभिनय नैपुण्याच केशवराव दाते पारितोषिक तिला देऊन तिचा गौरव केला गेला. तिच्या आणि उत्कृष्ट अभिनेत्याचं 'निर्मल पारितोषिक' पटकावणाऱ्या गगनविहारी बोराटेच्या अभिनयात दिखाऊपणाचा किंवा भावविवशतेचा साधा व्रणही नव्हता आणि इतर पचेचाळीस पात्रानीही याच भान कसोशीनं राखल. त्यागराज खाडिलकरचे सगीत हे प्रसगातून जन्माला आले नव्हते, पण तरीही ते उपरे वाटले नाही. तर प्रसगाची भावनिक तीव्रता वाढवायला त्याची फार मदत झाली. एकांकिका वारली भाषेतली त्यामुळे भाषेच्या अगानं ती तितकीशी पोचली नसली तरी वेदनेच्या अगानं निश्चितच भिडली.

अतिमफेरीची समाप्ती आणि निकाल यामध्ये एक-दीड तासाचा अवधी असतो आणि या अवधीत प्रत्येकजण आपल्या तर्कबुद्धीला ताण देऊन देऊन 'अंतिम निर्णय

अंदाज स्पर्धे 'चे फॉर्म भरण्यात व्यग्र असतो. यावर्षी कदाचित एकही 'अंदाजवाला' विजयी झाला नसावा कारण नेस वाडियाच्या 'शिपान'नं स्पर्धेवर इतकी जबर पकड मिळवली होती की 'दुसरी किंवा पहिलीच' असा बोलबाला होता. पण मध्येच एम्. आय. टी. च्या 'फितूर तो चंद्र' नी बाजी मारली आणि दुसऱ्या क्रमांकाचा हरिविनायक करंडक सगळ्यांदेखत पटकावून नेला. 'फितूर तो चंद्र'चा विषय सर्वांगानं भ्रष्ट झालेल्या समाजात सामान्य माणसाची कोंडी असा चौकटीतलाच. परंतु शेखर ढवळीकर या विद्यार्थी दिग्दर्शकानं त्याच्या २७ पात्रांच्या संचातून जे उत्कृष्ट सांघिक प्रयत्नांचं दर्शन घडवलं. त्यामुळे तो स्वतः सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाच्या पारितोषिकाचा मानकरी ठरला. लेखक प्रमोद जोशीनं 'चंद्र' या प्रतीकाचा फार कल्पकतेनं उपयोग करून घेतला होता. सामान्य माणसाच्या भूमिकेत असलेल्या विनय कुलकर्णीला वाचिक अभिनयाचं पारितोषिक मिळालं. इतर सगळीच पात्रं रंगमंचावर अगदी सहजतेनं वावरली.



'फितूर तो चंद्र'मधील एक दृश्य.

## प्रयोगशीलतेचा अभाव

सांघिक तिसरं पारितोषिक मिळवणाऱ्या 'नेस वाडिया'च्या 'शिपान'नं अंतिम फेरीतील प्रयोगात बरेच बदल घडवून आणले आणि स्पर्धेची गिमिक्स वापरून जास्तीत जास्त टाळ्या कशा वसूल करता येतील याकडे लक्ष दिलं. यामुळे एकांकिका भडक झाली. पुत्रप्राप्तीसाठी एका वैराण डोंगरातील पुजारी आणि त्याची बायको आठ बळींचं शिपान (नवस) करतात. परंतु गावकऱ्यांच्या जागरुकतेमुळे सातव्या बळीनंतर आठवा बळीचा बकरा तो पुजारीच होतो आणि हत्येनंच हत्याकांडाची इतिश्री होते असं ढोबळ कथाबीज असलेली ही एकांकिका. या एकांकिकेत पुजाऱ्याच्या बायकोच्या भूमिकेत सुरेखा महाडिक चमकली. तिला उत्कृष्ट अभिनेत्रीचं 'निर्मल पारितोषिक' दिलं गेलं. या वर्षी ज्यांच्याकडून आशा कराव्यात अशा अभिनेत्रींत शुभदा शहा, माधुरी गद्रे आणि सुरेखा महाडिक या तीनच अभिनेत्रींची नावे घ्यावी लागतील.

प्रायोगिक एकांकिकेला देण्यात येणारं जयराम हर्डीकर पारितोषिक या वर्षी राखून ठेवण्यात आलं. याबद्दल परीक्षक श्री. भालचंद्र फडके पारितोषिक वितरण समारंभात बोलताना म्हणाले, 'अंतिम फेरीतील सगळ्याच नाटकांच्या सादरीकरणात प्रयोगशीलतेचा अभाव होता. याची खंत वाटते' श्री. फडके यांनी परीक्षकांना अपेक्षित असलेल्या प्रयोगशीलतेबद्दल आणखी चार शब्द सांगितले असते तर त्यादृष्टीनं पुढच्या वर्षी निश्चित प्रयत्न झाले असते.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या दोन्ही नाटिका अंतिम फेरीत प्रवेशू शकल्या. पैकी 'गुरुब्रम्हा'मध्ये विद्यार्थी लेखक अमृत घोरपडेनं महाविद्यालयीन राजकारणावर फार मार्मिक भाष्य केलं. पण प्राथमिक फेरीत नाटिकेचा जेवढा सरस प्रयोग झाला तेवढा अंतिम फेरीत झाला नाही. कलावंत साध्या साध्या चुका करत गेले आणि त्यामुळे एकांकिका परिणामशून्य झाली. याच महाविद्यालयाची दुसरी एकांकिका 'दंगा' ही प्रचलित राजकारणावरील खुमखुशीत टिकाटिप्पणीमुळे रंगली. हिंदू–मुसलमान शेजाऱ्यांमध्ये झालेल्या अत्यंत कौटुंबिक भांडणाचा गल्ली ते दिल्ली आणि दिल्ली ते युनो असा गमतीदार प्रवास 'दंगा'त गतिमानतेनं घडवला गेला. प्रसाद जोशी (हर्षद) आणि अमिता खेर (अमिना) या दोघांनी शाळकरी मुलाच्या भूमिका 'आदर्श बालिशपणाने' केल्या. या दोघांना काकाजी जोगळेकर उत्तेजनार्थ पारितोषिक दिलं गेलं. आपले आजचे जनजीवन 'राजकारणाक्रांत' कसे झाले आहे याचा मिस्किल प्रत्यय 'दंगा'नी दिला.

मानसशास्त्राच्या एका विकृत प्राध्यापकाचं प्रगल्भ चित्रण बी. जे मेडिकलच्या 'अॅनेस्थेशिया'त करण्यात आलं. या प्राध्यापकाची विकृती आपल्या सख्ख्या बहिणीला व वडिलांना स्वतःच्या मानसशास्त्रीय प्रयोगांचे साधन करण्याच्या थरापर्यंत पोहोचली आहे. या दोघांना तीव्र मानसिक धक्के देऊन वेडाचे दोन प्रकार शोधण्यात तो यशस्वी होतो. पण अखेर स्वतःच तिसऱ्या प्रकाराच्या वेडाचा नमुना बनून राहतो. अशा कथाबीजावर विद्यार्थी लेखक चंद्रशेखर फणसळकर यांनी बांधलेला नाट्याचा इमला जितका सुडौल तितकाच आटोपशीर होता. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखकाचे पारितोषिक फणसळकरांना देण्यात आलं. शिवाय प्राध्यापकाची भूमिका आणि दिग्दर्शन या दोन्ही आघाड्या फणसळकरांनी समर्थपणे पेलल्या. सादरीकरणातील किरकोळ चुका सोडल्या तर एकांकिका परिणाम नोंदवून गेली हे निश्चित.

सिम्बॉएसिस कला आणि वाणिज्य महाविद्यालयानं रत्नाकर मतकरींची गाजलेली

पृष्ठ २५ वर

ह्या ना त्या निमित्ताने

# मी....अमुक तमूक

फिरोझ रानडे

'तुम्ही म्हणजे अगदी कावळ्यासारखे आहात' रागानी आणि हताशपणे बर्वे गुरुजी गेल्यावर, तेवढ्याच हताशपणे व रागारागाने दार लावून घेत राधा म्हणाली.

बर्वे गुरुजी व राधा इतके का रागावले आहेत ह्याची श्यामला पूर्ण कल्पना होती. राधा त्याला कोणत्या कारणाकरता कावळ्याच्या वर्गात ढकलत होती तेही त्याला चागले माहीत होते.

आता हे खरे की राधा एका विशिष्ट 'स्थ' लोकांप्रमाणे गोरी होती व श्याम तेवढ्याच एका विशिष्ट 'स्थ' लोकांप्रमाणे काळा असला तरी कावळा म्हणण्याइतका काळा नव्हता. फार तर कबुतराइतका काळपट म्हणता येण्याइतपत त्याचा रंग होता. तो विचार मनात ठेवून आणि चालू विषयाला कलाटणी देण्याकरता म्हणून तो म्हणाला,

'कावळा म्हणण्या इतका काही मी काळा नाही आहे ह!'

एखाद्या आधीच भडकणाऱ्या स्टोला जर कोणी पप मारला तर तो जसा जास्तच भडकतो तशी राधा श्यामच्या 'मी कावळ्या इतका काळा नाही आहे ह' ह्या उत्तराने भडकली. 'तुमचा रग काळा आहे, ह्या अर्थाने काही मी तुम्हाला कावळा म्हटल नव्हत, हे तुम्हालाही चागलं माहीत आहे.' आता राधाचा राग कमी झाला होता व हताशपणा वाढला होता. त्या हताशपणातच ती सोफ्यावर बसत म्हणाली, 'जाता येता लोकाची खुसपट काढता. ह्याच काय हेच चुकलं—त्याचं काय तेच चुकलं. त्या स्त्री—मुक्तीवाल्या बाईनं कोणा समारंभात भाग घेतला. सारखे लोकांचे दोष काढत असता

आज तर कमालच केलीत. बर्व्यांची नाही तरी त्या थोर माणसाची तरी काही पर्वा करायचीत.'

श्यामने आज खरंच कमाल केली होती व राधा हताश होण साहजिकच होत. ती स्वैंपाकाच्या गडबडीत असल्यामुळे तिला श्याम आणि बर्व्यांत झालेल बोलण थोडं थोड ऐकू आलं होत व कळलं होत. बर्वे गुरुजी कमालीचे निराश होऊन निघून गेले हे तिने पाहिले होते. त्यामुळे ती रागावली होती व श्यामच्या वागणुकीबद्दल हताश झाली होती.

व ते अगदी सहाजिकच होतं आज सकाळी सकाळी बर्वे गुरुजी महाराष्ट्रातल्या एका निष्ठावत ज्येष्ठ समाजवादी नेत्याचं आत्मचरित्र श्यामला वाचायला देण्याकरता म्हणून घेऊन आले होते. कर्मधर्मसयोगाने श्यामने ते आत्मचरित्र आधीच वाचले होते. बर्वे गुरुजी आले तेच मुळी त्या ज्येष्ठ समाजवादी पुढाऱ्याची व त्या पुस्तकाची तारीफ करत. आणि फक्त बर्वेच नाही तर सारा महाराष्ट्र त्या आत्मचरित्राची तारीफ करत होता.

व तशी तारीफ होणे योग्यच होते. ह्या आत्मचरित्राचा लेखक अत्यंत सत्वशील, सज्जन, नीती व तत्त्वनिष्ठ समाजवादी पुढारी म्हणून प्रसिद्ध होता. ज्याला धुतल्या तादळासारखा म्हणता येईल, असा तो आत्मचरित्राचा नायक होता

'मग आम्ही काय लोकानी वाटेल ते लिहिलेले ऐकून घ्यावं का?' श्याम राधाच्या समोरच्या सोफ्यावर बसत म्हणाला.

'म्हणजे?' त्याच्या म्हणण्याचा अर्थ-बोध न झालेल्या राधाने विचारले.

'म्हणजे कोणा बाईन उठाव आपल्या विलायतच्या दोन–तीन वर्षातल्या वास्तव्यात जमा केलेली पुस्तकं घ्यावीत आणि त्याची कॉपी मारून मुलाचे सगोपन कस कराव, त्याना कस वाढवाव, त्याच्या मनाची कशी निगा राखावी ह्याचे आम्हाला दर आठवड्याला धडे द्यावेत ?

त्याचा नाही भारतीय, नाही मराठी जीवनाशी काही सबध. असे लेखावर लेख लिहावेत आणि आम्ही वाचकांनी ते शातपणे ऐकून घ्यावं ? हे नाही चालायचं. ह्या लेखकानी आपण कोणाकरता लिहितो आहोत, काय लिहितो आहोत ह्याचा विचार व अभ्यास केलाच पाहिजे. नाही तर आम्ही दोष काढणारच. किंवा कोणी दलित लेखकाने उठाव, आपली जीवन कहाणी लिहावी आणि त्या कनिष्ठ जीवनाचं सार खापर ब्राह्मणावर फोडावं आणि आम्ही ते शातपणे ऐकून घ्याव हा कुठला न्याय ?'

'मग त्याचं जीवन हाल-अपेष्टाच, दैन्याच नाही आहे का ? आणि त्याला आपली चातुर्वर्ण्य पद्धती जबाबदार नाही का ?' राधासुद्धा श्यामने बोललेल सगळं शातपणे ऐकून ? घेणाऱ्यातली नव्हती.

'आहे, अगदी शभर टक्के आहे पण चातुर्वर्ण्याचे हे टेबल फक्त ब्राह्मण ह्या एका पायावर उभ नव्हत. त्याला बाकी तीन पायसुद्धा भक्कमपणे उचलून धरत होते. ही व्यवस्था हजारो वर्ष टिकून रहायला बाकीचे वर्णबधु तितकेच जबाबदार होते हे कस विसरता ?

ब्राह्मणाना काय वर्ण व्यवस्थेचा जाच नव्हता? एखादा ब्राह्मण भिकेला लागला तरी त्याला शेतीसुद्धा करता येत नसे मग बाकीचे व्यवसाय करणं तर दूरच राहिले इतर किती तरी जातीत करतात तसा पुनर्विवाह ब्राह्मण विधवेला करता येत नसे. केशवपन फक्त ब्राह्मण बायकाच, नवऱ्याच्या मरणोत्तर होत असे.'

'पण त्याची बरोबरी दलितावर होणारे जुलूम—त्याच्यावर होणारे अनाचार, अत्याचार ह्या बरोबर करता येईल का ? राधाने विचारले.

'त्याची तुलना करायची कल्पना नाहीच आहे मुळी. दलिताच्या वेदना फार भयंकर आहेत पण ब्राह्मण स्त्रियाही त्यातून सुटल्या नाही आहेत, त्या समाज पद्धतीमुळे, एवढंच मला म्हणायच आहे'

'मग त्या तुमच्या चातुर्वर्ण्याच काय ?' तो तसाच राहिल ?' राधा

'बिलकुल नाही, अगदी एक मिनिटसुद्धा नाही.' श्याम तावातावाने म्हणाला 'तो गाडला गेलाच पाहिजे एकेकाळी आपण सगळ्यानी तो उचलून धरला होता, आता सगळे मिळून तो गाडून टाकू या. आणि त्या दृष्टीने प्रयत्न चाललाच आहे

'मी फक्त त्याच भांडवल दलित लेखकांनी करू नये असं म्हणतो तर तुम्ही मला

कावळ्याच्या जातीत टाकता '

ह्यावर राधा फक्त मजेशीरपणे हसली.

'किंवा त्या स्त्री–मुक्तीचा आवेश आणून सिनेमातून काम करणाऱ्या बाईचच बघ ना? उंबरठ्याच्या बाहेर काय पडली आणि स्वतः-वर वेळ येताच, पहिली बायको जिवंत असलेल्या माणसाशी लग्न करून, त्या बाईला उंबरठ्याच्या बाहेर घालवलं.'

'पण तुम्ही तर म्हणता की लग्न ही खाजगी बाब आहे म्हणून', राधाने श्यामला डिवचले.

'व अजूनी म्हणतो, त्या बाईला योग्य व *आवडलेल्या माणसाशी* तिने *लग्न* करावे व वेळ पडली तर त्या दुसऱ्या बाईच्या भावनेची पर्वा करावी वा करू नये. हा तिचा प्रश्न आहे. माझं म्हणणं इतकच की, आपण समाजसुधारक आहोत ह्याची टिमकी वाजवू नये. त्या तिच्या उंबरठ्याबाहेर पडण्यावर किती सभा–समेलने! किती कौतुक! त्याच वेळी तिने सांगायचं की, मी फक्त कलाकार म्हणून ह्या सिनेमात काम केल आहे.

त्याचही कौतुक आणि आता हे लग्न केल तर त्याचही कौतुक व्हाव अशी तिची अपेक्षा. हे नाही चालायच'

'हे बरीक खर?' राधा निश्वास टाकून म्हणाली.

'त्या नटीने हे लग्न करायला नको होतं हे मात्र खर!' महाराष्ट्रातल्या असंख्य भगिनीप्रमाणे राधाही ह्या लग्नामुळे दुखावली गेली होती. तिलाही हे लग्न बोचले होते.

'आता मी हेच म्हटल तर माझी कावळ्यात गणना होऊ लागते.'

'मग कशात करायची गणना तुमच्यासारख्या लोकाची?'

'तुम्ही आम्हाला अंकुश का म्हणू नये? बेजबाबदारपणे लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या, वागणाऱ्या लोकावर काही अंकुश नको? आपलं लिहिण, बोलण, वागण कुणीतरी लक्ष देऊन पहात आहे, वाचत आहे, ह्याची त्याना जाणीव नको? आता त्या दिवशी विलेपार्ल्यात आत्मचरित्रावर बोललेल्या त्या पाच भगिनी...'

'बस... बस... बस .. ते सगळं मला अगदी पाठ आहे. त्या बाबतीत तुम्ही जास्तच अंकुश चालवलात.' त्या पाचजणीतल्या बहुतेक जणी राधाच्या 'मैत्रिणी' असल्यामुळे राधाला तो विषय अप्रिय होता.

'बरं, रे राहू दे! आता हे जन्मशताब्दीचच बघ. ज्याची जन्मशताब्दी आहे त्याला कौतुकरसात अगदी नुसता बुचकळून काढतात. म्हणजे हा जन्मशताब्दीवाला तुमच्या–आमच्यासारखा माणूस होता की तडक स्वर्गातून आला होता ह्याविषयी संभ्रम निर्माण व्हावा, इतकं कौतुक. त्याच्या गुण-दोषाची चर्चा व्हावी–आता शताब्दी आहे म्हणून थोड दोषाकडे कमी लक्ष दिलं तरी चालेल, पण थोडीतरी साधक–बाधक चर्चा त्याच्या वाङ्मयाविषयी व्हावी अस मी म्हटलं की लगेच कावळा ठरतो!'

'आल लक्षात', राधाने श्यामच्या प्रश्नाला उत्तर दिले.

'आता हे बघ कोणी दोन बायका कुरूप आहेत, काळ्याकुट्ट आहेत ह्याची, आम्ही काळ्याच लोकानी, किती टिंगल करावयाची त्याला काही सुमार? पण एकदा शंभर वर्षं भरली की तोच गृहस्थ थोर, मानवतावादी, युगपुरुष सगळं काही एकदम ठरतो. हे योग्य नाही.'

राधालासुद्धा त्या दोघीजणीची कुरूपपणाकरता केलेली टिंगल आवडली नव्हती. तेव्हा ती म्हणाली, 'हे बाकी तुमचे म्हणणे मी काही प्रमाणात तरी मान्य करीन; पण त्या थोर समाजवादी नेत्याच्या आत्मचरित्राबद्दल बोलून तुम्ही बर्वे गुरुजीना उगाच दुखवलेत. किती सज्जन आहेत ते.'

'अग पण मला त्याच्याबद्दल का आदर नाही?' श्याम कळवळून म्हणाला व ते खरेच होते श्यामला त्या वृद्ध, तेजस्वी समाजवादी नेत्याबद्दल फार आदर होता. राष्ट्र-सेवा दलात काही वर्षं काढल्यामुळे त्या थोर गृहस्थाच्या सान्निध्यात तो आला होता. शुद्ध चारित्र्याची जी काही एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकी मंडळी आहेत त्यात हे गृहस्थ आहेत असे श्यामचे मत होते. त्यामुळे त्याने मोठ्या कळवळून विचारले,

'अग पण ते सज्जन गृहस्थ आहेत म्हणून आम्ही त्याच्या सगळ्या गोष्टी ऐकून घ्याव्यात काय?'

'काय एव्हढी मोठी गोष्ट आहे हो?' राधाला श्याम–बर्वे गुरुजी संवाद पूर्णपणे माहीत नव्हता

'आता हेच बघ' म्हणून त्याने ते आत्मचरित्राचे पुस्तक हाती घेतले. त्यातले एक विशिष्ट प्रकरण काढले व राधाला म्हणाला, ह्या प्रकरणाचा मथळा वाच, 'आमचा पण फाळणीला विरोध होता पण ..'

'मग ठीक आहे. त्याचा फाळणीला विरोध होता पण त्यानी तो जाहीरपणे केला नाही, एवढेच.' राधा त्या श्रेष्ठ समाजवाद्याची बाजू घेत म्हणाली.

'इतकं सोपं नाही आहे प्रकरण.' आता श्यामच्या बोलण्यात वेग आला होता. 'त्यावेळी ही सगळी समाजवादी मंडळी अगदी तरुण व उसळत्या रक्ताची होती. त्याचा फाळणीला विरोध होता तर त्यानी काय केल? तर महात्मा गांधीना भेटले. महात्माजी त्याना म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत फाळणीच्या विरोधात उभे रहाणे योग्य नाही, तेव्हा हे लोक गप्प बसले.'

'पण महात्मा गांधीच त्यानी ऐकलं तर त्यात त्याच काय चुकल?' राधाने विचारले.

'ह्या लोकानी *महात्माजीच पूर्वी कधी* ऐकल होतं? गांधी नेहमी म्हणत की अहिंसेने लढा चालवा, ऐकल ह्यानी त्याचं? बेचाळीसच्या लढ्यात घातपात–हिंसा केलीच की नाही यानी?

आणि फाळणी सारख्या महत्त्वाच्या व देशाचे भवितव्य व इतिहास व संस्कृतीची वाट लावणाऱ्या प्रश्नावर त्यानी फक्त महात्मा गांधीशी चर्चा केली. त्याना सरहद्द गांधी म्हणजे खान अब्दुल गफार खानशी चर्चासुद्धा करावीशी वाटली नाही किंवा फाळणीला विरोध असणाऱ्याची एकजूट करून मोठा लढा द्यावा असे त्याना वाटले नाही.'

आता राधा पण गंभीरपणे ऐकत होती.

'अर्थात फक्त समाजवादीच गप्प बसले नाहीत तर बाकी मंडळींनी पण तेच केले. 'उजव्या' लोकानी फाळणीला मान्यता दिली होती. 'डाव्या'नी तर पाकिस्तानला चक्क पाठिंबाच दिला होता. खाकी अर्धी–चड्डीवाले फक्त डावा–उजवा, डावा–उजवा करत कवायत करत राहिले व रँड व जॅकसन साहेबाचा खून पाडणाऱ्यांच्या पठडीतल्या लोकाना ज्या माउंट बॅटनने ही फाळणी योजना आणली तो डोळ्यासमोर दिसला नाही.

संयुक्त महाराष्ट्राकरता शंभरच्या वर हुतात्मे झाले; पण भारताच्या विभाजनाकरता एकही मराठी हुतात्मा झाला नाही!'

'मग तुम्हाला म्हणायचे आहे तरी काय? ह्या आत्मचरित्रकाराने काय म्हणायला पाहिजे होते?' राधा चर्चेचा शेवट करण्याच्या हेतूने म्हणाली.

'हेच की ह्या समाजवादी व त्या वेळच्या पुढाऱ्यानी हे मान्य करावे, आम्ही सगळे असहाय्य होतो, विभाजन म्हणजे काय हे आम्हाला कळलेच नाही आणि देशाची फाळणी ही आमच्या नाकर्तेपणाची खूण आहे.' □

# मोठ्या शहरांचा प्रश्न आणि 'जनपौरे'

● प्रा. राजगुरु द. आगरकर, देवरूख ●

१९८१ च्या जनगणनेनुसार मुंबई शहराची लोकसंख्या ८२ लाख होती. सिंगापूर, फिलिपाइन्स इ. लहान देशांच्या लोकसंख्येपेक्षा मुंबईची लोकसंख्या जास्त होती. या वाढत जाणाऱ्या लोकसंख्येने अनेक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रश्न निर्माण केले आहेत. भारतातील कलकत्ता, मद्रास, दिल्ली इ. शहरेपण वेगाने वाढत आहेत. या शहरातमुद्धा अशाच प्रकारचे प्रश्न निर्माण होत आहेत. याशिवाय १९८१ मध्ये दहा लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली आठ शहरे होती. या शहरांमध्ये आज असे प्रश्न निर्माण झालेले नसले तरी या शहरांना पुढील काही दशकात अशा प्रश्नांना तोंड द्यावे लागणार आहे. आज काही दोनचार शहरांतून निर्माण झालेले प्रश्न काही वर्षांनच अनेक शहरांच्या बाबतीत निर्माण होणार आहेत हे लक्षात घेऊन या प्रश्नांचा विचार होणे आणि या प्रश्नांची उपाययोजना आखताना राष्ट्रीय धोरण ठरवले जाणे आवश्यक आहे. मुंबईच्या प्रश्नाचे स्वरूप काय आहे? ते का निर्माण झाले आहेत? याचा विचार केल्यावरच या प्रश्नांचा गुंता सोडवता येईल.

प्रामुख्याने या वर्षाच्या सुरुवातीपासून मुंबईची वाढत जाणारी लोकसंख्या आणि त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न या विषयाची चर्चा सुरू झाली. यापूर्वी अनेक वेळा अशी चर्चा झाली आणि लोक ती विसरले. या खेपेस असे झाले नाही.

मुंबईची लोकसंख्या गेल्या ८० वर्षात वेगाने वाढत आहे. १९०१ साली मुंबईची लोकसंख्या अवघी ९,२८,००० होती ती १९८१ मध्ये ८२,२७,००० झाली म्हणजे ८० वर्षात जवळ जवळ ९ पटीने वाढली. १९४१ पासून मुंबईची लोकसंख्या दर वीस वर्षांनी दुप्पट होते आहे. कोणत्याही शहराची लोकसंख्या वाढ दोन कारणांनी होते. पहिले कारण, जनन प्रमाण व मृत्यू प्रमाणातील फरक किंवा नैसर्गिक वाढ; दुसरे कारण स्थलांतर हे असते. कोणत्याही मोठ्या शहराच्या वाढीत हे दोन्ही घटक कमीजास्त प्रमाणात कारणीभूत असतात. मुंबईच्या बाबतीत नेमकं काय घडलं हे कोष्टक क्रमांक एक वरून लक्षात येते. १९४१ ते १९८१ या चार दशकात सुमारे ३८,६३,००० लोकांनी मुंबईत स्थलांतर केले तर मुंबईची लोकसंख्या याच काळात नैसर्गिक कारणांमुळे २९,४१,००० लोकांनी वाढली. १९६१ नंतर स्थलांतरीत लोकसंख्येचे एकूण वाढलेल्या लोकसंख्येशी असलेले प्रमाण कमी होत आहे. १९७१ व १९८१ च्या जनगणनेप्रमाणे, स्थलांतरामुळे मुंबईची वाढ एकूण वाढीच्या ५० टक्क्यापेक्षा कमी आहे. आणि हे प्रमाण घटत चालले आहे. किंवा दुसऱ्या शब्दात नैसर्गिक कारणामुळे मुंबईची लोकसंख्या अधिकाधिक प्रमाणात वाढत आहे.

मुंबईतील स्थलांतराला बऱ्याच वेळा प्रादेशिकतेचा रंग दिला जातो. अन्य राज्यातील लोकांना मुंबईत स्थलांतरीत होण्याची परवानगी देऊ नये, अन्य प्रांतियांना मुंबईतून हाकलून द्यावे ही मागणी वारंवार असते. या मागणीमागे डोळा असतो तो प्रामुख्याने दाक्षिणात्यांवर. मुंबईत स्थलांतरीत होणाऱ्यांचे राज्यांच्या अनुरोधाने वर्गीकरण केल्यास साधारण ५८ टक्के लोक जुन्या द्विभाषिक राज्यातून येतात. तर दक्षिण भारतातील केरळ, कर्नाटक व तामिळनाडू या तीन राज्यातून येणाऱ्या लोकांचे प्रमाण अवघे १६ टक्के असते. उत्तर प्रदेश, बिहार या मागासलेल्या राज्यातून येणाऱ्यांचे प्रमाण १२ ते १४ टक्के असते व उरलेले १० ते १२ टक्के लोक उर्वरित भारतातले असतात.

कोष्टक क्रमांक दोनवरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रातून स्थलांतरीत होणाऱ्यात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड व पुणे या जिल्ह्यातून जवळ जवळ ६७ टक्के लोक असतात तर उर्वरित महाराष्ट्रातून अवघे ३३ टक्के. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की आर्थिकदृष्ट्या अविकसित भागातले लोक उदरनिर्वाहाचे साधन मुंबईत सहज उपलब्ध होईल म्हणून स्थलांतर करतात.

मुंबईची लोकसंख्या वाढण्याचे प्रमुख कारण लोकसंख्येची नैसर्गिक वाढ हे पण आहे. गेल्या वीस वर्षात या कारणामुळे झालेली वाढ एकूण वाढीच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त होती. मुंबईतील जननदर १९८० मध्ये दर हजारी २५.८ होता. महाराष्ट्राचा जननदर मुंबईपेक्षा कमी म्हणजे २१.७ होता तर मृत्यूदर अनुक्रमे ८.५ व ६.४ दर हजारी होता. मुंबईची लोकसंख्या महाराष्ट्राच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा हजारी दोनने जास्त होता.

१९८१ च्या जनगणनेप्रमाणे मुंबईचे क्षेत्रफळ ६३० चौरस कि. मी. आहे. मुंबईत लोकसंख्येची घनता दर चौरस हेक्टरी ४७४ आहे.

ही घनता सर्वत्र सारखी नाही. उपनगरी विभागात कमी जास्त आहे. काही प्रगत राष्ट्रातील मोठ्या शहराच्या तुलनेने ही घनता फार नाही उदाहरणार्थ, हॉंगकॉंगच्या शहरी भागात दर चौरस हेक्टरी लोकसंख्येची घनता ५,००० आहे. महाराष्ट्रातील नागरी भागात राहणाऱ्या लोकांपैकी सुमारे ४१ टक्के लोक, तर भारतातील नागरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येपैकी ५ टक्के लोक एकट्या मुबईत रहात होते.

मुबईतील विविध प्रश्न मुबईच्या लोकसंख्येमुळे निर्माण झाले आहेत घराचा प्रश्न, वाहतूक प्रश्न, पाणी, वीज, दळणवळणाची साधने, सार्वजनिक आरोग्याच्या सोई इ. च्या पुरवठ्याचा प्रश्न आज महत्वाचे मानले जातात. विविध सुविधा उपलब्ध करून द्यायचा खर्च मुबईत जास्त आहे

मुबईने महाराष्ट्राला देशाच्या औद्योगिक नकाशात मानाचे स्थान मिळवून दिले आहे. भारतातील लहानमोठ्या एकूण १,४०,८४३ कारखान्यांपैकी १०.८ टक्के कारखाने आणि १७.६ टक्के कामगार १९८० मध्ये महाराष्ट्रात होते आणि महाराष्ट्रातील या कारखान्यांपैकी व औद्योगिक मजुरांपैकी जवळ जवळ ५० टक्के कारखाने आणि मजूर मुबईत आहेत. मुबई महाराष्ट्रातून वजा केली तर महाराष्ट्राचे एकूण उत्पादन, दरडोई उत्पन्नाखाली येईल मुबईने महाराष्ट्राला हे स्थान मिळवून दिले आहे पण याची किंमत महाराष्ट्राला किती द्यावी लागली आहे ? मुबई, ठाणे, पुणे व सोलापूर या परिसरातच महाराष्ट्राचे औद्योगिक क्षेत्र राहिले आहे प्रादेशिक असमतोल निर्माण झालेला दिसून येतो. समतोल विकासाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

## प्रश्न निर्माण का झाले !

आजचे मुबईचे स्वरूप एका प्रचंड लोहचुबकासारखे आहे. आसपासच्या परिसरातील मानवी श्रम, नैसर्गिक साधनसामुग्री मुबईकडे आकर्षिली जाते आहे आज हे शहर आसपासच्या भागाच्या विकासात मदत करणारे राहिलेले नाही. उलट आसपासच्या भागाचे शोषण करणारे शहर झाले आहे. समतोल विकासाची महत्वाची गरज आहे; पण प्रत्येक भागाला ती संधी मिळत नाही. दरडोई उत्पन्नात—मुबईतील व अन्य भागातील—फार मोठा फरक आहे.

मुबई व अन्य मोठ्या शहराच्या बाबतीत आज जे काही आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्न निर्माण झाले आहेत याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे सागता येतील.

१ : या शहराची वाढ होत असताना या शहराच्या विकासाचे योजनाबद्ध कार्यक्रम स्वातंत्र्योत्तर काळात राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवर आखले गेले नाहीत.

२ : ज्या काही योजना या शहराच्या विकासासाठी आखण्यात आल्या त्याची काटेकोर अंमलबजावणी स्वार्थलोलुप आणि भ्रष्टाचारी राजकारणामुळे झाली नाही.

३ : दर पाच वर्षांनी स्थापन होणारी अर्थमंडळे, या शहरातून राज्य व केंद्र सरकारला मिळणारे उत्पन्न लक्षात घेऊन, या शहराच्या विकासासाठी खास आर्थिक तरतुद करत नाहीत. मुबई, कलकत्ता या शहराची लोकसख्या काही राज्यापेक्षा—उदा. मणीपूर, मेघालय

कोष्टक क्र. १

मुंबईतील लोकसंख्येची १९०१ ते १९८१ या काळातील वाढ
( लोकसंख्या हजारात )

| वर्ष | लोक-संख्या | दश-कातली वाढ | नैस-र्गिक वाढ | स्थलां-तरामुळे वाढ | वाढीशी स्थलांतराचे प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|
| १९०१ | ९२८ | —— | —— | —— | |
| १९११ | ११४९ | २११ | –१२९ | ३५० | १५८ ३७ |
| १९२१ | १३८० | २३२ | –१६८ | ४०० | १७२ ४१ |
| १९३१ | १३९८ | १७ | –५८ | ७५ | ४४१.१७ |
| १९४१ | १८०१ | ४०४ | ४ | ४०० | ९९ ०० |
| १९५१ | २९९४ | ११९३ | २४३ | ९५० | ७९.६३ |
| १९६१ | ४१५२ | ११५८ | ५५८ | ६०० | ५१ ८१ |
| १९७१ | ५९७२ | १८१९ | ९३३ | ८८६ | ४८ ७० |
| १९८१ | ८२०२ | २२३० | १२०३ | १०२७ | ४६ ०५ |

इ. पेक्षा—जास्त आहे हे विसरून चालणार नाही

४ : नियोजन मडळ या मोठ्या शहराचा विचार करत नाही. नियोजन मडळाचा भर प्रादेशिक नियोजनावरच असतो.

५ : राज्य सरकारनी या शहराचे प्रश्न महत्वाचे मानलेच नाहीत. परिणामत. एकाच वेळी अनेक शहराच्या महानगरपालिका बरखास्त केल्या होत्या.

६ : या शहराच्या महानगरपालिका कार्यक्षम नाहीत. गैरव्यवहार राजकारण, वैयक्तिक स्वार्थ इ याची बजबजपुरी माजली आहे. या शहराची वाढ, झोपडपट्ट्याची वाढ या सस्थाना रोखता आलेली नाही. स्वकर्तृत्वावर शहराचा एखादा प्रश्न उदा. गृहनिर्माण, वहातूक, पाणी पुरवठा या सस्था सोडवू शकल्या नाहीत.

७ : सर्वसाधारपणे या शहराचा प्रश्न बेघराचा प्रश्न असतो. गृहनिर्माणासाठी हुडकोसारख्या सस्था स्थापन केल्या पण या सस्था घराचा प्रश्न पूर्णपणे सोडवू शकल्या नाहीत

८ : या शहराच्या प्रश्नाच्या गाभ्यापर्यंत पोहचण्याचा प्रयत्नच झाला नाही. वरवरचे उपाय करण्यात आले. या योजनामध्ये जुळी शहरे उभारायला प्रोत्साहन देण्यात आले

आज मुबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली या शहरात जे प्रश्न निर्माण झाले आहेत तसेच प्रश्न इतर शहरातपण निर्माण होतील. आज एक—दोन शहरापुरती मर्यादित असलेली ही समस्या योग्य काळजी न घेतल्यास राष्ट्रव्यापी होणार आहे हे लक्षात ठेऊन या समस्येवर उपाय योजना करणे आवश्यक आहे.

आजकाल विशेषत: पावसाळ्यात मुबईत घरे कोसळून अनेक लोक मृत्युमुखी पडल्याच्या बातम्या वाचायला मिळतात. जाराचा पाऊस झाला की सर्व वहातूक व्यवस्था विस्कळित होते. दूषित पाण्यामुळे काविळीसारखे रोग फैलावतात भर कोर्टात गोळ्या घालून खून होतात, मुबई काळ्या पैशाची खाण बनली आहे. हे सगळ का घडत आहे ? जगातील अन्य शहरातील लोकसख्येच्या घनतेपेक्षा मुबईची

घनता कमी आहे, मग असे का घडावे ?

याचे कारण एकच, आपण शहर विकासशास्त्राचा पुरेसा अभ्यास केलेला नाही. हे शास्त्र आपण अजून पूर्णपणे आत्मसात केलेले नाही. आपल्या जवळ असलेल्या साधनाचा वापर योग्य पद्धतीने आपण करत नाही. उदाहरणार्थ, मुबईच्या समुद्र किनाऱ्याचा, खाड्याचा वापर वहातुकीसाठी उपयोग करून अन्य साधनावरचा वाहतुकीचा ताण कमी करता येईल. आज मुबईत सुमारे ३,८६१ एकराचे रिकामे भूखड उपलब्ध आहेत. या भूखंडावर सुमारे ३५ लाख लोकांची घरांची सोय करून देता येईल. अधिक लोकसख्येला पुरेशा आवश्यक सुविधा करून देता येतील याची कल्पना असल्यामुळे मुबई महानगरपालिका जागतिक बँकेला पटवून देऊ शकते की, मुंबईची लोकसख्या १२० लाखापर्यंत वाढली तरी सर्वांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देता येतील

आज मुबईत निवासी घरांचा प्रश्न तीव्र झालेला आहे आणि हा प्रश्न प्रमुख मानला जातो. मुबईत कारखाने एका बाजूला व घरे एका बाजूला. त्यामुळे वहातुकीचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो. मुबईतील प्रश्न खरे तर बहुमजली इमारतीमुळेही निर्माण झालेले आहेत. या मोठ्या उच इमारतीना पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पप, लिफ्ट इ. सुविधावर तर खर्च करावाच लागतो; पण या इमारतीच्या चारी बाजूना मोकळी जागा सोडावी लागते, अधिक रुंद रस्ते उपलब्ध करून द्यावे लागतात एक मजली घरे अधिक फायदेशीर ठरतात ही गोष्ट सरकारच्या लक्षात आलेली आहे या घराना वीज, पाणी, साडपाणी इ. ची सोय कमी खर्चात पुरवता येते. ही गोष्ट लक्षात घेऊनच ' सिडको 'ने लहान घरांचा पुरस्कार केला आहे

आज मुबईतली सुमारे ६० टक्के लोकसख्या झोपडपट्टीत राहते या झोपडपट्ट्यानी अवघे दोन टक्के क्षेत्र व्यापले आहे. महानगरपालिकेच्या एकूण खर्चापैकी किती खर्च या साठ टक्के लोकासाठी केला जातो ? या झोपडपट्टीवासियाना मिळणाऱ्या सुविधा, झोपडपट्टीतली परिस्थिती पहाता आजपर्यंत पुरेसा खर्च या साठ टक्के लोकसंख्येवर झालेला नाही असे म्हणायला हरकत नसावी. या मोठ्या इमारती बाधायची परवानगी देताना चालणारी लाचलुचपत, बॅकबेरिक्लमेशन, धारावी भूखड इ. प्रकरणायुळेसुद्धा मुबईचे प्रश्न बिकट झाले आहेत.

## सुचवले जाणारे अपुरे उपाय

आज मुबईचे प्रश्न विचारात घेतले जातात ते अत्यत सकुचित दृष्टिकोनातून—' मुबईची वाढत असलेली लोकसख्या आणि त्यामुळ निर्माण झालेले प्रश्न ' अर्थात यावर सुचवलेले उपाय पण मर्यादित आणि अपुरे असतात. मुबईत राहणाऱ्यांना ओळखपत्रे दिली जावीत, ज्याच्या जवळ ओळखपत्रे नाहीत त्यांना मुबईत राहण्याची परवानगीच देऊ नये. यासाठी सचार स्वातत्र्यावर बधने घालावीत व हे परवाने द्यावेत असा आग्रह धरला जातो. आसाम आणि पजाबच्या प्रश्नांनी राष्ट्रीय ऐक्याला दिलेले आव्हान अजून पूर्णपणे विरलेले नाही. अशा परिस्थितीत मुबई प्रवेशासाठी अंतर्गत परवाना सक्तीचा करणारा कायदा करणे योग्य ठरणार नाही. यामुळे राष्ट्रीय ऐक्य व एकात्मतेला बाधा येईल. असे नवीन कायदे करण्याऐवजी जुने अशा प्रकारचे कायदे असतील तर ते रद्द करण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. आज महाराष्ट्रात असे कायदे झाले तर उद्या बगालमध्ये तर परवा तामिळनाडूत अशा कायद्यांची मागणी होईल आणि मग एक दिवस असा येईल की, प्रत्येक राज्याचा काही भाग परप्रांतियांसाठी निषिद्ध क्षेत्र असेल. मुबई शहर असो वा कलकत्ता अथवा मद्रास, या प्रत्येक शहराच्या विकासासाठी अन्य प्रांतियांचा हातभार लागला आहे, हे विसरून चालणार नाही.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, परवाना पद्धत सुरू करून मुबईची दुरवस्था बदलणार आहे का? याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. गेल्या तीस वर्षात मुबईची लोकसंख्या सुमारे ५२ लाखांनी वाढली. यापैकी नैसर्गिक कारणामुळे निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या वाढली (सुमारे २७ लाख) गेल्या चाळीस वर्षात नैसर्गिक कारणामुळे वाढणाऱ्या लोकसख्येचे प्रमाण वाढत आहे. स्थलातराच्या जोडीला कुटुब नियोजनावर जोर देणे, कुटुब नियोजनाचा प्रसार करणे आवश्यक आहे.

स्थलातरावर बधने घालून आपण प्रश्नाच्या मुळापर्यंत पोचतच नाही. मुबईचे प्रश्न निर्माण का झाले आहेत हे लक्षात घेऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

मुबईचे प्रश्न सोडवण्यासाठी जी उपाययोजना करायची ती दोन प्रकारची असली पाहिजे. मुबईत निर्माण झालेले प्रश्न, जे तातडीने सोडवणे आवश्यक आहेत, अशा प्रश्नासाठी अल्पकालीन उपाय योजले पाहिजेत. हे प्रश्न या शहराचे बाबतीत तसेच अन्य शहराच्याबाबतीत भविष्यात निर्माण होऊ नयेत म्हणून दीर्घकालीन उपाय योजले पाहिजेत.

### (१) अल्पकालीन उपाय

गेल्या दहा वर्षातील मुंबईत स्थलातरीत–विशेषत. महाराष्ट्रातून स्थलातरीत–होणाऱ्या लोकाची सख्या कमी झाली आहे याची प्रमुख कारणे दोन आहेत. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना राबवली जात आहे. या योजनेद्वारा ग्रामीण भागातील लोकाना ग्रामीण भागातच रोजगार उपलब्ध करून दिला जात असल्यामुळे लोक कमी प्रमाणात मुबईत स्थलातर करतात. बगलोर, हैद्राबाद, पुणे, नाशिक, सोलापूर इ. शहरातून उद्योगधदे वाढत आहेत. परिणामतः आसपासच्या भागातून लोक या शहरात स्थलातर करत आहेत. या शहराची वाढ गेल्या दहा वर्षात ४० टक्क्याच्या आसपास झालेली आहे.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देणारी योजना परिणामकारकरीत्या राबवल्यास मुबईतील स्थलातर कमी होईल तसेच मुबईकडे लोकाना आकर्षित करून घेणारी कार्यालये, कारखाने मुबईबाहेर गेले तर लोक अन्यत्र स्थलांतरीत होतील.

काही कपन्या आपली मुख्य कार्यालये मुंबईत असणे प्रतिष्ठेची बाब मानतात. काही निमसरकारी, सरकारी आणि खाजगी कपन्याची कार्यालये अन्यत्र गेली तरी त्याच्या कार्यक्षमतेत फरक पडणार नाही. उलट या कार्यालयांचा व्यवस्थापन खर्च कमीच होईल. उदा. कोकण

विकासाशी सबधित असलेली कार्यालये मुंबईबाहेर, रत्नागिरी जिल्ह्याच्या आसपास गेली तर कोकणचे प्रश्न सोडवण्यास अधिक मदतच होईल. आयुर्विमा महामडळाचे कार्यालय बाहेर गेले तरी काही फरक पडणार नाही. या कार्यालयाच्या जोडीला काही कारखाने, गिरण्या मुबईबाहेर हलवता येतील का याचासुद्धा विचार झाला पाहिजे. यासाठी सरकारने महाराष्ट्राच्या अन्य भागात विकसित भूखड, वहातूक सुविधा, पाणी पुरवठ्याच्या सोई इ. उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या कारखान्याच्या स्थलातरामुळे मुबईतील प्रदूषण आणि गर्दी कमी होईल. याच्या जोडीला मुबईत नवीन उद्योगाना यापुढे पूर्णतः बदी घातली पाहिजे.

मुबईतील दुसरा महत्त्वाचा प्रश्न घराचा आहे. साठ टक्के लोकसख्या झोपडपट्टीत अत्यत वाईट स्थितीत रहात आहेत. या लोकाना सुयोग्य घरे उपलब्ध करून द्यायला हवीत. त्याच्या जोडीलाच बेघराना घरे उपलब्ध करून द्यायला हवीत. या दोन दृष्टिकोनातून हा प्रश्न सोडवला पाहिजेच. पण आज हा प्रश्न सोडवला जात असताना काळ्या पैशाचा प्रश्न निर्माण झाला आहे. गृहनिर्माणातून काळा पैसा निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सरकारी पातळीवर निर्माण झालेल्या गृहनिर्माण सस्था काळा पैसा कमी करू शकल्या नाहीतच, उलट नवीन काही प्रश्न निर्माण झाले. स्वत.च्या मालकीचा निवारा असावा, मुलाबाळासह थोडफार सुखासमाधात राहता यावे यासाठी अडलेले नडलेले लोक हजारो रुपये देऊन घर घेण्यासाठी धडपडतात. पण त्याच्या पदरात पडते ते अनेक गैरसोयी असलेले चार भिंतीचे खुराडे. गृहनिर्माणातील हे गैरव्यवहार जोपर्यंत थाबत नाहीत तोपर्यंत हे प्रश्न सुटणार नाहीत.

सरकारच्या ताब्यात जी काही मोकळी जमीन आहे त्या जमिनीवर सरकारने स्वस्त दरात घरे बाधून द्यायची योजना आखली पाहिजे. ही घरे कमी उत्पन्न गटातल्या लोकांना परवडणारी असली पाहिजेत. अशा घरामधून झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकाना हालवून क्रमाक्रमाने झोपडपट्ट्या सुधारता येतील. आज मुबईत ज्या तीनएकशे मोडकळीस आलेल्या इमारती आहेत, या इमारती पडण्याची वाट न पहाता, त्या पाडून तिथे सरकारने योग्य अशी घरे बाधावीत यामुळे भविष्यात या इमारती पडून होणारी जीवित व वित्त हानी वाचेल. थोडक्यात अल्पकालीन उपाय खालीलप्रमाणे सुचवता येतील.

१. सपूर्ण देशभर परिणामकारकरीत्या रोजगार हमी योजना राबवावी.

२. नव्या उद्योगाना मुबईत परवाने देऊ नयेत

३. मुबईबाहेर महाराष्ट्रातील अन्य शहरात जे उद्योग जायला तयार आहेत त्याना सर्व प्रकारची आवश्यक ती मदत करणे.

४. उच्च इमारतीना परवानगी न देणे

५. जुनी मोडकळीस आलेली घरे पाडून तिथे व उपलब्ध मोकळ्या जागी घरे बाधून देण्यासाठी सहकारी तत्त्वावरील गृहनिर्माण सस्थाना प्रोत्साहन देणे

६. वरील सर्व योजना प्रामाणिकपणे राबवणे.

या सर्व उपायामुळे सगळे प्रश्न ताबडतोब सुटणार नाहीत पण सौम्य नक्कीच होतील आणि यासाठीच दीर्घकालीन उपाय योजणे आवश्यक आहे.

**कोष्टक क्र. २**

**मुंबईत अन्य राज्यातून व महाराष्ट्रातील जिल्ह्यातून झालेले स्थलांतर ( शेकडा )**

| राज्य | १९६१ ची जनगणना | १९७१ ची जनगणना | जिल्हा | १९६१ च्या जनगणने-प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४१·६ | ४३ ३ | रत्नागिरी | ४४·५ |
| गुजराथ | १६ ९ | १५·५ | पुणे | १२·७ |
| उत्तर प्र | | | सातारा | १०·६ |
| बिहार | १२ २ | १४ ५ | रायगड | ९·८ |
| कर्नाटक | ६ ४ | ७·६ | अन्य | २२ ४ |
| केरळ व तामिळनाडू | ५·४ | ८ ४ | | |
| इतर राज्ये | १७·५ | १० ७ | | |

## (२) दीर्घकालीन उपाय

नागरीकरण ही एक सातत्याने घडत जाणारी प्रक्रिया आहे. आर्थिक विकासाबरोबर नागरीकरण होत जाते. नागरीकरण होणे म्हणजे लोकानी उठून शहरात जाणे एवढाच मर्यादित अर्थ नाही. नागरीकरण होणे याचा अर्थ परंपरा, रूढी, बुरसटलेल्या विचाराच्या जोखडाखाली असलेला ग्रामीण समाज मुक्त करणे. उत्पादन तत्र, आचार, विचार यात बदल घडवून आणणे. हे घडून येत असताना आज मुबई, कलकत्ता इ. शहरानी जसे प्रश्न निर्माण केले आहेत तसे प्रश्न निर्माण होऊ नयेत याची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी शहरे कशी असावीत याविषयीचे राष्ट्रीय धोरण ठरवणे ही दीर्घकालीन उपायाची पहिली पायरी असेल.

आज शहरीकरणामुळे मोठी अवाढव्य शहरे वाढत आहेत. या अवाढव्य शहराकडे आसपासच्या भागातून साधन सामुग्रीचा ओघ वहातो आहे अविकसित भागाच्या वाळवटातील ही थोडी फार हिरवळीची ठिकाणे आहेत. या हिरवळीच्या जागानी हिरवळ अन्यत्र वाढू दिलेली नाही उलट वाळवट अधिक वैराण करायला हातभार लावला.

भारताचा आर्थिक विकास साधण्यासाठी, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी, शहरी व ग्रामीण भागाच्या उत्पन्नातील अतर कमी करण्यासाठी आजची शहरे निरुपयोगी आहेत आज आपल्याला गरज आहे ती दुय्यम शहराची ( Secondary cities ) किंवा सी. जे. गॅलपीन यानी सुचवलेल्या Rurban या कल्पनेशी मिळत्या जुळत्या जनपौराची.

आज 'जनपौर' ही कल्पना स्पष्ट नाही. या प्रकारच्या शहराची रचना कशी असावी, लोकसख्या किती असावी याबद्दल अभ्यास आणि चर्चा होणे आवश्यक आहे. असे असले तरी गरज लक्षात घेऊन ही जनपौरे कशी असावीत याबद्दलची रूपरेखा सागता येईल.

'जनपौर' ( जनपद = ग्रामीण ) + ( पूर = शहरे नगरे )

ग्रामीण व शहरी भागामधला दुवा साधणारी ही 'जनपौरे' असावीत जनपौराची लोकसख्या आज प्रश्न निर्माण करणाऱ्या शहरापेक्षा कमी असावी ती किती असावी याबद्दल निश्चित सख्या सांगता येणार नाही पण सूत्र रूपाने सागता येईल की आकारमानाचे पुरेसे फायदे मिळतील इतकी असावी. अर्थात या आदर्श लोकसख्येत बदल होतील वहातूक सुधारणा होतील, नवीन शोध लागतील तशी या जनपौराची पर्याप्त लोकसख्या वाढेल. स्थानिक स्वराज्य सस्था ज्या लोकसंख्येला पुरेशा सार्वजनिक सुविधा कमीत कमी खर्चात उपलब्ध करून देऊ शकतील एवढीच लोकसख्या असावी.

जनपौरात कोणते उद्योग सुरू करावेत हे या जनपौराच्या आसपास कोणता कच्चा माल उपलब्ध आहे अथवा नैसर्गिक साधनसामुग्री उपलब्ध आहे यावर अवलबून असेल. सरकार या जनपौराच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारतात यावर उद्योगाचा विकास अवलबून असेल. या जनपौरात सुरू होणाऱ्या उद्योगाना दिल्या जाणाऱ्या सवलती, रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा इ. सुविधा या सबधीच्या धोरणावर येथील उद्योगाचा विकास आणि प्रकार अवलबून असेल. आसपासच्या भागातील उद्योगाना प्रोत्साहन देणारे उद्योग या जनपौरात सुरू करावेत.

ग्रामीण भाग व शहरी भाग याच्यातला दुवा साधण्याचे कामही जनपौरे करतील ही जनपौरे शेतमाल आणि औद्योगिक वस्तूच्या बाजारपेठा असतील. औद्योगिक क्षेत्र जनपौरामध्ये असल्यामुळे शेतमालाची मागणा वाढेल, शेतमालाच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळेल. ग्रामीण व शहरी भाग जोडण्यासाठी जनपौरे वहातूक केंद्रे बनतील. या वहातूक केंद्रामुळे बाजाराचा विस्तार होईल. ही जनपौरे शोषक नसतील पोषक असतील या जनपौराच्या आसपासच्या भागात राहणाऱ्या लोकाचे उत्पन्न, विशेषत ग्रामीण भागातील लोकाचे उत्पन्न वाढेल. याचा परिणाम वस्तू आणि सेवांची मागणी वाढेल. शेती आणि अन्य नैसर्गिक साधन सामुग्रीचा पुरेपूर वापर केला जाईल.

जनपौराच्या मर्यादित लोकसख्येमुळे व्यक्ती—व्यक्तीमध्ये अलिप्तता निर्माण होणार नाही आज मोठ्या शहरातून लोकवस्ती वाढत गेली तसतशी व्यक्तीव्यक्तीमध्ये अलिप्तता निर्माण झाली आहे. व्यक्तीव्यक्तीच्या संबधात कृत्रिमता निर्माण झालेली आहे. मुबईसारख्या शहरांतील 'ब्लॉक' सस्कृतीने माणसाच आयुष्यच ब्लॉक केलं आहे. प्रत्येक वस्तूच्या उपयोगितेला महत्त्व आले आहे. लोक समाजाबद्दलची जबाबदारी विसरले आहेत, जनपौरांमधून असे असणार नाही जनपौराचा आकार तिथली लोकसंख्या आणि वातावरण असे असेल की, ग्रामीण भागातील रूढी परपरा याचा त्याग करून नवीन विचार स्वीकारण्याची तयारी असलेला, नैतिकता व सामाजिक जबाबदारी जाणणारा, विकासाभिमुख नागरीक तयार होईल.

सपूर्ण देशात अशा जनपौरांची एक साखळी निर्माण होणे आवश्यक आहे असे झाले तरच आज नागरीकरणाच्या नावाखाली दोन चार ठिकाणी लोकाचे पुजके साठलेले दिसून येतात तसे दिसणार नाहीत खऱ्या अर्थाने नागरीकरण होईल लोकाचे व्यावसायिक कौशल्य, शैक्षणिक पात्रता, आरोग्य सुविधा इ. ची वाढ होईल

जनपौराची ही स्थूल कल्पना आहे या संबधात अधिक चर्चा होणे, विचार होणे आवश्यक आहे.

'जनपौर' हा पुढे मोठ्या शहराचे प्रश्न निर्माण होऊ नयेत म्हणून एक प्रभावी उपाय ठरेल पण आज जे काही प्रश्न निर्माण झाले आहेत किंवा जनपौरे परिपूर्ण होईपर्यंत जे प्रश्न निर्माण होतील ते सोडवण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजणे आवश्यक आहे

केंद्र सरकारने या २५ लाखापेक्षा जास्त लोकसख्या असलेल्या शहराच्या बाबतीत तिथले औद्योगिकरण, वहातूक व्यवस्था अन्य सुविधा इ बाबतीत दीर्घकालीन धोरणे आखून त्याची अमलबजावणी करण्याची सक्ती राज्यसरकारवर करावी. यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारला पुरेशी आर्थिक मदत द्यावी.

दर पाच वर्षांनी नेमल्या जाणाऱ्या अर्थमडळानी या शहराचा विचार वेगळा करावा या शहराच्या विकासासाठी योग्य ती आर्थिक तरतूद करून ती राज्य सरकार व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करून द्यावी या शहराचा विचार अर्थमडळांना करता यावा म्हणून योग्य ती कायदेशीर तरतूद करावी.

राज्य स्तरावर नियोजन करताना राज्यातील या मोठ्या शहराचा वेगळा विचार करून या शहराच्या विकासाच्या योजना आखाव्यात

आज या शहराचे प्रश्न सोडवण्यासाठी जुळी शहरे स्थापन केली जात आहेत. यामुळे प्रश्न सुटणार नाहीत उलट नवीन प्रश्न निर्माण होतील हे लक्षात घेऊन अशा योजना आखू नयेत.

मोठ्या शहराच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. असे झाले तर काही वर्षातच हे प्रश्न अधिक बिकट होतील. यासाठी या प्रश्नावर योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे

□


## राजहंस प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सास्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# सामाजिक वनीकरण कसे असावे ?

हेमंत शां. बेडेकर
**कृषि संशोधन अधिकारी, एम्. एस्. आर. फौंडेशन, आसरे, ता. डहाणू, जि. ठाणे**

**गे**ल्या ५।६ वर्षामध्ये आपल्या देशात 'सामाजिक वनीकरण' या विषयावर अनेक परिसवाद, चर्चा, प्रयोग होत आहेत. खरं तर वनविभागाचे दोन भागात रूपांतर करून 'सामाजिक वनीकरण' व 'वन' ही दोन स्वतंत्र खाती करण्यात आली. त्यातील सरकारी नोंदीनुसार 'वन' म्हणून नोंदलेल्या जमिनीवर खरोखर जंगल वाढवणे ही जबाबदारी वन खात्यावर आणि 'लोकाभिमुख वनीकरण' ही जबाबदारी 'सामाजिक वनीकरण' विभागाकडे देण्यात आली.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ३५ वर्षांनी वनखात्याची विभागणी करावी असा विचार पुढे आला. त्यापूर्वी एकाच खड्डयात दरवर्षी झाडे लावणे या विषयावर अनेक व्यंगचित्रे, विनोद वगैरे गोष्टी येऊन गेल्या. सामाजिक वनीकरण खाते निर्माण होऊनही पाच वर्षे होत आली. त्यासाठी वेगवेगळया देशाकडून एकेका प्रांतातील वनीकरण प्रोत्साहनासाठी आर्थिक मदत घेण्यात आली. सामाजिक वनीकरण खात्याची जबाबदारी लोकशिक्षणातून वनीकरण अशी होते. यासाठी काही वर्षे घालविल्यानंतर त्याचे मूल्यमापन करण्याची वेळ आलेली आहे.

हे मूल्यमापन करीत असताना सामाजिक वनीकरणाने आम्हास नेमके काय दिले, आम्ही काय घेतले आणि आम्ही पुढील पिढीसाठी काय जतन करून ठेवत आहोत, याचा उहापोह होण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची चर्चा यातून व्हावी एवढीच माफक अपेक्षा लेखकाने हे लिहीत असताना ठेवलेली आहे.

सामाजिक वनीकरणाचे आजचे चित्र काय आहे ते पाहू या. खात्याच्या रोपवाटिकेत ठराविक प्रकारची रोपे मोठ्या प्रमाणात तयार केली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने सुरू, सुबाभुळ व निलगिरी व काही प्रमाणात बाबू ही रोपे अत्यंत स्वस्त दरात म्हणजे जवळजवळ फुकटच विकली जातात. त्यामुळे तीन प्रकारचे शेतकरी या रोपाकडे आकर्षित होतात एक, ज्याला आत्ताची पैसा देणारी ऊसासारखी किंवा कपाशीसारखी पिके परवडेनाशी झाली आहेत असा सधन तथाकथित प्रगतीशील शेतकरी. दुसरा वर्ग काहीही फुकट मिळते ना, मग चला घ्या, अशी वृत्ती असलेला शेतकरी. रोपवन अधिकाऱ्याला कोटा पूर्ण करावयाचा असतो. यालाही मी फुकटात मिळवले याची शेखी मिरवायची असते, पुढारीपण गाजवायचे असते त्यामुळे तो मिळेल त्या दर्जाची रोपे लावत सुटतो. तिसरा वर्ग असतो खरोखरच विचार करून रोपे लावणाऱ्या शेतकऱ्याचा. हा शेतकरी खात्याकडूनची रोपे घेतो, स्वतःची तयार करतो किंवा महाग असली तरी माहितगार माणसाकडून घेतो; पण असे करणारा शेतकरी फार थोडा आहे. बहुतेकजण पहिल्या दोन वर्गातच मोडतात.

महाराष्ट्रात, गुजरातेत व कर्नाटकात तरी असे आढळते आहे की, एकच एक प्रकारची झाडे शेतकऱ्याना लावायला सांगितली जातात, शेतकरी लावतात. मग सुरूची, सुबाभुळीची नाहीतर निलगिरीची शेती दिसते आहे. यांना सुरू वन, निलगिरी वन किंवा सुबाभुळ वन म्हणणे हे योग्य होणार नाही. कारण 'वन' या संज्ञेबरोबरच पर्यावरण हा शब्द निगडीत आहे. एखादे वन वाढत असताना त्या परिसरात निसर्गतः वाढणारी झाडेझुडपेही त्यात समाविष्ट असतात. येथे तसा प्रकार नाही. किंबहुना मुद्दामच एकाच प्रकारची झाडे लावण्याबद्दल आग्रह धरलेला आढळतो. मग त्याच्याही पुढे जाऊन व्यापारी तत्त्वावर हजारो एकरातून केलेली नाशिकसारखी निलगिरीची लागवड पुढे येते. या लागवडीच्या प्रवर्तकाची मुलाखत काही महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाली होती. त्या मुलाखतीत त्याना विचारलेल्या प्रश्नाना उत्तर देताना त्यानी स्पष्टपणे सांगून टाकले की, आम्हाला पर्यावरणाशी देणेघेणे काहीही नाही. आम्हाला यातून मिळणाऱ्या पैशाशी मतलब आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, आम्ही कालवा परिसरातील ऊसाच्या लागवडीने काहीही शिकलेलो नाही. ऊस भरपूर वाढावा म्हणून भरपूर रासायनिक खते व भरपूर पाणी असे एका पिढीने केले यातून दुसऱ्या पिढीला हे अनुभवायला मिळाले की, जमीनच मुळी ऊसासाठी निरुपयोगी झाली आणि मग यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून जागतिक बँकासारख्या सस्थाकडून कर्ज काढून योजना आखण्याची तयारी. पण हेच जर, जेव्हा काही भागात जमीन खराब झाल्याच्या तक्रारी यावयास लागल्या, तेव्हाच, सावध होऊन पाऊले उचलली असती तर ? पण नाही. तीच गत या वनशेतीची होण्याची चिन्हे दिसताहेत.

ठीक आहे ! पर्यावरणाचा विचार तुमच्या आवाक्याबाहेरचा आहे. पण निदान जे पीक आपण लावावयास निघालो आहोत त्याचा तरी विचार कराल की नाही ? वनशास्त्राच्या सिद्धांतानुसार एक पीक पद्धती ही घातक आहे. म्हणून नुसती निलगिरी किंवा सुबाभुळ किंवा सुरू हे आज जरी खूप आकर्षक वाटले तरी कालांतराने घातक ठरणारे प्रकार आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आफ्रिकेतील दुष्काळ. आज या झाडाच्यावरील रोग, किडी वगैरेंचे आमचे ज्ञान हे बहुतांश परदेशातील माहितीवर अथवा भारतातील अगदी थोड्या ठिकाणी केलेल्या प्रयोगावर अवलंबून आहे. पण एखादा माणूस जसा नवीन गावात गेल्यावर त्या ठिकाणच्या चांगल्या, वाईट गोष्टींना रूळतो आणि बळीही पडतो, तसेच झाडाचेही आहे. तीही तिथल्या रोग, किडीना रूळतात, आणि बळीही पडतात. कधीही न अनुभवलेले रोगही पाहावयास मिळतात. कधी न लागलेली कीडही पोखरू लागते. मग यासाठी उपाय म्हणून औषधे, ती उपयोगी पडेनाशी होतात म्हणून जालीम औषधे व शेवटी ते पीक, ते झाड बदनाम. मला वाटते नीरा खोऱ्यातील गेल्या आठ–दहा वर्षातील कापसाचा इतिहास याविषयी चांगला मार्गदर्शक ठरेल. पण म्हणून वनशेती वाईट आहे का ? नाही, मुळीच नाही. पण काही पथ्ये पाळली तर. ही पथ्ये आपण थोडी नंतर पाहू या.

आता दुसऱ्या प्रकारच्या शेतकऱ्याकडे पाहू. या मंडळींना कोठेही काहीही फुकट किंवा स्वस्तात मिळाले की ही मंडळी निघाली. रोपे स्वस्तात हे पुढे ! बी फुकट हे पुढे, पण स्वस्तात हे पुढे. खरोखर सव-

लतीच्या दरात बी, रोपे, औषधे वस्तू सरकार कोणासाठी ठेवते, आणि त्याचा फायदा कोण घेतो हा एक सशोधन प्रकल्पाचा विषय आहे. पण शासनाने ही 'सबसिडी' पद्धत जास्त दिवस चालवून त्या त्या पद्धतीमागील हेतू बदनाम करू नयेत आणि या सवयीपण लावून ठेवू नयेत एक दिवस ही कुऱ्हाड शासनावरच कोसळणार आहे. या मडळीना रोपे जरूर स्वस्तात मिळतात. रोपवन अधिकाऱ्याला त्याचे उद्दिष्ट सफल केल्याचे समाधान मिळते. पण ती रोपे कशी असतात, त्या रोपाचे पुढे काय होते याचा कोणी विचारही करीत नाही· कमी पावसाच्या प्रदेशात पॉलीबॅगमधील रोपेच यशस्वी होतात नुसती मुळासकटची (नेकेड) नाही, हे वनखात्याने व शेतकऱ्यानी अनेकदा अनुभवूनसुद्धा पिशवीतील रोपे न देता नेकेड रोपे दिली जातात. देणाऱ्याला खूप वाटल्याचे समाधान, घेणाऱ्याला स्वस्तात किंबहुना फुकट मिळाल्याचे समाधान ज्या रोपाचे निर्मितीमूल्य किमान २० ते २५ पैसे आहे. ती रोपे ५ ते १० पैशांना का विकावयाची याचे समाधानकारक उत्तर कोणीच देऊ शकत नाही दरवर्षी कोटयावधी रुपयाची रोपे काही लाख रुपयात विकणाऱ्या 'सामाजिक वनीकरणाने' या रोपाचे पुढे काय झाले याची माहिती घेण्यासाठी काही हजार रुपये खर्च करावेत व या पहाणीचे निष्कर्ष लोकांसमोर ठेवावेत. मध्यंतरी अशीच बेकार तरुणासाठी जागा, झोपडी, रोपे व पाणी देण्याची योजना निघाली होती. पण त्याचे काय तीन तेरा वाजले हे जगजाहीर आहे. ज्याना खरोखर वनीकरणाबद्दल प्रेम होते ते बसले तसेच. अशा जमिनी मिळाल्या राजकीय पुढाऱ्याना आणि त्यांनी नवीन लागवड सोडाच पण जुनी झाडेसुद्धा तोडली आणि बाभळीसारखी नैसर्गिकरीत्या वाढलेली झाडेसुद्धा तेथे पाहावयास मिळेनात. म्हणून योजना बंद करावी लागली. याविषयी लिहू तेवढे थोडेच आहे

पण मजुरखर्च परवडत नाही, खते औषधे परवडत नाहीत म्हणून ज्या शेतकऱ्याने वनशेती करावयाचे ठरवले त्याची जमीन, पाणी, हवामान यातल्या कोणत्याही गोष्टीकडे गांभीर्याने न पाहता कोणतीही रोपे लावण्याचा सल्ला देऊ नये. ठाणे जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यालगतच्या प्रदेशात के-८ ही सुबाभुळीची जात नीट वाढत नाही, हे लक्षात येऊनसुद्धा दुसऱ्या जाती आणणे किंवा येथे निर्माण करणे आम्हाला जमले नाही पण आम्ही मात्र सुबाभुळीचे नको तेवढे कौतुक करीत बसलो. काही विद्वानांनी तर परदेशातल्या प्रवासातील तुटपुंज्या माहितीवर 'लुकेना-एक कल्पवृक्ष' अशी पुस्तके लिहिली व साहित्य सस्कृती मंडळाने ती छापलीही. काही सामाजिक पुढाऱ्यानी ६'/७' उंचीची सुबाभुळीची रोपे विकून भरपूर धंदाही केला. पण त्या झाडाचे जे वर्णन केले होते की, जे प्रत्यक्षात अतिरंजितच होते, त्यामुळे शेतकरी भुलला आणि फसला. काळया जमिनीत सुबाभूळ एका वर्षात १५-२० फुटापर्यंत वाढते. हे लेखकाने प्रत्यक्ष अनुभवले आहे पण त्याचबरोबर सुबाभूळ जर नुसत्या पावसावर लावली तर एका वर्षात ४-५ फुटसुद्धा वाढत नाही, हेही अनुभवले आहे. सुबाभूळ या झाडाविषयी निष्कारण गैरसमज वाढवले गेले. खरे तर त्यात त्या झाडाचा काहीही दोष नव्हता पण त्याच्याही काही मर्यादा आहेत हे कोणी लक्षातच घेतले नाही.

आमच्याकडे कोणतेही ज्ञान हे अमेरिका किंवा फॉरेनमार्गे आले तरच ते ग्राह्य धरावयाचे असा अलिखित नियम आहे असांसाठी म्हणून हा दाखला. अमेरिकेतील 'नॅशनल रिसर्च कॉन्सिल' हे अनेक प्रकारच्या तज्ज्ञांना एकत्र आणून वेगवेगळया विषयावरची पुस्तके प्रसिद्ध करीत असते. त्यापैकी गेल्यावर्षी सुरू किंवा कॅज्युरीनावर एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे त्याच्या प्रस्तावनेत असे स्पष्ट नमूद केले आहे की, 'हे पुस्तक लिहिण्यामागचा उद्देश कॅज्युरीना (सुरू) हे झाड विषुववृत्तीय विभागातील वनविकासासाठी एकमात्र झाड आहे, हे सांगणे नाही. कोणतेही एक झाड किंवा एकाच प्रकारची झाडे वनवाढीच्या समस्येस उत्तर देऊ शकणार नाहीत. याही पुढे जाऊन त्यात असे म्हटले आहे की, 'कोणतेही शासन, समाज, संस्था, संशोधक अथवा व्यक्तींनी वनीकरणाचे प्रकल्प हाताळताना हे लक्षात घेतले पाहिजे की, अशा प्रकारच्या बाहेरच्या झाडांकडे सर्वात शेवटचा प्रयत्न म्हणून पहावे. सर्वात प्रथम तुमच्या आसपास वाढणाऱ्या झाडाचे जतन करा. त्याचा उपयोग व मर्यादा लक्षात घ्या. ती अपुरी आहेत असे वाटले तर बऱ्याच देशात यशस्वी झालेली पण तुमच्या अपेक्षा पूर्ण करणारी भराभर वाढणारी झाडे निवडा. त्यानेही तुमचा हेतू साध्य झाला नाही तरच ठराविक प्रदेशात फार वेगाने वाढणारी सुबाभुळ, सुरू अशी झाडे लावा आणि या सगळया अनुभवातून तुमच्या हवामानात चागली वाढणारी व तुमची गरज भागविणारी काही झाडे निवडून ती समिश्र पद्धतीने लावा म्हणजेच ज्या झाडांनी आम्हाला हजारो वर्षे आधार, औषध, सावली इंधन पुरवले ती बाभुळ, खैर, कडुलिंब, चिंच आंबा, जाभुळ अशी झाडे परदेशातून आणलेल्या झाडाबरोबर मिश्र पीक पद्धतीने लावली, तर त्यातून नक्की काय लावले जावे हे निसर्ग ठरवेल आपण ते अनुभवायचे हा अनुभव माती, पाणी, हवा, उष्णता इत्यादीनुसार बदलणार आहे. हे लक्षात ठेवावे.

सामाजिक वनीकरणाने एक गोष्ट फार चांगली केली आहे. ती म्हणजे झाडे लावण्याची मुलांच्यातील उद्याच्या पिढीतील आस्था वाढवण्याची. त्याबद्दल खरोखर त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. पण जर आम्ही सुबाभुळ, सुरू, निलगिरी एवढेच त्यांना सागत राहिलो तर काही वर्षांनी या देशात बाभुळ, खैर, चदन, अजन, हिरडा वगैरे झाडे होत होती, हेही त्याना खरे वाटणार नाही म्हणून आता सामाजिक वनीकरणाने रोपे तयार करून तोटयात विकण्याचा धंदा बद करावा. शेतकऱ्याना बी द्यावे, रोपे तयार करायला शिकवावीत, वेगवेगळया प्रकारचे प्रयोग करावेत व ते शेतकऱ्यापर्यंत पोचवावेत ही आजची निकड आहे.

पण एवढयाने प्रश्न सुटत नाही. वनीकरणाचा प्रश्न हा नुसते झाडे लावण्याशी निगडीत नाही. त्याचा कृषिप्रधान देशाच्या अर्थशास्त्राशी सबंध आहे, हे विसरता कामा नये.

आजकाल बऱ्याच सामाजिक। स्वयंसेवी सस्था वनीकरणाच्या कामात रस घेत आहेत, त्यांनी याचा विचार करावा. अशा प्रकारचे लोकशिक्षण देणे ही त्याचीही जबाबदारी आहे.

शेवटी यावरचा उपाय काय त्याविषयी, वर निर्देशित केल्याप्रमाणे मिश्रवनशेती हा तर उपाय निश्चितच आहे मग कोणकोणती झाडे यासाठी निवडावीत. हे प्रत्येक ठिकाणानुसार बदलेल पण एक सूत्र नक्की सागता येईल की, शेतकऱ्याला वर्षभर ज्याची गरज भासते ते इधन, ते धान्य, तो भाजीपाला, ती फळे, ती औषधे व दुधदुभते मिळविण्यासाठीचा चारा देणारी अशी ही पद्धती असावी.

थोडक्यात शेतीचे तंत्रच मुळी धान्य-फळबाग, चारा, इधन व औषधी वनस्पती अशा सूत्रात गुंफले जाण्याची आवश्यकता आहे. □

## पुस्तके

# पेशवे घराण्याचा इतिहास–अभ्यासपूर्ण माहिती देणारा

महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवाई सत्तेचा कालखंड सुमारे शंभर (१७१३ ते १८१८) वर्षांचा आहे. आजवर या कालखंडासंबंधी विपुल आणि विविध प्रकारचं संशोधनपर व इतर साहित्य प्रकाशित झालं आहे. तथापि पेशवे कुटुंबियांविषयी एकत्रित, तपशिलवार अशी माहिती देणारा ग्रंथ उपलब्ध नव्हता. एखाद्या विषयासंबंधीची विखुरलेली माहिती एकत्रित उपलब्ध होण्यामुळे जिज्ञासू अभ्यासकाची मोठी सोय होते. असा प्रयत्न श्री. प्र. ग. ओक या तरुण अभ्यासकाने 'पेशवे घराण्याचा इतिहास' संपादित करून केला, तोही आर्थिक झीज सोसून केला याबद्दल त्याचे प्रथम अभिनंदन करायला हवे.

प्रस्तुत ग्रंथ संकलित आणि संपादित करून 'केसरी'मार्फत तो प्रकाशित करण्यापर्यंत श्री. ओक यांनी जी परिश्रमता आणि चिकाटी दाखवली तिची कल्पना डॉ. अ. रा. कुलकर्णी यांची प्रस्तावना, य. न. केळकर यांचा पुरस्कार, खुद्द संपादकाचे निवेदन आणि शेवटची सात–आठ माहितीपूर्ण परिशिष्टे यावरून सहज येते. बाळाजी विश्वनाथ ते दुसरा राज्यबुडवा बाजीराव–अशी आदी अंताची पेशवे कुटुंबासंबंधी सर्वसामान्य वाचकांची कल्पना असते. इतिहासाभ्यासकांच्या दृष्टीने १८१८ नंतर पेशवाई मुळी निरर्थकच ठरते. (अपवाद सत्तावनी क्रांतियुद्धाचे एक नेते नानासाहेब आणि त्यांचा फाशी गेलेला पुतण्या रावसाहेब पेशवा.) पण तरीसुद्धा ब्रह्मावर्तीच्या दीर्घायु पेन्शनर बाजीरावानतर (निधन १८५१ जानेवारी) पेशवे कुटुंबियांची कसकशी वाताहत झाली याबद्दल एक कुतुहल राहतेच. हे कुतुहल अर्थातच पेशव्यांविषयीच्या अभिमानापोटी असते.

श्री. ओक यांनी आपल्या ग्रंथात बाळाजी विश्वनाथाच्या ज्ञात पूर्वजापासून पेशवाई अस्तापर्यंत, इतकेच नव्हे तर तो थेट १९८५ पर्यंतच्या काळापर्यंत पेशवाईतील औरस, अनौरस, दत्तक इत्यादी लहानथोर स्त्री–पुरुषांची तपशिलवार हकिकत दिली ही या दृष्टीने मोठी उपयुक्त गोष्ट झाली. दत्तक मालिकेच्या रूपाने का होईना; पण पुण्यात आजमितीस पेशवे घराण्यातील सुशिक्षित स्त्रीपुरुष वावरत आहेत किंवा बाजीराव–मस्तानीचे बांदेकर नबाबी वंशज इंदुरात आजही पेशवे घराण्याचा अभिमान बाळगून मिरवत आहेत–ही प्रस्तुत ग्रंथातील माहिती नवलाईची व मनोरंजक वाटते. पेशवे घराण्यातील स्त्रीजीवनाचे पिळदार नि करुण चित्रण हे या ग्रंथाचे प्रमुख वैशिष्टय आहे. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, नानासाहेब, राघोबा दुसरा बाजीराव इत्यादींच्या परस्त्रीसंबंधाविषयीची आणि त्यांच्या लेकावळ्यासंबंधीची माहिती देऊन श्री. ओक यांनी पेशवे घराण्याच्या हीन वाटणाऱ्या बाजूवर प्रकाश टाकण्याचेही धारिष्टय दाखवले आहे. छत्रपती आणि पेशवे घराण्यापैकी एकही औरस व्यक्ती आज विद्यमान नसावी याची ही सर्व माहिती वाचून मोठी रुखरुख लागते. पेशवाईतील काळी बाजू उजळून दाखवण्याची अलीकडे एक फॅशन पडली आहे. त्यामुळे अशा मंडळींना ओकांचा ग्रंथ चांगलं खाद्य पुरवेल; पण येथे हेही सांगून टाकले पाहिजे की अशी काळी बाजू असणारी घराणी पेशवेपूर्व काळात भारतात सर्वत्र सर्व जातीजमातीत होती.

श्री. ओक यांचा ग्रंथ वेगळ्या दृष्टिकोनातून लिहिलेला, माहितीपूर्ण व मनोरंजक आहे यात शंका नाही. तथापि या ग्रंथाचे संपादन अधिक योजनाबद्ध व्हायला हवे होते असे वाटते. पुनरुक्ती, काहीसा पाल्हाळ, घटनांची मागेपुढे ओढाताण असे प्रकार ग्रंथात आढळतात आणि त्यामुळे काही प्रमाणात तो विस्कळीत वाटतो. बहुत परिश्रमाने संकलित केलेली सर्वच माहिती ग्रंथात दिली पाहिजे असे नाही, तर वेचक–वेधक अशीच देणे युक्त असते. तसेच संदर्भ–साहित्य आधारभूत घेताना अद्यावत आणि प्रमाणभूत कोणते घ्यावे हेही कटाक्षाने पाहावे लागते. श्री. ओक यांच्या ग्रंथातील 'संकीर्ण साहित्य' (परिशिष्ट आठवे) दोन लहानमोठी शुद्धीपत्रे, पुन्हा पुरवणी–दुरुस्ती हा अखेरचा मजकूर वाचला की, त्यांची घिसाडघाई बोचल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे दुरुस्त्यातही पुन्हा काही चुका राहिल्या आहेत. उदा. पृ. २५९ पुण्यातील बुधवार आणि विश्रामबाग वाडे १८७८ मध्ये जळाल्याची त्यांची नोंद चुकीची असून ती १३ मे १८७९ अशी हवी. दुसऱ्या बाजीरावाचे उत्तरायुष्य तसेच ५७ च्या क्रांतियुद्धातील नानासाहेब आणि त्यांचे पुतणे रावसाहेब यांची हकिकत देताना पी. सी. गुप्ता, सुरेंद्रनाथ सेन, आर. सी मुझुमदार यांच्या संशोधित ग्रंथाचा अधिक प्रमाणात उपयोग करायला हवा होता. पेशव्यांच्या आश्रयाने नावलौकिक मिळवलेल्या बिगर चित्पावन घराण्यांविषयी एखादे कौटुंबिक जिव्हाळ्याचे प्रकरण या ग्रंथात खचित शोभून दिसले असते.

पेशवे कुटुंबाविषयीच्या लिहिलेल्या या माहितीपूर्ण ग्रंथात मुखपृष्ठावरील प्रतापी बाजीरावाचे चित्राखेरीज एकही चित्र नसावे ही एक मोठी उणिव भासते. निदान शनिवारवाडा, पर्वती या वास्तूंचे किंवा पेशवेवंशातील काही पेशव्यांची किंवा औरस अशा शेवटच्या वेलीचे (बयाबाई आपटे) चित्र देणे सहजशक्य होते. आयते ब्लॉक्स मिळणे कठीण नव्हते. घराण्याच्या इतिहासात त्या घराण्यातील ठळक व्यक्तींची वा वास्तूंची उपलब्ध चित्र देण्याने तो इतिहास अधिक बोलका होतो. असो. श्री. प्र. ग. ओक यांचा हा पहिलाच परिश्रमपूर्वक लिहिलेला आगळा ग्रंथ पेशव्यांचे घर, देवघर, माजघर, शय्याघर इत्यादींचा भरपूर परिचय करून देतो व त्यात तत्कालीन बरेवाईट उच्च कुटुंबचित्रण चांगले प्रतिबिंबित होते यात शंका नाही.

म. श्री. दीक्षित

पेशवे घराण्याचा इतिहास
सं. प्र. ग. ओक
केसरी प्रकाशन, पुणे
पृ. २६४, मूल्य ८० रु.

## ललित लेखसंग्रह

# पाऊलखुणा

विमला जोशी यांचा 'पाऊलखुणा' हा बावीस ललित लेखांचा संग्रह पाहिला. या आधीही त्यांचा कोथिंबीरीची फुले हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध झालाय हे प्रास्ताविकात वाचलं. अजूनही फुले फुलत आहेत हेही वाचलं त्यावरून अचव्यासहित एकच गोष्ट ध्यानात येते की जगात खूपच विषय आहेत की, टोपी अडकवायला कुठली तरी खुंटी लागते तसा ललित निबंधाला कुठलाही हलका फुलका विषय लागतो, चालतो. ललित निबंधकाराला स्मायलिंग फिलॉसॉफर किंवा ईझीचेयरवरचा फिलॉसॉफर म्हणतात. म्हणूनच विषय, त्याची उकल कितीही हलकी फुलकी असली तरी लहानशी का होईना तत्वज्ञानाची बैठक त्याला लागते काहीतरी अर्थ त्यातून निघावा लागतो आणि त्याचाच नेमका इथे अभाव जाणवतोय असं खेदान म्हणावस वाटतय. फिलॉसफायझिंग खूप आहे पण ते सहज ओघानं आलं नाहीय. कृत्रिम ओढून ताणून आणलेलं वाटतं विशेषत: लेखिकेला माहीत असलेली इग्रजी, सस्कृत, बगाली, उर्दू अशा अनेक भाषातील यच्चयावत सुभाषितवजा वाक्य उद्धृत करण्याची अनिवार ओढही दिसून येते. त्यामुळे सागायच ते एवढही उरल नाहीय. भाष्यकारानीच बरचसं सागून टाकलय.

लेखिकेन बरचसं जग पाहिलय हेही सागायला ती विसरली नाहीय; पण त्यातूनच 'कॅमकाठची सध्याकाळ' सारखा नितात सुदर ललित निबधही साकार झालाय. आकाशाला सोनसळी रंग देणारी पिवळीधम्मक क्षितिजाला टेकलेली गव्हाची शेतं, गवताची कुरण, धुष्टपुष्ट लाल देखण्या गाईचे कळप. हातरुमालाएवढी हिरवीगार लॉन्स गर्भरेशमी हिरव्या साडीसारखं झळाळत लॉन आणि केसाची पाढरी शुभ्र बट उडून दूर जावी तशी कॅम नदीची रेषा हिरव्या लॉनला अडवण लावल्यासारखी. या पार्श्वभूमीवरचं वृद्ध, काटेकोर पण अगत्यशील देखण हुचिन्सन जोडपं. माणसाचे लोभी डॉ. हॅरिस आणि डोरोथी हॉवर्ड केंब्रिजमधील कॉलेजेस दाखवण्याचा त्याचा उत्साह. अनेक शतकांचा पाहिलेला दोनच दिवसातला इतिहास, न्यूटन, रसेल सारख्या केंब्रिजियन्सचे पुतळे आणि सर्वांवर कडी करणार हॉवर्ड दापत्याच प्रेमळ आतिथ्य. सगळं सगळच आपणही अनुभवतो आहोत इतक बोलकं झालय् !

तसाच 'मत्त मयूर मुक्त मयूर' हाही एक देखणा ललित निबध वाचत असताना सतत डोळ्यासमोर झिमझिमणारा पाऊस आणि त्यात नाचणारा मोर हलतच नाही. इतका वाचक त्यात तद्रुप होऊन जातो. गवतावर साडणार ऊन, त्याला येणारं मोरपिसाऱ्याचं स्वरुप. हौसेनं लावलेली भाजी खाणारा मोर. अभद्र पण सळसळणारा नागाचा जोडा आणि भद्राभद्रतेची कल्पना माणसाच्या सुरक्षिततेवरच नर्भर असते ही लेखिकेची शहाणी जाण मोराचं रम्य, नागाच रौद्र सौदर्य आणि शेवटी जीवन नृत्य थाबवून चिरविश्रांती घेणारे नाग आणि मोर. तरीही सकाळच्या सौम्य उन्हात जिवतपणे झळझळणारा तो मोरपिसारा पाहुन मला ॲनी फ्रँकची आठवण झाली. वदिवासातही तिचा तारुण्यसुलभ उत्साह सळसळत होता, पण शेवटी तिनही अशीच हृदयाला पीळ पाडणारी चिरविश्राती घेतली. स्वप्न उरतात म्हणून जीवनही परत परत उमलत जात हे लेखिकेनं काढलेल सार काळजाला भिडणार आहे.

आगगाडीतून खाब पकडण्यासाठी आपली बाळमूठ मिटणार बाळ. खाब सापडला नाही तरी त्याच्या लेखी काळ थाबलेला असतो. वर्तमान हाच त्याचा क्षण असतो. आपल्या स्वतच्या अस्तित्वाशिवाय इतर गोष्टींचं बंधन, भान काहीच नसतं. जे आता ते खरं शाश्वत 'क्षण हे चिरस्थायीमधील लेखिकेचे निरिक्षण, चिंतन सगळच बोलक आहे. कारण आपण मोठी माणस वर्तमान जगतच नाही हे खरं सत्य आहे जगतो तो भूतकाळ, त्यातली दु:ख आणि भविष्याबद्दलची भीती त्यामुळे सगळेच क्षण निसटतात पाऱ्याच्या थेंबासारखे विमानाच उदाहरण मात्र फारसं चपखल बसत नाही.

'बा आदब बा मुलाहिजा' मधील हॅलो हॅलोला हलकट उत्तरं मात्र वास्तव आहेत.

घरं बदलण, न केलेलं भाषण, छंदोपाख्यान, दाताची दंतकथासारखे हलके फुलके निबध सग्रहाची खुमारी वाढवतात अस म्हणायला हरकत नाही.

जीवनाची वेडीवाकडी अतर्क्य वळणं, काटेरी पाऊलवाट दाखवण्यासाठी रविमुकुलांनी मुखपृष्ठावर इतकी वाकडी फताडी पावल काढलीत का ? कुठली कलात्मकता यात साधलीय ? ◻

# बहारीचे दिवस– अंतर्मुख करणारे

रमेश मंत्री यांचं बहारीचे दिवस हे प्रवासवर्णनात्मक पुस्तक वाचलं. नाव 'बहारीचे दिवस' असलं तरी आतील बराचसा मजकूर मात्र मन व्यथित करणाराच आहे. पहिल्यांदा त्याचं बहार उडवून देणारं मुखपृष्ठ लक्ष वेधून घेतं आणि जगाच्या आदिपासून अंतापर्यंत चालत रहाणारं एक करूण कठोर सत्यही सागून जातं. आभाळाला भिडणाऱ्या इमारतीच्या लहानशा पार्श्वभूमीवर एका स्त्रीच्या चेहऱ्याचा मोठा प्रोफाईल. तिचे सप्तरंगी केस त्यातली रगीबेरगी फुलं, पानं. रगीत ओठ नितळ चेहरा, चित्रात चेहऱ्याची एकच बाजू दिसत असल्यामुळे दिसणारा एकच अगतिक करूण डोळा. तो डोळाच पुरेसा बोलका आहे. जगाच्या पाठीवर कुठेही जा सहज उपलब्ध असलेली स्त्री ही एकच वस्तू (?) आहे हे ते कठोर सत्य. त्या चेहऱ्याच्या पार्श्वभूमीवर अद्यावत् पोषाखातली कामाला चाललेली स्मार्ट कर्तबगार स्त्री दाखवलीय, पण त्या एकाच करूण डोळ्यापुढे तिचं अस्तित्व लक्षातच येत नाहीय्

मंत्री पहिल्यांदा बँकॉकला गेले. मंत्रींना नाईट क्लबचं आकर्षण जास्त असल्यामुळे त्यांनी नाईटक्लबची तपशीलवार वर्णनं लिहिलीत. त्यातल्या व्यभिचाराची, स्त्री नावाच्या विकाऊ मालाची तिच्या देहाच्या बाजाराची अंगावर शहारे आणणारी वर्णनं वाचून माणूस सुन्न व्यथित होतो. दोन्ही

हातात दोन पेटत्या मशाली घेऊन येणारी नग्न तरुणी. अंगावर मशाली फिरवून घेणारी. पेटती मशाल तोंडात धरून विझवणारी. लोकांची करमणूक करणारी. लग्न ठरल्यावरही देहविक्रय करून जागेसाठी पैसे मिळवणारी मुलगी आणि तिचा धंदा संपल्यावर तिला न्यायला येणारा तिचा नियोजित पती. ज्या हवेत वातावरणात गौतमबुद्ध भरून राहिलाय् तिथे हे चालावं याचा अमाप खेद होतो. ' आयुष्य म्हणजे आणखी काय असतं? बाईनं पुरुषाचा घास बनायचं, पुरुषांची कामशक्ती नष्ट झाली तर जगातल्या निम्म्या बायकांना आत्महत्या करावी लागेल ' आयुष्यानंच शिकवलेलं हे परखड उघडं वाघडं सत्य सांगणारी कॉलगर्ल ॲन युवानही वाचकाच्या हृदयाला पीळ पाडते. महिन्यातून पंधरा दिवस भिक्षुणी होणारी आणि पंधरा दिवस कुणालाही सहवास द्यायला तयार असणारी मिनी बसची गाईड आणि वर्षातून काही दिवस संन्यासी होणारा स्वच्छंदी राजा पाहून हसावं की रडावं ते कळत नाही. स्वैर लैंगिक जीवन आणि आभाळी वाळणारी धर्मपरायणता यांचा मेळ कसा घालायचा ? हा विरोधाभास अनाकलनीय आहे. धर्माच्या काटेकोर बंधनात जराही चूक झाली तर तीन–तीन वर्षं सक्तमजुरीची शिक्षा. होडीमधून दुःख नदीत सोडणं ही या स्वैर जीवनाची थक्क करून सोडणारी उलटी बाजू. किंवा त्या अती स्वैरतेपोटीच माणसाचं जीवन आवळणारी कर्मकांडही अस्तित्वात आली असावीत. विचार आचारात नसलेला हा मेळ बुद्धालाही पहावत नाही. म्हणून थायलंडमध्ये निद्रिस्त बुद्धाच्याच मूर्ती जास्त आहेत. या काम आणि धर्म जोवना व्यतिरिक्त सुसंस्कृत सामाजिक जीवन तिथे अस्तित्वातच नाही की काय ? मंत्रींनी हे ऑब्जेक्टिव्ह ऑब्झर्व्हर म्हणून लेखकाच्या दृष्टीनं भोगलं आहे की आवड म्हणून ?

या नंग्या नाचाच्या पार्श्वभूमीवर हाँगकाँगचं हिंदू मंदिर, तिथलं उत्कृष्ट सांस्कृतिक केंद्र आणि तिथल्या, मंत्रींना लेखक म्हणून ओळखणाऱ्या शकुंतलाबाई ओझरकर हे सगळं सुखवणारं आहे.

त्याचप्रमाणे जपानमधील जपलं जाणारं राष्ट्रीय चारित्र्य, उद्योगशीलता, तिथला कौटुंबिक जिव्हाळा. दिवसभर पाश्चात्य पद्धतीचा पोषाख करून कार्यमग्न असलेली माणसं संध्याकाळी घरी आली की पौर्वात्य पोषाखात पूजाअर्चा, मनन, चिंतन करतात. एकत्र बसून जेवतात, हास्यविनोद करतात. वडील माणसांना मानतात. सुवृत्तेची जाहिरात करत नाहीत अमेरिकेसारखी. जगातली सर्वाधिक खपाची दैनिकं जपानमध्ये आहेत. हे हृद्य मनोहर चित्र पाहिलं की मनाला सांत्वना मिळते न मिळते तोच पतीचे बूट उचलणारी जपानी स्त्री आणि जपानमध्ये सर्वमान्य असलेलं स्त्रीचं दुय्यमस्थान. त्याबद्दल तिची स्वतःचीही नसलेली तक्रार, तिची स्वीकृती पाहिली की ती सांत्वना केव्हाच नाहीशी होते, पण जगातली पहिली कादंबरी जपानमध्ये लिहिली गेलीय् आणि तीही एका स्त्रीनं लिहिलीय् हे पाहिलं म्हणजे सगळंच अगम्य वाटतं. जपानी वृत्तपत्रांची कडक आचारसंहिता, नशिबावर विसंबणं, नेत्यांची वैयक्तिक बदनामी वगैरे अपप्रवृत्ती कटाक्षानं टाळणं स्पृहणीय आहे. त्यामुळेच मंत्रींना पाच–पाच वेळा इंग्लंड अमेरिकेला गेल्याचा जपान पाहिल्यावर पश्चात्ताप होणं सहाजिक आहे.

सॅनफ्रॅन्सिस्कोमधील जागतिक कविसंमेलनाची हकीकत चांगली रोचक आहे. विशेषतः मराठीतील मंगेश पाडगावकर, करंदीकर बापटांना भेटायला उत्सुक असलेल्या मंत्रींना अमरावतीचा भटनागर हा एकुलता एक मराठी कवी तोही अप्रसिद्ध कवी भेटावा. त्यानं इंग्रजी कवितांची दोन सामान्य चोपडी दाखवावीत आणि अंतुल्यांनी जागतिक कवि संमेलनाला पाठवल्याचा गौप्यस्फोट करावा. यावरून जागतिक कविसंमेलनाचा दर्जा सहज कळून येतो. जीवनाच्या अंतापर्यंत सैबेरियात कष्ट उपसणाऱ्या कवींची कीर्ती अढळ आहे. हे रशियन कवीचं उत्तर करमणूक करणारं आहे.

हवाईला उतरताना आयुष्यातला एक दिवसच काढून टाकावा लागण्याचा अनुभवही मजेशीर आहे.

असे हे बहारीचे दिवस. मंत्रींनी बहारीनं व्यतीत केले. नॅशनल जिऑग्रॅफिक वॉशिंग्टन पोस्ट यावद्दलचं तपशीलवार ज्ञान वाचकाला अवगत झालं. जपान समजला तरी फार मोठी खंत निर्माण करतात, त्यातली स्त्रीची विटंबना पाहून.

—शकुंतला जोग

**पाऊल खुणा**
विमला जोशी
प्रपंच प्रकाशन
पृष्ठ : १६०
मूल्य : चाळीस रुपये

**बहारीचे दिवस**
रमेश मंत्री
विश्वमोहिनी प्रकाशन
पृष्ठ : २५०.
मूल्य : ५० रुपये.



# शब्दांचं अंगण

## विविध कला

आशा कर्दळे

रांगोळी, भरतकाम, शिवणकाम, विविध साहित्याची तसंच कागदाची फुलं आणि इतर वस्तू, कातरकाम, बाटिक या सुंदर हस्तकला आहेत. तसाच तो एक सुरेख छंदही आहे. घरच्या घरी सहज जतन करता येण्यासारख्या या कला आहेत, त्याचप्रमाणे त्यात प्राविण्य संपादन करत राहिलं तर नवनवीन निर्मिती करून त्या हस्तकलांना जिवंतही ठेवता येतं. नवनिर्मितीचा अविष्कार त्यातून सहज साध्य करता येतो. हस्तकलेच्या तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू पाहिल्या म्हणजे वाटतं हा प्रांत खरोखरच असीम आहे. दृष्टीला दिसणारी अशी एकही वस्तू नसेल, जिचा हस्तकलेसाठी उपयोग करून घेण्यात आलेला नाही. पुन्हा या क्षेत्रात सतत फॅशन बदलत राहते. विशिष्ट प्रकारच्या बॅग्ज, पर्सेस, वॉल हँगिंग्ज यांची काही काळ चलती असते. मग ते डिझाईन किंवा तो प्रकार मागे पडतो. वेगळं काहीतरी दिसायला लागतं. असं असलं तरी कलेचं मूळ तत्त्व तेच असतं. तिची इतकी भिन्न भिन्न प्रकारची अभिव्यक्ती कोणाच्या डोक्यातून बाहेर पडते कोणास ठाऊक ! पण एवढं खरं को, हस्तकलांचा आवाका इतका प्रचंड आहे की त्यांची नूतनता सदा ताजीच राहील.

रांगोळी ही अतिशय प्राचीन लोककला आहे. आता फ्लॅट संस्कृतीमध्ये रांगोळी हा प्रकार लुप्त झाला असला तरी अजूनही दारी सडा आणि रांगोळी घातलेलं घर मंगल आणि प्रसन्न वाटतं. दारापुढची रांगोळी येणाऱ्याचं मनभरून स्वागत करते. त्या घरातल्या भावनांचं ते प्रतिक असतं. रांगोळीची शुभ्र रेषा आणि त्यावरचं कुंकू आणि हळद ही रंगसंगतीच अतिशय साधी पण फारच मोहक असते. वात्सायन या सूत्रकारानं चौसष्ट कलांमध्ये रांगोळीचा समावेश केला आहे. जैन आणि पारशी धर्मात रांगोळी ही अशुभनिवारक मानली जाते. अशा या रांगोळी या कलेवरचं 'रांगोळी' याच नावाचं पुस्तक डॉ. सरोजिनी बाबर यांनी संपादित केलं आहे आणि महाराष्ट्र शासनाने ते प्रकाशित केलं आहे, रांगोळ्यांना सुरवात स्वस्तिकापासून केली आहे. स्वस्तिक हे भारतीय संस्कृतीचे प्रतिक. कोणत्याही शुभ विधीचा आरंभ स्वस्तिक रेखाटनानं होते. स्वस्तिक हे सूर्याचं आसन आहे असं मानलं जातं. या पुस्तकात कमळ, श्रीफळ, आकाशदिवा अशाच रांगोळ्या आहेत. स्वस्तिकाचे अनेक प्रकार काढून दाखवले आहेत. प्रत्येक रांगोळीपूर्वी त्या प्रतीकाचा कल्याणकारी इतिहास आणि त्यातले गर्भित संकेत स्पष्ट केले आहेत. त्यामुळे या पुस्तकाला माहिती आणि रेखाटन असं दुहेरी महत्व प्राप्त झालं आहे.

'रांगोळी रेखन' हे सुधाकर खासगीवाले यांचं या विषयावरचं आणखी एक पुस्तक. प्रकाशकही तेच आहेत. त्यात त्यांनी ठिपक्यांच्या रांगोळ्यांपेक्षा सुंदर आकृत्यांवर भर दिला आहे. मुक्त हस्त चित्रकला चांगली येत असेल, तर या आकृत्या चटकन् जमतील. ठिपक्यांच्या रांगोळीसाठी ठिपके सारख्या अंतरावर येणं आवश्यक असतं. मानवी आकृत्या, निसर्गचित्रं, फुलं-पानं यासारख्या कशातही रांगोळीचे रंग भरून रंगावली तयार होते; पण त्यासाठी चित्रकलेचं अंग असणं आवश्यक आहे. मूळ चित्र आणि रंगसंगती यासाठी रांगोळी आणि चित्रकलेचा जवळचा संबंध आहे. रांगोळी या कलेत चितारण्याच्या कितीतरी पद्धती आहेत. वस्त्रातून गाळून रंग भरून मोठाली चित्रं काढता येतात, पाण्यावर सुद्धा अशाच पद्धतीने रांगोळी काढता येते. मान्यवर पुढारी, नेते किंवा देवादिकांच्या प्रतिमा आणि निसर्गदृश्यांची रांगोळीची प्रदर्शनं प्रेक्षणीय ठरतात तशीच पाण्यावरची रांगोळी हाही आकर्षणाचा विषय होतो. या दोन्ही क्षेत्रात अनेक व्यक्तींनी आपली नावं लोकप्रिय केली आहेत. सुधाकर खासगीवालेंच्या पुस्तकातही मौलिक माहिती आहे. रांगोळीला प्रत्येक राज्यात काय म्हणतात तेही त्यांनी सांगितलं आहे. गुजराथ–साथिया, केरळ–पुविदल राजस्थान–मंदाना, बिहार–अलिपना, उत्तरप्रदेश–चौकपूर्णा, बंगाल–अल्पना, आंध्रप्रदेश –मुग्गू, तमिळनाडू–कोलम अशी ती नावं आहेत. पूर्वी गुढ्या, तोरणं, सडा चौक रंगमालिका भरणं ही हार्दिक स्वागताची लक्षणं होती. रांगोळी या कलेचा प्रसार भारतातून जगाच्या इतर भागात कसा झाला हाही कुतूहलाचा विषय आहे.

रांगोळी ओलांडून घरात प्रवेश केला की, गृहिणीची कलासक्त वृत्ती गृहसजावटीतून प्रत्ययाला येऊ शकते. गृहसजावटीतून त्या घराचं व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होत असतं. श्रीमती सुचित्रा कुंभोजकर यांनी लिहिलेलं 'इन्द्रायणी साहित्य'नं प्रकाशित केलेलं 'सुंदर माझं घर' हे पुस्तक या बाबतीत चांगलं मार्गदर्शक ठरेल. अनेक सुंदर छायाचित्रांच्या सहाय्यानं गृहसजावटीच्या अनेक शैलींचा त्यांनी चांगला परिचय करून दिला आहे. घराची रंगसंगती हे पायाभूत तत्त्व. त्याला अनुसरून पुष्परचना आणि टी. व्ही., डायनिंग टेबल, खुर्च्या, भिंती, गाद्या, उशा यांना सजवणारे भरतकामाचे प्रकार त्यांनी दिले आहेत. जपानी पुष्परचनेचा एक वेगळा विभागच आहे. निसर्गातून उठून घरात स्थानापन्न होणारं हे सौंदर्य संपूर्ण घराशी लय, समतोल साधत असतं.

घरातली स्त्री आपली कला किती विविध मार्गांनी प्रगट करू शकते, याचा प्रत्यय प्रतिभा काळे यांचं 'असा छंद अशा कलाकृती' हे पुस्तक वाचून येतो. रोहन प्रकाशनचं हे पुस्तक गृहिणीनं अवश्य जवळ बाळगावं असं आहे. त्यात क्रोशाचं विणकाम, निरनिराळ्या तऱ्हेच्या पिशव्या, बाहुल्या, विविध उपयोगाच्या वस्तू (उदा. रूमाल बॉक्स, पेपर हँगर, लेटर पॅडस इ.) तोरणं, थर्माकोलच्या वस्तू या सर्वांची सचित्र कृती आहे. क्रोशाच्या विणकामात वेगवेगळ्या प्रकारची जाकिटं आहेत. थर्मोकोलच्या रूपानं तर इतकं लवचिक माध्यम अलिकडे उप-

लब्ध झालं आहे की त्यापासून वाटेल ते तयार होऊ शकत. थर्माकोलच्या वस्तू ही आता स्वतंत्र हस्तकलाशाखा झाली आहे खास या विषयावरच पुस्तक असायला हवं. मेंदी, रेखाटन, शटल वर्क, केप्र–ऑरगंडीची फुलं, मेणाची फळं या सर्वांवरती स्वतंत्र पुस्तक आहेत.

लोकरीच विणकाम आणि शिवणकाम ही अतिशय विकसित हस्तकला. या दोन्ही बाबतीत मशीन्सचा वापर वाढत असल्यानं हस्तकला या शब्दाला हरकत घेतली जाऊ शकेल पण अजूनही या दोन्ही कलामध्ये चागलाच हात दाखवता येतो, दाखवला जातो. हातानं विणलेल स्वेटर मशोन इतकच सुन्दर आणि विणीच्या दृष्टीनं अधिक वैविध्यपूर्ण असतं या कलेत डोळे बद केले तरी हात चालू राहतात इतकच नव्हे तर चालता चालता पायांबरोबर हातही चालतात! शिवणकाम आता हातानं कोणी करत नसलं तरी कापड कापण्याच्या अवस्थेत हातच गुंतलेले असतात आणि तेही प्रत्यक्ष शिवण्याइतकच, किंबहुना जास्त महत्त्वाचं असतं. मशीनवर कापड हवं तसं वळवणारे आणि भराभर सरकवणारे हातच असतात. तेव्हा अस हस्तलाघव दिसणारे हे दोन प्रदेश पाश्चात्य देशांनी लोकरीच्या विणकामात नेत्रदीपक करामत केली आहे त्याची पुस्तक तर एकाहून एक सरस! किमतीही तशाच डोळे फिरवणाऱ्या! गोबऱ्या गालाच्या निळ्या डोळ्याच्या गुटगुटीत बाळाच्या अंगावरची ती देखणी स्वेटर्स पाहिलीत की पहातच रहावस वाटतं. लोकरीतला तर प्रत्येक रंगच सुदर वाटतो. प्रत्येक छटा लोभस. लोकरीच्या विणकामाच्या बाबतीत मराठी माध्यमातून फार थोडी पुस्तक उपलब्ध आहेत. चागल्या मराठी पुस्तकाची उणीव सौ. इंदुमती रिंगे यांच्या 'लोकरीचे शास्त्रोक्त विणकाम' या पुस्तकानं बरीचशी दूर केली आहे त्यानी हे इंग्रजीच्याच धर्तीवर पुस्तक लिहिलं आहे. त्यामुळे 'मराठी मासिकात बघून विणायला घेतल तर बरोबर जमत नाही' अशी तक्रार करायला जागा उरणार नाही. क्रोशाचं, लोकरीचं किंवा शटलचं विणकाम ही अशी कला आहे की तयार नमुना बघून सुद्धा तसा करता येतो. क्रोशाच्याच सुईने लोकरीच विणकाम तर फारच आकर्षक दिसत. श्रीमती रिंगे याच्या या पुस्तकात दोन्ही प्रकार आहेत सुयावरचं आणि क्रोशावरच लोकरीचं विणकाम अनेक विणीची छायाचित्रं आहेत. लोकरीपासून काय विणता येणार नाही? स्वेटर, स्कार्फ, मफलर, मोजे, जाकिट, फ्रॉक्स शाल, स्कर्ट, पॅन्ट, टी शर्टस् सगळी वस्त्र यातून आकाराला येऊ शकतात आणि ती सगळी इथं उपस्थित आहेत

### विणकाम–शिवणकाम.

'एक नूर आदमी दस नूर कपडा' म्हणतात. माणसाचा नूर पालटून टाकणारी हजारो फॅशन्सची वस्त्रं! विशेषतः बाल आणि तरुण वयासाठी इतक्या तऱ्हेचे कपडे की रोज एक नवा प्रकार घालून बघायचा म्हटला तर दोन्ही अवस्था त्या त्या वयाच्या कपड्यामध्ये बुडून जातील! वस्त्राचा शोध लागला आणि माणसानं त्याला किती विविध आकार–प्रकारांमध्ये बंदिस्त केलं! सुई आणि दोऱ्याच्या मीलनातून मानवी देह सजतच राहिला! या शिवणकामावरती अनेक पुस्तकं उपलब्ध आहे. शिवणकाम, भरतकाम आणि विणकाम या तीनही विषयाना वाहिलेली मासिकंही आहेत. शिवाय कुठल्याही मासिकात हस्तकलांसाठी थोडीतरी राखीव जागा असतेच. नवशिक्या व्यक्तीला उपयुक्त ठरेल असं सौ. माधुरी करमरकर याच 'तीन टप्प्याचे शिवणकाम' हे पुस्तक आहे. त्यात कागदावर कापणे, कापड कापणे आणि प्रत्यक्ष शिवण अशा पद्धतीनं शिवणकामाचे पाठ दिले आहेत श्रीमती पद्मावती भिसे याचं सोपे शिवणकाम हे मॅजेस्टिक प्रकाशनचं लोकप्रिय पुस्तक. त्याच्या पाच आवृत्त्या आनापर्यंत निघाल्या आहेत. शिवणकामाच्या डिप्लोमा परीक्षेसाठी ते फार उपयुक्त ठरले आहे. शिवणाबरोबरच रफू आणि ठिगळ कस करायचं, ते सागितल आहे. शिवणकामाच्या विषयाच अत्यंत गाजलेलं पुस्तक म्हणजे कृ. म. हेगडे याच 'शास्त्रोक्त शिवणकाम' दोन भागात विभागलेल. एका भागात कर्तन आणि दुसऱ्या भागात शिवण. या पुस्तकाच्या तेरा आवृत्त्या काढण्यात आलेल्या आहेत.

कापड हाती आल की, त्यावर कितीतरी कला आपली रंगीत, सुबक घर बांधायला पुढे सरसावतात. रेशमी, नाजुक टाके, कपड्यावर किमया निर्माण करतात. सौ. प्रभावती पुरम याचं 'भरतकला' हे भरतकामाच्या बाबतीतलं, मॅजेस्टिक प्रकाशनचं आदर्श पुस्तक. सौ. पुरम याचं अठरा वर्षं परदेशात वास्तव्य होतं. भारतात त्यानी १९४८ मध्ये 'कलाविकास संस्था' स्थापन केली. आपल्या भरतकलेची अनेक प्रदर्शनं त्यानी परदेशात भरवली. हाताच भरतकाम, मशीन एम्ब्रॉयडरी आणि सुशोभित भरतकला अशा तीन भागात हे पुस्तक त्यानी पूर्ण केलं आहे. संपूर्ण जीवनच त्यानी या कलेला वाहिलेलं आहे भरतकामाच्या परीक्षा सरकारी पातळीवर देखील होतात; पण अभ्यासक्रमासाठी योग्य असं पुस्तक नव्हतं. ती उणीव या पुस्तकानं दूर केली आहे. पुस्तकाच्या प्रारंभी सौ. पुरम यानी भरतकलेचा रोचक इतिहास सांगितला आहे या कलेचा उगम इतिहासपूर्व काळातला आहे, असं त्याच मत आहे. शिवणकला ही भरतकलेची जननी आहे आणि भरतकलेसाठी चित्रकलेची गरज आहे हेही त्याच मत उचितच आहे. या पुस्तकात शटलवर्क, पॅचवर्क, अप्लिकवर्क, रुद्रगाठी, क्रोशाचं काम, मणीकाम, कटवर्क या सुशोभित भरतकलेचे अतिशय सुदर नमुने छायाचित्रासह सादर करण्यात आले आहेत सिंधी टाक्यासबधीचा इतिहास सागून त्या म्हणतात की भरतकलेचा जन्म भारतातला. इथून ती कला पाश्चात्य देशात गेली. खरं तर ही आदिवासीची कला. त्यानीच ही आजही फार मोठ्या प्रमाणावर जतन केली आहे सैबेरिया, इटली, नॉर्वे, डेन्मार्क, जपान, अमेरिका, सगानिया या प्रत्येक देशातल्या भरतकलेचं वैशिष्ट्य सौ पुरम यानी स्पष्ट केलं आहे. उदा जपान या देशात भरतकामात जरीचा धागा हा असतोच. कपड्याच सौंदर्य बाटिक या कलेमुळं आणखी खुलतं. या कलेनं खुलणाऱ्या कपड्याची कक्षा किती विस्तीर्ण आहे! वॉल हँगिंग्ज पर्सेस, ग्रीटिंग्ज या वस्तूशिवाय स्कार्फ, ओढणी, सलवार, खमीज, साड्या, चादरी, अभ्रे, लुंगी, झब्बा या वस्त्रांना ही कला अधिक आकर्षक बनवते 'बाटिक' हा मूळचा इंडोनेशियन शब्द. ही कलाही तिकडचीच. या कलेत 'वॅक्स रेझिस्ट' हे मूळ तत्त्व आहे. म्हणजे जो रंग ठेवायचा असेल, तो मेणानं झाकत जायचा. मूळ कपड्यावर अनेक रंग चढत जाऊन डिझाइन तयार होतं. जितक्या रगछटा जास्त, तितकं

हे काम जास्त कठीण आणि कौशल्याचं.नतर मेणानं भरलेलं कापड उकळत्या पाण्यातून काढून मेण काढतात. युरोप, अमेरिकेत हे मेण गरम इस्त्रीच्या सहाय्यानं काढतात. नदा चिट्टरवार याच्या 'बाटिक–तत्र व मंत्र' या राणे प्रकाशनच्या पुस्तकात, सुदर रगीत छायाचित्राच्या आधारे कपड्यावर बाटिक प्रिंट कसं कराव याची उत्तम प्रात्यक्षिकं दिली आहेत. या पुस्तकाच्या मदतीन ही कला सहज शिकता येईल.

### इकेबाना मोरिबाना

कागद ही अशी वस्तू आहे की त्यातून घड्या घालून आणि कातरकाम करून हवं तस सौंदर्य निर्माण करता येतं. जपाननं तर 'ओरिगामी' या कागदाच्या कलेला शास्त्राच्या साच्यात घालून तिचा पद्धतशीर विकास केला आहे. कागदाच्या घड्या घालत बसल की लहानांपासून मोठ्यापर्यंतचा वेळ छान जातो, घराला सुशोभित करणाऱ्या वस्तूही तयार होतात आणि कलाही साध्य होते. 'ओरिगामी' याच नावाच पुस्तक श्रीमती इदूताई टिळक आणि श्रीनिवास कोपरकर यानी तयार केलं आहे. त्यात नुसत्या आकृत्याच आहेत. कागदाच्या घड्याचे शास्त्रशुद्ध प्रकार आहेत. कागदाचं कातरकाम ही आणखी एक कुशलता आवश्यक असलेली कला. कात्रीच्या हाताळणीला तसेच सवेदनाशील हात हवेत. त्यातून मनोहर जाळी तयार होते आणि त्या जाळीतून छाया प्रकाशाच अप्रतिम कौतुक ओसडतं. अनेक ठिकाणी विशेषत: पजाबात गोकुळाष्टमी, गणेशचतुर्थी अशा उत्सव प्रसगी सजावटीसाठी मोठाल्या कागदाच कातरकाम केलेलं आढळत. कागदाच्या त्या पारदर्शक भितीच असतात. 'कागदाचे कातरकाम' या पुस्तकात (अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन) सौ. मालती दाडेकर यानी कागदाचे गालिचे, किनारी, महिरपी फोटो फ्रेम्स अशा सुदर वस्तूचे नमुने दिले आहेत.

सगळ्या प्रकारच्या हस्तकलांमध्ये अभ्यास पूर्वक प्राविण्य संपादन करणाऱ्यांमध्ये अ. दि. कोकड याचं नाव आवर्जून घ्याव लागेल. त्यांनी आजवर हस्तकलाचे इतके नमुने सादर केले आहेत की त्यांची मोजदार करणं केवळ अशक्य आहे. पुन्हा प्रत्येक बाबतीत त्याचा स्वतंत्र अभ्यास असतो आणि स्वतंत्र संशोधन असत. नाना तऱ्हेची फुलं, काष्ठशिल्प पुष्परचना, भरतकाम या सर्व प्रकारातल त्याचं नैपुण्य वादातीत आहे. त्यानी 'इकेबाना' या जपानी पुष्परचनेवर पुस्तकही लिहिल आहे; उची, रेषा, आकार याच्यावरून पडलेले 'मोरिबाना' वगैरे सर्व प्रकार त्यानी छायाचित्रासह सादर केले आहेत.

माणसाच्या दैनदिनीत चैतन्य निर्माण करणाऱ्या या कला. कोणीही त्याना आपलसं करू शकत ☐

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

# इंग्रजीची खिडकी मराठीचे डोळे

### आमचा गुरुत्वमध्य इंग्रजी भाषेत

भारत देश स्वतंत्र झाला आणि वाटलं 'चला' आपण परकीयाच्या गुलामीतून सुटलो,' इग्रज लोकाची सत्ता जाऊन भारतीयांची मत्रिमडळं केंद्रात–राज्यात आली. गेल्या तीन दशकाहून अधिक काळ आपणच आपले शासक आहोत. पण अस असूनही आपला गुरुत्वमध्य परदेश आणि इग्रजी भाषा यातच अडकलेला आहे.

इग्रजाच्या काळात नव्हत्या इतक्या आता इग्रजी माध्यमाच्या शाळा निघाल्या आहेत अगदी पूर्व–प्राथमिक स्तरावरही इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलामुलीना घालण्यासाठी पालक त्या शाळाचे उबरठे झिजवतात. त्याच्या सर्व अटी, नियम मान्य करतात. म्हणतील तितकी फी आणि देणगीसुद्धा द्यायला राजी असतात 'फाड् फाड्' इग्रजी बोलता येणं म्हणजे जणू भूलोकीच्या स्वर्गाच दार ! व्यक्तिमत्त्वाचा हमखास विकास ! चागल्या प्रतिष्ठेच्या चार आकडी पगाराच्या नोकरीची शाश्वती ! मुलीच्या बाबतीत विचार वेगळा केला जातो. नेव्ही, आर्मी किंवा एअरफोर्समध्ये नोकरीत असणाऱ्या किंवा परदेशी वास्तव्य असलेल्या अथवा भारतातच पण फार मोठ्या हुद्द्यावर नोकरीस असणाऱ्याला बायकोनं नुसतं स्लीव्हलेस घालून चालत नाही, तिनं स्मार्ट असाव लागत. तिला चागल्या 'मॅनर्स' असाव्या लागतात. न अडखळता आणि सुरेख उच्चारासहित तिन इग्रजीत सभाषण करण गरजेच असतं. इग्रजी माध्यमच कनिष्ठ मध्यमवर्गाला उच्च मध्यमवर्गात आणि उच्च मध्यमवर्गीयाना अति उच्च वर्गात नेऊ शकेल याची इतकी बालबाल खात्री काही मडळीना आहे की काही उपायांनी बाळ जगात प्रवेश करतानाच त्याला इग्रजी बोलण आलं तर ही मडळी अगदी वाटेल ते करायला तयार होतील !


### काल्पनिक दोऱ्या घट्ट असतात

इग्रजी माध्यमाबद्दल आज जी एक प्रकारची 'क्रेझ' आहे ती पाहिली की ऐकलेली एक गोष्ट आठवते. एक व्यापारी आपले उट घेऊन मजल दरमजल करीत चालला होता. एका मुक्कामावर त्याच्या लक्षात आलं की उट बाधायची एक दोरी कमी आहे. आता आयत्या वेळी काय करायच ? शेवटी त्यानं ठरवलं की दोरी नसली तरी दोरी बाधण्यापूर्वी आपण जे आवाज, ज्या कृती करतो त्या साऱ्या करायच्या. उटाच्या गळ्याभोवती बाधल्यासारख करायच, त्याला थोपटायच व खाली बसवायच. झाऽलं. दोरी न बाधता उटाला तर खाली बसवल. व्यापारी खुशीत झोपला. सकाळी उठून उटाच्या दोऱ्या सोडून त्याना उठतं करायला लागला. मात्र दोर न बाधलेला उट काही उठेना ! गोष्टीचा मतितार्थ काय ? काल्पनिक दोऱ्या घट्ट असतात. त्याच्या गाठी सुटता सुटत नाहीत.

### इंग्रजी भाषा व सनदी नोकऱ्या

इंग्रजी माध्यमाच्या थोरवीची काल्पनिक दोरी आमच्या मानेभोवती घट्ट रुतली आहे. स्वातत्र्यानतर घटनामान्य भाषाच शिक्षणाच

माध्यम राहतील अशी ठाम भूमिका घेतली गेली असती तर इंग्रजी माध्यमाच्या दोरीचा हा गुता वाढला नसता. परतु आज इग्रजी माध्यमाच्या शाळाच आम्हाला तारणार असा अनेक पालकाचा समज दिसतो आहे. इग्रजी माध्यमाच्या शाळाच हे आकर्षण आहे तरी कशासाठी ?




इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणाच मूळ आहे सनदी नोकऱ्याच्या आकर्षणात. आपला मुलगा कलेक्टर, न्यायाधीश, सचिवालयातील एखाद्या खात्याचा सचिव असा कोणीतरी बडा पगारदार व हुद्देदार व्हावा, त्याच्या दाराशी लाल पट्ट्याचा व पितळी बिल्ल्याचा चपराशी असावा. साऱ्यानी त्याला 'साहेब' म्हणाव अशी अनेक पालकाची अजूनही इच्छा असते. स्वाभाविकच आय ए. एस्. सारख्या स्पर्धात्मक परीक्षाना मुलान बसून यश मिळवण क्रमप्राप्तच होतं आजवर सर्व परीक्षांच माध्यम इग्रजीच होतं ( प्रादेशिक भाषातही या परीक्षा देता येतील अस अलीकड जाहीर झालं असल तरी ते काही खर नव्हे. अहो, इग्रजीची सर का प्रादेशिक भाषाना येणार असा आजही सूर ) याशिवाय इतक उच्चपदस्थ व्हायचं म्हणजे चार परदेशीय लोकाशी किंवा चार एतद्देशीय विद्वानाशी बोलण्याची वेळ येणारच. हे सारं बोलण इग्रजीतूनच करावं लागणार ! तुम्ही प्रादेशिक भाषेतून बोलणार म्हटल्यावरच मुळी तुम्ही विद्वान नाही अस वाटत ! महाराष्ट्रात आज विद्वान म्हणून मान्यता पावलेल्या काही मडळीच इग्रजी भाषेवरील प्रभुत्व हेच त्याच्या विद्वतेच महत्त्वाच गमक असतं ! तेव्हा थोडक्यात काय ? सपत्ती आणि प्रतिष्ठा देणारी नोकरी असो वा व्यासंग व समाजमान्यता असो इंग्रजीशिवाय मुळी तरणोपायच नाही अशी आज अनेकानी समजूत करून घेतली आहे

## इंग्रजी माध्यमाला देशभक्तीची डूब

केवळ स्वार्थान्ध दृष्टिकोनातूनच इग्रजी माध्यमाचे गोडवे गाइले जातात अस नव्हे. अनेकदा त्याला देशभक्तीची डूबही दिली जाते. परदेशातील वैज्ञानिक प्रगती, प्रतिदिनी लागणारे नवे नवे शोध, प्रचारात येणारी साधनं– इत्यादी साऱ्याचा मूलस्त्रोत कशात असेल तर तो इग्रजी भाषेच्या अभ्यासात अस भासविलं जात. अहो, लोक परग्रहावर गेले तरी आम्ही मात्र बैलगाडीला टायरची चाक लावण्यात धन्यता मानतो आहोत ! सगणक, रोबोज इत्यादीचा वापर जितका लवकर आपण करू तेवढ्या जलद गतीन भारताची वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती होऊ शकेल. आणि हा वापर करायचा असेल तर इंग्रजी भाषेशिवाय तरणोपाय कुठे आहे ? या प्रकारचा विचार करणारी मंडळी आजूबाजूच्या वास्तवाकडं डोळेझाक ( हेतुत: ? ) करीत आहेत. जर्मनी, रशिया, फ्रान्स, जपान इत्यादी देशात इग्रजी भाषा ही अभ्यासाची एक भाषा असली तरी शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाच ती माध्यम मुळीच नाही. या देशानी इग्रजी माध्यमाशिवाय वैज्ञानिक व भौतिक प्रगती कशी केली ? एवढच नव्हे तर दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेल्या जपानन आपल्या मालानं आज अमेरिकन बाजारपेठ कशी काबीज केली ? इग्रजी माध्यमाच्या शाळा न उघडताही त्याना जे साध्य होत ते आपल्याला का होऊ नये ? भाषा ही विज्ञानाची वाहक आहे, भाषा म्हणजे विज्ञान नव्हे !

## खिडकी महत्त्वाची की डोळे महत्त्वाचे?

एका घरात मी एक घोष वाक्य वाचल होत. 'इग्रजीची खिडकी, मराठीचे डोळे' फार अर्थपूर्ण घोषवाक्य आहे हे ! घराला अनेक खिडक्या असतात. खिडकी समोरचा व खिडकीच्या आजूबाजूचा भाग आपण खिडकी उघडून पाहिली किंवा खिडकीच्या पारदर्शक काचेतून पाहिले तर आपल्याला दिसतो परतु नुसती खिडकी काय कामाची ? खिडकीतून दिसणारं दृश्य टिपणारे डोळे हवेत ! त्या डोळ्यावाटे त्या दृश्याची प्रतिमा आपल्या मेंदूपर्यंत पोचते व मग आपण त्या दृश्याबद्दल विचार करतो, कल्पना करतो. आपल्या पूर्वप्रतिमाशी ह्या नव्या प्रतिमेची तुलना करतो. तेव्हा मुद्दा असा की बाह्य जगातील ज्ञान होण्यासाठी खिडकीची जरूरी आहे यात शंकाच नाही; पण खिडकीपेक्षा डोळ्याना महत्व जास्त आहे. इग्रजी भाषा ही जगात काय चाललेलं आहे, ज्ञान–विज्ञानाच्या प्रातात काय नवं घडत आहे ते दाखविणारी एक खिडकी असली तरी ती एकमेव खिडकी नव्हे फ्रेंच, जर्मन, जपानी इत्यादी भाषाही आपल्याला ज्ञान-विज्ञानाच्या प्रांताची ओळख करून देण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत परंतु स्वातन्त्र्यपूर्वकाळातील दीडशे वर्षे इग्रजी भाषेच्या मोठेपणाचा आपल्या मनावर इतका अमल चढला आहे की जणू आधुनिकता म्हणजे इग्रजी भाषा, सुबत्ता म्हणजे इंग्रजी भाषा अस आपल्याला वाटत. म्हणूनच आपण हे समजून घ्यायला हव की देशोदेशी ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रात जे काही घडत आहे त्याची चाहूल घेण्यासाठी link

language म्हणून इंग्रजीच खूपच महत्त्व असल तरी शिक्षणाचं माध्यम म्हणून इग्रजी भाषा महत्त्वाची नाही.

### स्वदेशाइतकीच स्वभाषा महत्वाची

शिक्षणाचं माध्यम कोणतं असाव याबद्दल शिक्षणतज्ज्ञ अथवा विचारवत यांच्यात दुमत असण्याचं कारणच नाही. स्वदेशाइतकच स्वभाषेच महत्व असत हे महात्मा गाधीनी आवर्जून माडल. आपल्या व्यक्तिमत्वाचा अणुरेणू स्वभाषेवर पोसला जातो. विचार करण अथवा आपले विचार सागण यासाठी स्वभाषेइतकं दुसरं प्रभावी साधन नाही. नानाविध कल्पना, विचार, भावना आपल्या मन:सागरात 'अहोरात्र तरळत असतात. स्वभाषा न वापरता असे विचार, कल्पना, भावना मनात खेळवा म्हटलं तर इंग्रजी भाषा चागल्या प्रकारे जाणणाऱ्या अनेकांनाही ते अवघड ठरेल. एखादी ठेच लागल्यावर 'आई ग' म्हणण ही जशी एक प्रतिक्षिप्त क्रिया तशीच समोर दिसणाऱ्या नानाविध व्यक्ती, वस्तू, प्रसग याच्याबद्दल स्वभाषेद्वारा अक्षरशः हजारो नोंदी मन.-पटलावर स्वभाषेतून उमटत राहण हीही हळूहळू एक प्रतिक्षिप्त क्रियाच बनते. शिक्षणामुळे व्यक्तींची 'माणसं' बनतात स्वतःचा देश, त्या देशाची संस्कृती, तेथील आजचं वास्तव्य, त्या वास्तव्याचा हुंकार म्हणून साकार होणारं साहित्य– या सर्वांचा सदर्भ माणूसपणासाठी आवश्यक असतो. हे माणूसपण जपण व जोपासणं हेच शिक्षणाचं महत्त्वाच काम. विचार, कल्पना व भावना याच्यावर परभाषेच्या माध्यमाचे लगर अडकवले की त्याचा आविष्कार दुर्मिळ होतो.

इग्रजी भाषेच्या चुका होतील, सुयोग्य शब्द सुचणार नाहीत, वाक्यरचना विस्कळीत होईल या भीतीन विचार, भावना कल्पना याचाओघच खंडित होतो असं नव्हे तर त्याचं रूप रस, गधच हरपतो.

इंग्रजी माध्यमाच्या शाळा इग्रजी भाषेला जसं अवास्तव महत्व देतात तसच महत्व इतरही काही बाबीना असतं. त्यापैकी एक बाब म्हणजे पोषाख. टाय, पॉलिश केलेले बुट, सॉक्स, इस्त्रीचे कपडे पुस्तकाइतकेच महत्त्वाचे असतात पालकमडळी ह्या बाह्य डोलाऱ्याचेही इग्रजी भाषेसारखच कौतुक करतात 'आमचा अमोल ना टायशिवाय बाहेर जात नाही. बुटाला पॉलिश नसल तर नुसता धिंगाणा घालतो. अशा वाक्यांनी अमोलविषयी कौतुकमिश्रित भाष्य पालकाच्या सवादातून झिरपत असतं· भारतासारख्या उष्णकटिबंधाच्या देशात टायनं मुलांमुलीचे गळे आवळण कितपत बरोबर असा सवाल करण्यात इग्रजी प्रेमाची झापडं आड येतात. इग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक काही शाळात तर विद्यार्थ्यांना इग्रजीच्या गुलामगिरीबरोबर डिनर ड्रेसची ताबेदारीही पत्करावी लागते शाळेचा युनिफॉर्म, खेळाचा पोषाख, बूट, डिनरड्रेस, नाईट ड्रेस यव नि त्यंव; पण हे सारं विद्यार्थ्यांजवळ असावच लागतं. पोषाखाबद्दलचा हा आग्रह म्हणजे जणू एका विशिष्ट सस्कृतीबद्दलचा अट्टाहास असतो.इग्रजी बोलायला–लिहायला येण्यासाठी टाय, बूट, सॉक्स आवश्यक असतं असं तर नसेल ना ? स्वतत्र भारतात राहूनही इंग्रजी भाषेच्या माध्यमातून चूक तर आपण करीत नाही ना याची खातरजमा करायला हवी.

### एक दुष्टचक्र

इग्रजी माध्यमाच्या शाळाचं आकर्षण वाढल्यामुळ त्याची सख्या वाढणं स्वाभाविकच आहे. सेंट जोसेफ, सेंट हेलेना यासारख एखाद नाव शाळेला देणं, एखाद्या 'फादर'ची प्रिन्सिपॉल म्हणून नियुक्ती करणं, टोलेजग इमारत उभारणं या गोष्टी फारशा अवघड नसतात. परंतु इग्रजी माध्यम पेलू शकतील असे अध्यापक मिळविण मात्र मुष्कील असत. काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील शिक्षकानाच अस्खलीत इग्रजी येत नाही. त्यानाच बिनचूक इंग्रजी बोलता येत नाही आणि मग सुरू होते एक, नवीनच धेडगुजरी भाषा. आमचे फादर दररोज सकाळी वॉकला जातात. 'you want to go, no ?' अशी विद्यार्थ्यांची वाक्यं ऐकायला मिळतात. अशा शाळांतील विद्यार्थ्यांची स्थिती आई जेवायला घालत नाही आणि बाप भीक मागू देत नाही अशी होते. त्याना नीटसे मराठी येत नाही आणि धड इग्रजीही येत नाही मराठी येत नाही म्हणून इग्रजी येत नाही आणि इग्रजी बोलाव लागत म्हणून मराठी येत नाही ! आहे की नाही मजा ?

सनदी नोकऱ्या अथवा ज्ञान–विज्ञान क्षेत्रातील प्रगती यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळा हा पवित्राच बरोबर नाही. विद्यार्थ्याला सजग, चौकस, विचारशील बनविणं, समाजाच्या तकदीराशी स्वतःच सूत्र जोडायला शिकवण, स्वतत्र देशातला एक नागरिक म्हणून स्वत.कड पहायला शिकवणं, समाजातील विविध प्रवाह आणि समस्या याच्याशी त्याचा परिचय करून देण– हीच आजच्या शिक्षणाची प्रमुख ध्येयं आहेत. ती ध्येयं साध्य करण्यासाठी इंग्रजी माध्यम उपयोगी असतं तर त्याचा राग करण्याचं कारणच नव्हत. तस नाही म्हणूनच म्हणावस वाटत की जगात जे जे काही चालल आहे हे ज्या द्वारा दिसू शकेल अशी इग्रजी भाषा ही एक खिडकी असली तरी त्या खिडकीतून जे दिसत ते जाणीवपूर्वक पाहून त्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी प्रादेशिक भाषाचेच आणि म्हणूनच महाराष्ट्रात मराठीचेच डोळे हवेत. □


## परसूच्या पशुकथा

**वसंत सबनीस । किंमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकाबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्र श्वापदांचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्याच्या अनेक स्वभाववैशिष्टयांच्या या कथा...

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

क्रीडांगण

# श्रीलंकेचा पहिला कसोटी विजय भारतापेक्षा लवकरच

**भा**रत–श्रीलंका क्रिकेट सध्या चालू असलेल्या कसोटी मालिकेत, आतरराष्ट्रीय क्रिकेट क्षेत्रात नवखा संघ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीलंका क्रिकेट संघाने भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताचा १४९धावांनी दणदणीत पराभव केला.श्रीलका क्रिकेट सघाचा कसोटी सामन्यातील हा पहिलाच विजय. या विजयासाठी श्रीलका सघाला १४ व्या कसोटीत यश आले. पण श्रीलंकेची ही कामगिरी भारतापेक्षा खूपच कौतुकास्पद आहे कारण एक दिवसाच्या सामन्यात विश्वविजेत्या ठरलेल्या भारतीय सघाला कसोटी सामन्यातील पहिला विजय २५ कसोटी सामन्यानंतर मिळाला. त्यामुळे श्रीलंकेचा पहिला कसोटी विजय हा निश्चितच उच्च दर्जाचा म्हणावा लागेल.

कसोटी क्रिकेटचा दर्जा प्राप्त झाल्यानतर श्रीलका सघाचे पाकिस्तान, इग्लड व न्यूझिलंड या सघाबरोबर कसोटी सामने झाले होते. या १२ कसोटी सामन्यापैकी काही सामन्यात श्रीलकेला पराभव पत्करावा लागला तर काही सामने अनिर्णित राहिले. पण प्रत्येक पराभवाच्या वेळेस श्रीलंका सघाने पराभव टाळण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली होती. अखेर १४ व्या कसोटीत श्रीलकेच्या प्रयत्नाना यश आले व त्यांनी घरच्याच मैदानावर कसोटीतील पहिल्या विजयाची नोद केली.

भारत–श्रीलका याच्यातील लढतीत तरुण खेळाडूचा समावेश असलेला श्रीलकेचा सघ भारताला चागलीच झुज देणार हे पहिल्या एक दिवसाच्या सामन्यात सिद्ध झाले होते. त्याचेच प्रत्यतर दोन कसोटी सामन्यात आले. कसोटी सामन्याचा फारसा अनुभव नसतानाही श्रीलका सघाने भारतासारख्या अनुभवी सघावर कायम वर्चस्व गाजविले ते साधिक खेळाच्या जोरावरच. पराभव पत्करायचा नाहीच, शिवाय विजयासाठी सर्वस्व पणाला लावायचे या उद्देशाने खेळणाऱ्या श्रीलकेच्या खेळाडूनी, अनुभवापेक्षा प्रत्यक्ष कृतीच जास्त सरस ठरते हेच भारताला दाखवून दिले. पहिल्या कसोटी सामन्यात विजय हुकलेल्या श्रीलंका सघाने दुसरी कसोटी जिंकायचीच हे ठरवूनच खेळ केला.

दुसऱ्या कसोटी सामन्यात श्रीलंकेला नाणेफेक हरूनही प्रथम फलदाजी मिळाली. श्रीलकेला प्रथम फलदाजी देण्याचा कपिलचा निर्णय किती चुकीचा होता हे भारतीय क्षेत्ररक्षकानी गचाळ क्षेत्ररक्षण करताना दाखवून दिले. तब्बल सात झेल सोडून भारतीय क्षेत्ररक्षकानी श्रीलकेच्या पहिल्या कसोटी विजयाची पायाभरणीच केली. गचाळ क्षेत्ररक्षण व भारताची दिशाहीन गोलदाजी यामुळे श्रीलका सघाने पहिल्या डावात३८५धावाचा डोगर उभारला. यामध्ये अमल सिल्वाचे शतक (१११), डायसच्या झंझावती ९५ धावा व रजन मुदगले व कर्णधार मेडिस याच्या दमदार अर्धशतकाचा समावेश होता. भारतीय क्षेत्ररक्षकानी हातात घेतलेले झेल सोडल्यामुळे श्रीलंकेची धावसख्या ३८५ पर्यंत जाऊ शकली. क्षेत्ररक्षणाप्रमाणेच भारताची मर्यादित गोलदाजीसुद्धा श्रीलंकेच्या पथ्यावर पडली.

३८५ धावा करायच्या या उद्देशाने राजपूत व श्रीकात यानी डावास प्रारंभ केला पण एखाद्या महोत्सवी सामन्यात खेळतात त्याप्रमाणे भारताचे राजपूत, अझरुद्दिन व वेंगसरकर हे अवघ्या १ धावेतच तंबूत परतले. याच ठिकाणी श्रीलका आघाडी मिळविणार हे स्पष्ट झाले व 'फॉलोऑन' वाचविण्याची कामगिरी इतर फलदाजाना करावी लागली. 'टेस्ट टेम्परमेंट' नसलेल्या के. श्रीकातने झंझावती ६४ धावा केल्या; पण तो बाद झाल्यावर भारताचा डाव ५ बाद ८८ असा घसरला. यावेळेस अनुभवी गावस्कर व मोहिंदर यांनी केवळ अनुभवाच्या जोरावरच भारताचा डाव सावरला. यामुळेच भारताला 'फॉलोऑनची' नामुष्की टाळता आली पण भारताचा डाव २४४ धावावर सपला व श्रीलकेला १४१ धावाची निर्णायक आघाडी मिळाली. दुसऱ्या डावातही श्रीलकेच्या वेट्टिमुनी, डायस व अरविंद डिसिल्वा यानी झझावाती फटकेबाजी केल्याने कर्णधार मेंडिसने भारताला चौथ्या दिवसाच्या अखेरीस विजयासाठी ३८५ धावा करण्याचे आव्हान दिले. हे आव्हान भारताने स्वीकारले नाहीच पण सामना अनिर्णित राखण्यासाठी एक दिवस फलदाजी करण्याची क्षमताही नसल्याचे सिद्ध केले. भारताच्या दुसऱ्या डावात फक्त १९८ धावा झाल्या. कपिलदेवने ७८ धावा करताना अत्यंत निर्दोष खेळ केला. कपिलदेवने केलेला खेळ इतर फलदाज करू शकले नाहीत. त्यामुळेच भारताला पराभव पत्करावा लागला. भारतीय संघ एक दिवसाच्या सामन्यात 'विश्व विजेता' असला तरी कसोटी सामन्यात खेळण्याचे तत्र भारतीय फलंदाज विसरू लागले आहेत हेच या पराभवाने सिद्ध केले.

डाव्या यष्टीवरून बाहेर जाणाऱ्या चेंडूला बॅट लावण्याचे चुकीचे तत्र भारतीय फलदाजानी पुन: वापरले आणि त्यातच भारताचे पितळ उघडे पडले. बेजबाबदार फलदाजी हे भारताच्या पराभवाचे कारण असले तरी मेंडिसचे कुशल नेतृत्व व डिमेल, रत्नायके व अहंगामा याच्या मध्यमगती माऱ्याला यष्टीरक्षक जमल सिल्वा याच्यासह इतर क्षेत्ररक्षकानी दिलेली उत्कृष्ट साथ हेच श्रीलकेच्या विजयाचे प्रमुख कारण आहे. श्रीलकेने केलेला दर्जेदार साधिक खेळच त्याना विजय मिळविण्यासाठी उपयोगी ठरला.

श्रीलकेच्या खेळावर वेस्ट इंडिजच्या खेळाची सावली निश्चितपणे आहे. महान अष्टपैलू क्रिकेटपटू गॅरी सोबर्सचे मार्गदर्शन व श्रीलकेच्या तरुण खेळाडूची चिकाटी हे विजयाचे आणखी एक कारण आहे. वेस्ट इडिजचे क्रिकेट ज्या तऱ्हेने चालतेय तीच पद्धत मेंडिस व त्याच्या सहकाऱ्यानी वापरली आहे. फिरकी गोलदाजीचा कमीत कमी वापर, आक्रमक क्षेत्ररक्षण, मध्यमगती गोलदाजाचाच आलटून पालटून वापर हेच तत्र मेंडिसने वापरले. यावरून श्रीलकेचे क्रिकेट वेस्ट इडिजप्रमाणेच आक्रमक होईल यात शकाच नाही. 'जिंकण्यासाठीच खेळणे' हे एकमेव ध्येय बाळगून श्रीलकेचे खेळाडू यापुढेही असेच खेळत राहिले तर ते निश्चितच विश्व विजेते ठरतील यात शकाच नाही. कसोटीत पहिला विजय नोदविणाऱ्या श्रीलंका क्रिकेट सघाचे मन.पूर्वक अभिनदन !

—अष्टपैलू

रंगभूमी

# आईशप्पत

## नाना पाटेकरच्या अभिनयासाठी अवश्य पाहावे असे नाटक

वि. भा. देशपांडे

'आईशप्पत' हे मगेश कुलकर्णीचे नाटक. एका परकीय कलाकृतीचा आधार घेऊन रचलेले. मोजके, वेगळे पण लक्षवेधी नाट्यलेखन करणाऱ्या तरुण नाटककारांपैकी मगेश कुलकर्णी हा एक लेखक आहे त्याचे आधीचे नाट्यलेखन काव्यात्म वृत्तीचे दर्शन घडवणारे आहे. अर्थात प्रस्तुत नाटक जरा वेगळ्या प्रकृतीचे, वेगळ्या ढगाने जाणारे असे आहे

बाप आणि त्याची ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर उभी असलेली मुलगी याच्या सघर्षावर नाटकाचा सारा प्रपच थाटलेला आहे. दर्शनी हे नाटक बापलेकीच्या सघर्षाचे वाटले तरी आणि जरी तसे ते असले तरी सर्वस्वाने तसे नाही. तर ते दोन पिढीतील संघर्षाचे रूप धारण करण्याच्या स्तरापर्यंत जाणारे आहे आपण त्याकडे जसे पाहू त्याप्रमाणे ते आपल्याला भावते !

हा बाप आपल्या बायकोला, मुलाला-मुलीला सोडून मोठ्या शहरात आलेला आहे चित्रपटक्षेत्रात एक पटकथालेखक म्हणून त्याचे नाव आहे. त्याने इकडे आल्यावर लग्न केलेले नाही, पण त्याला समजावून घेणाऱ्या एका मैत्रिणीबरोबर तो राहतो आहे काही वर्षे लोटल्यावर त्याची मुलगी बापाला भेटायला येते. तिचे एक स्वप्न आहे, चित्रपटात नायिका होण्याचे. त्या एका कांक्षेने ती झपाटली आहे. शक्य झाले तर बापाच्या ओळखीने नाही तर स्वत चा मार्ग शोधीत तिला आपली मनीच्छा पूर्ण करायची आहे पण खरेतर नाटकाचा हा एक भाग आहे या मुलीचे बापाच्या घरी येणे आणि त्याच्याशी प्रदीर्घ सवाद होणे हा मुख्य गाभा आहे. हा दीर्घ संवाद बापाला उद्ध्वस्त करणारा आणि आपल्याला अतर्मुख करणारा असा आहे.

तीन पात्राचे हे नाटक. खरे तर दोन प्रधान पात्रे आणि एक गौण पात्र. नाटकात घटना–प्रसग प्रत्यक्ष दिसण्याचा भाग कमी. स्वाभाविकच शब्दसंवादावर भर अधिक. मंगेशने या सवादाची शब्दनिवड, गती आणि नाट्यपरिणामासाठी आवश्यक असलेला बाज उत्तम राखला आहे. अशा सवादाना मिताक्षराची गरज असते अलकारिक सुभाषितवजा वाक्यांचा मोह टाळायचा असतो. याचेही भान मंगेशने राखले आहे. त्यामुळे सवादांतून व्यक्त होणारा नाट्यविषय-आशय प्रवाहीपणे व्यक्त झाला हे सारे मान्य करूनही एक गोष्ट सतत जाणवत राहिली ती म्हणजे यातल्या मुख्य नाट्यप्रमेयाचा आणि विषयातला परकेपणाचा भाव अशी अठरा एकोणीस वर्षांची मुलगी भारतीय किंवा मराठी सस्कृतीच्या संदर्भात, कौटुंबिक वातावरणाच्या सदर्भात घरापासून दूर गेलेल्या बापाला किती आणि कोठपर्यंतचे जीवन-तपशील विचारेल असे मनात येऊन जाते. ज्या परकीय सस्कृतीत घटस्फोट किंवा कुटुबापासून विलग राहणे इत्यादी गोष्टी सवयीच्या आहेत तिथे हा विषय सलगीचा, नित्याचा वाटेल आपल्याकडे अशी उदाहरणे नाहीत असे कोणीच म्हणणार नाही, पण त्याचे प्रमाण अत्यल्प आहे आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे जे अत्यल्प प्रमाण आहे त्याला प्रतिष्ठा नाही, ते अजून आपल्या जगण्याचा भाग झालेले नाही. त्यामुळे अशी बापलेकीची भेट आणि तिचे धीटपण हे आपल्याला गृहीत धरूनच नाटक पाहावे लागते. एकदा मूळ नाट्यप्रमेय मान्य केले तर पुढच्या अनेक शकांना आपली आपण उत्तरे शोधीत राहतो.

नाटकाचे प्रयोगरूप विलोभनीय आहे. नाना पाटेकर बापाच्या भूमिकेत आहे आजच्या व्यावसायिक रगभूमीवर अभिनयाच्या ताकदीच्या सदर्भात जे तरुण अभिनेते आहेत त्यामध्ये नाना हा प्रथमश्रेणीतला कलाकार आहे आविष्कार नाट्यसस्थेने केलेल्या बालनाट्यात 'आला अडाण्याचा गाडा' किंवा त्यानतरचे महत्त्वाचे नाटक 'पाहिजे जातीचे' ज्यानी त्या काळात पाहिली असतील त्याना नानाच्या अभिनयगुणाची आरंभखूण ध्यानी आली असेल पुढे 'महासागर', 'पुरुष' नाटकात महत्त्वाच्या भूमिका करून व्यावसायिक रंगभूमीवर त्याने आपले स्थान पक्के केले. एक चरित्र अभिनेता म्हणून तो वेगवेगळ्या भूमिकाचे आव्हान लीलया पेलू शकतो हे त्याने प्रस्तुत नाटकात पुन्हा एकदा प्रस्थापित केले आहे आवाजाचा काहीसा खालचा थर वापरून शब्दावरची हुकमत कायम ठेवून नाट्यपरिणाम साधण्याचे कौशल्य त्याच्याकडे कसे आहे याचा प्रत्यय या नाटकात येतो. त्याने कोणत्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा न करता किंवा भडक अभिनयाच्या युक्त्या न वापरता आपल्या भूमिकेतील तपशील प्रेक्षकापर्यंत पोहोचवला. बापलेकीतले भावताण स्वराभिनयाने व्यक्त केले. नानाच्या आतापर्यंतच्या भूमिकेत ही एक लक्षवेधी भूमिका म्हणून उल्लेख व्हावा इतकी ती चागली झाली. विद्या चितळे मुलीच्या भूमिकेत होती भूमिकेला आवश्यक त्या वयाची ती जरूर आहे, पण तिच्या चेहरेपट्टीच्यामुळे ती आहे त्यापेक्षा अधिक मोठी वाटते. त्याहीपेक्षा तिच्या आवाजाची पसरट जात असल्याने अनेक संवादातला भावाशय तितका ताकदीने व्यक्त होत नाही असे ध्यानात येत होते. ज्यावेळी रगमचावर सख्येने कमी व्यक्तिरेखाची उपस्थिती असते तेव्हा त्या पात्रावर सर्वार्थाने लक्ष केंद्रित होते, त्यातले बारकावे जास्त प्रमाणात ध्यानात येतात नानाच्या तुलनेत विद्याचा बोलण्याचा फरक जाणवत होता. तिच्या भूमिकेतला आक्रमकपणा अधिक प्रमाणात व्यक्त होत होता त्याची इतकी गरज नव्हती या दोन व्यक्तिरेखाना साह्यभूत असणारी, क्वचित मध्यस्थ झालेली भूमिका सोनाली जोशीने केली तिचे दिसणे, बोलके यथायोग्य होते तिच्या व्यक्तिरेखेला पुरेसा वाव नसल्याने तिच्याकडे उत्तम अभिनयगुण असूनही तिला सधी नव्हती.

नाटकाचे दिग्दर्शन प्रकाश बुद्धिसागरने केले होते प्रकाशने अलिकडच्या काळात काही चागली नाटके दिग्दर्शित केलेली आहेत विशेषतः विनोदी–फार्सिकल नाटकाच्या दिग्दर्शनात त्याची कामगिरी लक्षवेधी ठरलेली आहे. पण प्रस्तुत नाटक सर्वार्थाने वेगळ्या बाजाचे आहे, हे ओळखून त्याने त्या दृष्टीने प्रयोगाची दिशा ठेवली. नेपथ्य, सगीत आदी गोष्टी प्रयोगाला पूरक, अनुकूल अशाच आहेत

नाट्यविषयासाठी आणि नाना पाटेकरच्या अभिनयासाठी हे नाटक जरूर पाहावे. □

# भडक हाताळणीमुळं अनाकर्षक 'आखिर क्यूं'

त्या त्या काळातले चलनी सामाजिक प्रश्न घेऊन चित्रपट काढायची परपरा काही नवी नाही. 'अर्थ' च्या यशानतर स्त्रियां-भोवती फिरणारे, त्याचे प्रश्न माडणारे अनेक चित्रपट आले आहेत, येऊ घातले आहेत. पण आव स्त्रियाचे प्रश्न माडण्याचा आणला तरी त्या तळमळीने चित्रपट बनविल्याच फारस दिसत नाही उलट त्याच भाडवल करून नेहमीचाच चित्रपट प्रेक्षकाच्या माथी मारल्याचं दिसत 'अर्थ' नंतर या विषयावरचा तितका प्रभावी चित्रपट निर्माण न झाल्याच हेच कारण असावं जे ओमप्रकाश निर्मित–दिग्दर्शित 'आखिर क्यू' या चित्रपटाच हेच झालं आहे. या चित्रपटाची कथावस्तू 'अर्थ'-शी खूप मिळतीजुळती आहे पण इथ फरक आहे दिग्दर्शनाचा. महेश भटच्या प्रतिभाशाली दिग्दर्शनामुळ 'अर्थ' जितका सुदर बनला होता तितकाच जे. ओमप्रकाशच्या कल्पनाशून्य दिग्दर्शनामुळ 'आखिर क्यू' भडक आणि प्रभावहीन बनला आहे.

'आखिर क्यू' हे नाव तस चित्रपटाशी फारस सुसंगत नाही. पण 'अ' पासून चित्रपटाच नाव ठेवायच्या जे ओमप्रकाशच्या सवयीमुळ तस ठेवलं गेल असाव. मग त्या नावाचा कथेशी काहीतरी सबध जोडायची आठवण अचानक शेवटी झाल्यान चित्रपटाच नाव येईल असे दोन–तीन डायलॉग टाकले आहेत.

चित्रपटाची नायिका निशा (स्मिता पाटील) ही एक अनाथ तरुणी मामा–मामीच्या आश्रयानं वाढणारी. तिच्या मैत्रिणीच्या लग्नात आलेल्या कबीर (राकेश रोशन) या श्रीमत तरुणाला ती आवडते. कबीर हा स्वच्छदी वृत्तीचा तरुण. आपल्या वागण्याला विरोध करणार नाही अशी घरेलू मुलगी त्याला बायको म्हणून हवी असते. म्हणून निशाची सुदर मामेबहीण इदू (टीना मुनीम) आपल्याकडे आकर्षित झाली आहे हे दिमत असतानाही तिला डावलून तो निशाशी लग्न करतो.

आपल्या डोळ्यादेखत कबीरला हिरावून नेला हे पाहून इदू चिडते. याचा बदला घेण्याची वाट ती पहात रहाते आणि निशाच्या आजारपणात तिला ती सधी मिळते. इतके दिवस निशाशी बऱ्यापैकी प्रेमान वागणारा कबीर दिग्दर्शकाची सोय बघायची म्हणून लगेचच इंदूच्या जाळ्यात सापडतो. अशाप्रकारे भरपूर भडक, कौटुंबिक प्रसग घालण्यासाठी दिग्दर्शकाची सोय त्यान करून दिली आहे

काही दिवसासाठी पाहुणी म्हणून आलेली इदू आपली प्रतिस्पर्धी बनली हे पाहून निशा काही दिवस रडारड करते. पण एवढंच केलं तर चित्रपट इथच सपवावा लागेल याची जाणीव झाल्यावर ती झट्कन उठते आणि आपल्या लहान मुलीचा मोह आवरून घर सोडते

पूर्वी कबीरची बायको म्हणून आपणच उद्घाटन केलेल्या एका निराधार स्त्रियाच्या संस्थेत ती आश्रय घेते तिथ उची साडी वगैरे नेसून एक गाणंही म्हणते आणि त्याच दूरदर्शनसाठी चित्रीकरणही होतं! हे चित्रीकरण करायला आलेला असतो आलोक. (राजेश खन्ना) गाण्याच दूरदर्शसाठी चित्रीकरण वगैरे झाल्यावर निशा नायिका असल्यानं तिला साहजिकच लगेच दूरदर्शन निवेदिकेची नोकरीही मिळते. मग आलोकची आणि तिची मैत्री वगैरे

ती चांगल लिहू शकते हे ओळखून तो तिला लिहायला प्रोत्साहन देतो. आशाश्री या नावान पचवीस–तीस कादबऱ्या वगैरे ती लिहिते. पूर्वाश्रमीच्या नवऱ्याला मुलीच्या लग्नासाठी मदत करते. इतक झाल्यावर 'स्त्रीच्या आयुष्यात पुन्हा बहार का येऊ नये' अस विचारून तिला लग्नासाठी आग्रह धरणाऱ्या आणि चुन्याच्या डबीप्रमाण कुकवाची डबी सतत बरोबर घेऊन फिरणाऱ्या आलोकच्या मागणीचा शेवटी ती स्वीकार करते

हा शेवट सोडला तर 'अर्थ'शी खूप मिळतीजुळती असलेली ही कथा पण ठिसूळ पटकथा, सुमार दिग्दर्शन आणि अभिनय यामुळ ती प्रभावहीन आणि मेलोड्रॅमॅटिक बनली आहे. जे. ओमप्रकाशने एवढे चित्रपट काढले आहेत. पण अजून तो प्राथमिक पातळीवरच वावरतो आहे. साध्या – साध्या प्रसंगातूनसुद्धा त्यानं कलावंताना आरडाओरडा, रडारडी करायला लावली आहे. चित्रपटाचा आणखी एक दोष म्हणजे तो विलक्षण लाबला आहे. उत्तरार्ध तर जितका कटाळवाणा होईल तितका करण्याची दक्षता त्याने घेतली आहे उदा. निशाच्या मुलीचं लग्न हा प्रसग इतका ताणला आहे की, तिची गाडी सासरी पोचेपर्यंत आपल्याला दाखवणार का अस वाटायला लागतं. मुलीला सोडून जातानाही निशानं एवढा नाटकी सवाद म्हणायची गरज होती का?

डॉ. अचला नागर याची पटकथाही सुमार आहे. कुठलच पात्र नीटस उभ राहू शकलेल नाही मध्यवर्ती भूमिका निशाची. ती कर्तबगार वगैरे दाखवली आहे पण बऱ्याचदा तिला स्वत.च काही मतच नाही अस वाटत रहातं. इदूचही तेच. एकीकडून तिला बहिणीचा सूडही घ्यायचा असतो आणि तिच्याबद्दल सहानुभूतीही वाटत असते. एकूण आपण काय करायच याबाबत लेखक–दिग्दर्शकाचा जाम गोधळ झाला आहे.

नायिका निशाच्या भूमिकेत स्मिता पाटील आहे. तिला वाव बरा आहे आणि तिन कामही ठीक केल आहे. पटकथेतच काही इतके मूर्ख प्रसग आहेत की, ते वठवताना ती निष्प्रभ वाटते. त्याचा तिच्या सपूर्ण कामगिरीवर परिणाम झाला आहे. त्यामुळच असाव कदाचित, ती अभिनयाची अपेक्षित उची गाठू शकलेली नाही.

कबीर आणि इदू म्हणून राकेश रोशन–टीना मुनीम आहेत मुळात या भूमिका निगेटिव्ह स्वरूपाच्या, त्यात या मडळींची अभिनयाबद्दल फारशी ख्याती नाहीच. त्यामानान ते ठीक आहेत असच म्हणायला हव. फक्त केस पांढरे दाखवून टीनाला प्रौढ दाखवण्याचा प्रयत्न मात्र हास्यास्पद आहे.

राजेश खन्ना आलोकच्या भूमिकेत आहे. ही भूमिका त्याच्या भूमिकाशी मिळतीजुळती दुसऱ्याना सतत आनदी ठेवण्याचा प्रयत्न करणारी ही व्यक्ती पण राजेश या भूमिकेत विलक्षण निष्प्रभ ठरला आहे. उकडलेल्या बटाट्यासारख्या दिसणाऱ्या त्याच्या चेहऱ्यावर काही भावच उमटत

नाहीत. उगीचच उड्या वगैरे मारून ' अभी मैं जवान हूँ ' असं स्वतःच पोट सांभाळत दाखवण्याची त्यानं जी कसरत केली आहे ती केविलवाणी वाटते. अशाच भूमिकेतला ' अर्थ 'मधला राजकिरणचा संयमित अभिनय आठवला की राजेशचं अपयश अधिकच जाणवतं.

चित्रपटात सगळ्यात उठून दिसणारी गोष्ट म्हणजे राजेश रोशनचं संगीत. जवळजवळ सगळी गाणी त्यानं श्रवणीय दिली आहेत. ' एक अंधेरा, लाख सितारे ' हे तर खास लक्षात रहाण्यासारखं.

एकूण काय, हा चित्रपट पाहिल्यावर तो काढला कशाला, आपण तो पाहिला कशाला असे प्रश्न प्रेक्षकाला पडतात आणि ' आखिर क्यूं ?' अशी त्याची अवस्था होते.

—सीमा कुलकर्णी

## पुरुषोत्तम स्पर्धा

पृष्ठ ५ वरून

' तुमचे आमचे गाणे ' ही नाटिका सादर केली. कुठल्याही चलूप्त्याचा वापर न करताही एकांकिका रंगली; पण ' भरत 'च्या ध्वनिक्षेपकानी आपल्या परंपरेनुसार दगा दिला. लिहिणारे लिहून लिहून थकले पण ' भरत 'च्या ध्वनिक्षेपकाच मात्र काही भलं झालेलं नाहीये. पुणे विद्यापीठ जिमखान्याच्या ' प्रसन्न पंडित 'मध्ये एका राजकीय नेत्याची लंबी-चौडी भाषणे होती आणि एको सिस्टीमचा वापर करून त्यातून जाहीर सभेचा फील आणण्याचा दिग्दर्शकाचा प्रयत्न होता. पण त्या दिवशी ध्वनिक्षेपकाचं काही तरी बिनसलेच होते. त्यामुळे प्राथमिक फेरीत प्रेक्षकानी उचलून धरलेली ही भाषणे अंतिम फेरीत कंटाळवाणी ठरली. ' प्रसन्न पंडित 'मध्ये एका छापील कार्यकर्त्याचा राजकीय स्वार्थासाठी नेतेमंडळी किती खालच्या थराला जाऊन ' वापर ' करू शकतात याचं प्रत्ययकारी दर्शन घडलं. या वर्षी बऱ्याच नाटिकांचा विषय राजकारण होता. त्यामुळे अनेक युवक कलावंताना पुढारी बनून वावरण्याची संधी मिळाली पण मुरब्बी राजकारण्याचं वैशिष्ट्य त्यांच्या दिखाऊ विनयशीलतेत असतं. हे ' प्रसन्न पंडित 'मधील श्रीरंग चितळे सोडता सगळेच विसरले. चितळेंना काकाजी जोगळेकर पारितोषिक यादीतून का वगळण्यात आलं हे परीक्षकच जाणे !

तारुण्यात पौरुष गमावलेला चित्रकार पती आणि मातृत्वाच्या वेडानं झपाटलेली त्याची पत्नी यांच्यामधील भावनिक नाट्य स. प. महाविद्यालयानं पेश केलेल्या ' ब्लॅक अँड व्हाइट 'मध्ये पहायला मिळालं. विद्यार्थी लेखक मिलिंद गाडगीळ नाटिकेतील दोन्हीही पात्रांना भावनिक आणि साहित्यिक न्याय देऊ शकले आणि लेखकाची ही प्रतिज्ञा माधुरी गद्रे यांनी आपल्या दिग्दर्शनातून व अभिनयातून फळास नेली. संगीत नियोजक जयदीप ढमढेरेनं कळसाच्या बिंदूला चपखल गझल वापरून एकांकिकेच्या शेवटाला वेगळे परिमाण प्राप्त करून दिले.

स्पर्धेच्या संयोजनातील श्री. राजाभाऊ नातू, श्री. मधु जोशी आणि ' कलोपासका '-च्या कार्यकर्त्यांची शिस्त, निष्ठा, तळमळ हा एका वेगळ्या लेखाचा विषय होऊ शकतो. प्रेक्षागृहातील तरुण तुर्कांना आवरण्यासाठी कलोपासकाना 'बलोपासक'ही बनावे लागले असा तिरमिरीचा पाव तास प्राथमिक फेरीच्या अखेरच्या दिवशी उभाही ठाकला होता. पण परिस्थिती वेळीच आवरली गेली.

या स्पर्धेचे कॉन्ट्रिब्युशन काय वगैरे प्रश्न आता बिनधारी झालेयत. प्रत्येक स्पर्धा प्रत्येक वर्षी काही ना काही तरी कॉन्ट्रिब्युट करतच असते या वर्षी अंतिम फेरीतील ९ एकांकिकांपैकी ५ एकांकिकांचे लेखक हे विद्यार्थी होते युवकाना अभिनय करायला लावणे ही अवघड बाब आहे. पण त्याहूनही अवघड त्याना लिहिते करणं असतं. पुरुषोत्तमने अप्रत्यक्षपणे विद्यार्थी लेखकाना प्रोत्साहित केलं आहे. या वर्षीच हे सगळ्यात मोठ कॉन्ट्रिब्युशन मानावं लागेल. □

## नव्या जाणिवा, नवी तंत्रं... आणि ठरलेली गिमिक्स...

अस्मिता दीक्षित

हे युवक वर्ष. शिवाय सध्या जरा तरुण मनाच्या जाणिवा, संवेदना... वगैरेकडे लक्ष द्यावंसही अनेकाना वाटू लागलंय. तरुण मनेही बऱ्यापैकी प्रगल्भता दाखवून आशा निर्माण करू लागलंय. ' पुरुषोत्तम करंडक ' स्पर्धेतल्या एकांकिका पाहूनही याची खात्री पटायला हरकत नाही.

ही स्पर्धा केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी— त्यामुळे व्यावसायिक सफाईची अपेक्षा नसतेच. विद्यार्थी कलाकाराना व्यासपीठ मिळावं— त्यांच्यातली प्रयोगशीलता प्रगट व्हावी, सुप्त गुणाना आव्हान मिळावं, रंगभूमीशी त्याचं नातं जुळावं, या उद्देशानं या स्पर्धेचं संयोजन होतं ' सेन्सॉरशिप ' नसलेली ही स्पर्धा अनेकांच्या प्रतिभेला मुक्त वाव देण्यासाठी निर्माण केलेली. या विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या गोष्टींचा विचार करून गुणांची आखणी तंत्राना, नेपथ्याला, संगीताला फारसं महत्त्व नसून संभाषण— हालचाल— मुद्राभिनय— परिणामकारकता— दिग्दर्शन नैपुण्य— वाचिक अभिनय— वैयक्तिक अभिनय या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवलं जातं.

प्रतिसाद वर्षानुवर्ष वाढतच चाललाय. एकूणच स्पर्धेबद्दल महाविद्यालयीन कलाकाराना असलेलं आकर्षण आणि स्पर्धेची प्रतिष्ठा दिवसेंदिवस वाढत चालल्याचं हे लक्षण स्पर्धेच्या वेळी होणारी महाविद्यालयीन प्रेक्षकांची गर्दी, आपल्या कॉलेजच्या एकांकिकेबद्दल त्याना वाटणारं प्रेम, इतराबद्दल वाटणारी स्पर्धेची भावना, सर्वांच्याच मनात उफाळणारा उत्साह आणि ह्या साऱ्या गोष्टी प्रेक्षागृहात प्रगट करण्याच्या नवनवीन पद्धती, हे पाहून तर कुणीही थक्क होईल. अर्थात एकदा तरुणाचा ' बंडखोर ' असण्याचा हक्क मान्यच केल्यानंतर दुसरं काही करणंही शक्य नाही म्हणा.

प्राथमिक फेरीचे दहा दिवस ' भरत ' च वातावरण नुसतं झिंग आणणारं. रोज तीन एकांकिका. पुण्यातल्या, पुण्याबाहेरच्या महाविद्यालयाच्या. निरनिराळे विषय सादर करण्याच्या निरनिराळ्या पद्धती. कलाकारात जाणवणारं वेगळेपण. तरीही एकूणच राजकीय विषयाची, प्रहसनाची बऱ्यापैकी चलती आहे आमच्या रोजच्या जिव्हाळ्याचा विषयन ! बाकी मग, उल्लेख करण्यासारख्या म्हणजे शाहू कॉलेजची ' हंगर्स स्ट्राईक ' ही चांगली सादर केलेली ब्लॅक कॉमेडी, ' माठ आणि युरेका ' ही बी. जे. मेडिकलची एक सुंदर विनोदी एकांकिका. ' अरे माणसा ' हे

आदर्श बहुव्यापी शिक्षण सस्थेच मूकनाटय- 'प्रयोग' म्हणून हे मूकनाटय चागल यशस्वी झाल अतिम फेरीत गेलेल्या नऊ एकाकिका-खेरीज या तीनही एकाकिका बऱ्यापैकी भाव खाऊन गेल्या आणि अतिम फेरीत गेलेल्या एक/दोन एकाकिकानी आपण काही चागल्या एकाकिका 'वेळेच बधन' न पाळल्यामुळे डिबार झाल्यान, चूकून वर चढलो आहोत, हेही जाणवून दिल.

यापूर्वी स्पर्धेचा असणारा दर्जा आणि यावर्षीचा दर्जा, अशी तुलना कुणी करू नये. उगीच आपलं- पूर्वी कस सगळ दर्जेदार-सकस होत आणि हल्ली कशी भेसळ होत चाललीय, दर्जा कमी होत चाललाय, अशी बडबड करण्यात अर्थ नाही शिवाव 'प्रयोगाचा' दर्जा विचारात घ्यायचा नसतो. महत्त्व आणि नाविन्य याचा विचार करायचा असतो. तस पहाता दिग्दर्शनात फारसे निर-निराळे, एकदम जाणवणारे प्रयोग सापडले नाहीत; पण लेखनात मात्र दोन एकाकिकाच्या बाबतीत जरा वेगळे विषय हाताळले गेले. एक 'रिॲक्शन' ही आबासाहेब गरवारे महाविद्यालयाची एकाकिका आणि दुसरी बी. जे मेडिकलची ॲनेस्थेशिया. यात 'रिॲक्शन' चं दुर्दैव अस की, त्याचा प्रयोग मात्र फारसा यशस्वी झाला नाही. विषय साधारण 'मृत्यूचा अध्यात्मिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून अर्थ लावण्याचा प्रयत्न' असा होता. 'ॲनेस्थेशिया' एक काल्पनिक (फिक्शन) होती. एक मानसशास्त्रज्ञ- वेडा झालेला- त्याच आत्मकथन- तीन प्रकारच्या वेडाची उदाहरण देत.

या एकाकिकेला सर्वोत्कृष्ट लेखनाचं बक्षीस मिळालं चद्रशेखर फणसळकरन आपल्याच एका लेखावरून ही एकाकिका लिहिलेली. दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिकाही त्याचीच. पण अंतिम फेरीसाठी निवड झालेली ही एकाकिका एकूण प्रयोगाच्या मर्यादा लक्षात घेता पहिल्या तीनात लागणं शक्यच नव्हत. एक तर एकाकिकेचा नायक वगळता इतर कुणी फारसा प्रभाव पाडू पाडू शकल नाही आणि इतर बाबीही फारशा लक्षवेधी नव्हत्या. स्वत फणसळकरच्या अभिनयात मात्र प्रगल्भता जाणवते. शक्य असूनही त्यानं 'ओव्हर ॲक्टिंगचा' मोह टाळलेला दिसला दिसला आणि एका 'चाळीशीच्या मानसशास्त्रज्ञाची' भूमिका आपण करतो आहोत याच भान त्यानं हावभाव-हातवारे करताना खूपच ठेवल होत. विशेषत: काही लकबी तर वाखाणण्याजोग्याच होत्या. उदाहरणच द्यायचं तर सिगरेट पेटवण्याची, एखादी गोष्ट समजावून-शिकवून सांगण्याची वगैरे.

अतिम फेरीतल्या पारितोषिक प्राप्त न ठरलेल्या इतर एकाकिका पाहून जाणवलेली गोष्ट म्हणजे, अजूनही आपल्याकडे 'गिमिक्स' पाहून टाळ्याचा कडकडाट होतो त्यामुळे 'गिमिक्स'चा वापर सढळ हातान केलेला. एकाकिका माध्यमाचा कुणी फारसा सखोल विचार केलेला दिसत नाही

## नेपथ्य-प्रकाश-ध्वनी

नेपथ्य-सजावट म्हणजे अजूनही कित्येकाना स्वैर कल्पनाविस्तार वाटतो. प्रेक्षकाना पहिल्याच दर्शनात गारद करण्यासाठी नेपथ्याचा वापर खूपजणानी केलेला दिसला.

प्रकाशाच्या बाबतीतही तेच. एखाद्या हौशी-श्रीमंत बाईनं- समारंभाला जाताना असतील त्या सर्व दागदागिन्याचं प्रदर्शन करण्याचा प्रयत्न करावा, तसच काहीस लाईटस्च्या वापराबाबत चाललेलं असतं.

ध्वनीचं, पार्श्वसगीताच महत्त्वही आता सगळयाच्या बऱ्यापैकी लक्षात आलय. त्यामुळं प्रेक्षकाच्या अंगावर तोही आदळण्यात येताचा 'दंगा' आणि 'प्रसन्न पडित' या दोन्ही एकाकिकाचं ते वैशिष्टय आणि 'शिपान' या तिसऱ्या क्रमाकाच्या एकाकिकेचेही. 'दगा' आणि 'प्रसन्न पडित'च दुसरं वैशिष्टय म्हणजे त्याच लेखन. श्रीनिवास जोशी या विद्यार्थी लेखकाच्या या दोन्ही एकाकिका राजकीय पार्श्वभूमी लाभलेल्या. या दोन्ही एकाकिकात तरुणाच्या (बडखोर आणि गुड) तोंडच्या भाषेची अगदी सढळ उधळण आहे. बाकी मालमसाला नेहमीचाच.

भाषेच्या बाबतीतला प्रचंड वेगळेपणा 'आसाचा फेरा' या चक्क 'पुरुषोत्तम करडक' विजेत्या एकांकिकेत सापडतो. वारली जमातीवरच्या या एकाकिकेत वारली भाषा जशीच्या तशी जपण्याचा खूप चागला प्रयत्न केलाय. नेपथ्य आणि प्रकाशयोजनेच्या बाबतींतही ही एकाकिका बाजी मारून जाते. दिग्दर्शकानं सर्वच पात्रांच्या अभिनयातल्या नेमकेपणासाठी परिश्रम घेतलेले जाणवतात. त्यासाठी तो आधी वसईत वारली लोकाच्या वस्तीत जाऊन राहिला होता तिथे फोटो काढून, लोकाचं बोलणं टेप करून, त्याच्या वेशभूषेच निरीक्षण करून, त्यान प्रयोगात वास्तवता आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केलेला आहे आणि तो खूप प्रमाणात सफल झालाय हे विशेष त्याचा स्वत.चा नायकाच्या भूमिकेतला अभिनयही लक्षात राहणारा या एकाकिकेच्या दिग्दर्शनाबाबत अजून तरी दुसऱ्या कुणा पडद्यामागच्या व्यक्तीचा उल्लेख होत नाही हेही विशेष. 'नटवर्य केशवराव दाते' हे सर्वोत्कृष्ट अभिनयाच पारितोषिक या एकाकिकेतल्या नायिकेला मिळालय ही गोष्ट जरा कल्पनेबाहेरचीच होती. एकतर ती स्वतः त्या दृष्टीन अभिनयाची ऊची गाठू शकली नव्हती आणि दुसरं म्हणजे, चद्रशेखर फणसळकर आणि 'शिपान'ची नायिका सुरेखा महाडीक यानी अभिनयातल आपलं श्रेष्ठत्व तिच्यापेक्षा जास्त प्रमाणात सिद्ध केल होतं. सुरेखाच्या बाबतीत तिचा अभिनय बराच भडक वाटला असण्याची शक्यता आहे; पण ती तसं पहायला गेल तर एकांकिकेचीच गरज होती. मत्र-तंत्र करून स्वतःला मूल होण्यासाठी बळी देणाऱ्या एका देवऋषीची, बळीच रक्त पिणारी ही पत्नी. तिचा अभिनय फारसा सयमित असण अपेक्षितही नव्हतं. सुरेखानं हा अभिनय खूप समजून केल्याच जाणवलं. भूमिकेसाठी आवश्यक असणारा भडकपणा तिनं समर्थपणानं प्रगट केला पारितोषिका-बाबत तिच्यावर अन्याय झाल्याची रुखरुख अनेकाना लागून आहे, ही तिच्या यशाची पावतीच म्हणावी लागेल.

सपूर्ण एकाकिकेबद्दल बोलायचं तर भयानकता व्यक्त करण्यात, बऱ्याच प्रमाणात थरारून टाकण्यात ही एकाकिका यशस्वी झाली. प्रकाशयोजना आणि नेपथ्य याचा वाटा या साऱ्यात महत्त्वाचा.

या दोन्ही गोष्टीवर (प्रकाशयोजना व नेपथ्य) अवलबून न राहता प्रेक्षकाची मनं जिकून घेतलेली एकाकिका म्हणजे एम आय टी. ची 'फितूर तो चद्र' यातली प्रत्येक व्यक्ती पूर्णपणे 'फिट' होती. वगनाटय आणि प्रायोगिक या दोन्हीचा चागला सयोग यात साधलेला दिसला. सुरुवातीला सथ

चालणारी, फारशी आकर्षक न वाटणारी ही एकांकिका पुढे सतत टाळ्या घेत आणि प्रेक्षकांना स्वत:मध्ये गुंतवून घेत गेली. यातला प्रत्येकजण मोकळेपणाने वावरला आणि प्रेक्षकांची दाद घेऊन गेला हे विशेष. एकांकिकेतील दोन-तीन गाणी आणि स्त्री पात्रे मात्र निष्प्रभ ठरली. सूत्रधाराचं शांत आणि समजून केलेलं निवेदन आणि सामान्य माणसाचं काम करणाऱ्या विनय कुलकर्णीचा बोलका चेहरा या दोन्ही गोष्टी लक्षात रहाण्याजोग्या.

एकूणच संपूर्ण स्पर्धा पाहून जाणवलेल्या गोष्टी म्हणजे प्रेक्षकांना 'पहायला लावणे' यात बऱ्याच एकांकिका यशस्वी झाल्या; पण नाटकाचे 'असणे–दिसणे–देणे' यावर मात्र एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच दिग्दर्शक जाणीवपूर्वक विचार करताना दिसतात. प्रेक्षकांना 'पहायला लावण्यासाठी' सुद्धा रंग, रेषा आणि प्रकाश या अंगाचा वापर केला जातो. दृक्संवेदना जागी करताना शिल्पाच्या अंगाचा वापर करण्याची जाणीव असलेला एखादाच दिग्दर्शक सापडतो. काही नव्या जाणिवाही धूसरपणे का होईना व्यक्त होताना दिसतात. विषयातलं वैविध्य वाढतंय. काही नवी तंत्र वापरली जाताहेत.

एखाद्या सांघिक एकांकिकेच्या मोहात पडलेल्या दिग्दर्शकानं, अनुकरणाच्या मोहात पडून, 'गर्दीची कवायत' असंही स्वरुप एकांकिकेला दिलेलं दिसतं.

जुन्या नाट्यप्रकारांकडे वळण्याचाही कुणी प्रयत्न करताना दिसतात.

नक्कल आणि अभिनय यातला फरक कलाकारांना कळतोय असं जाणवतं; पण आपल्या प्रयोगाची मागणी आपल्या अभिनय शैलीचा, दिग्दर्शनशैलीचा प्रयोगावर होणारा परिणाम याचा विचार करणारे थोडेच आहेत. या कलाकारांचा, भरताच्या नाट्यशास्त्राचा अभ्यास असावा अशी अपेक्षा नाही, पण काही रंगभूमीशी संलग्न अशा मूलभूत महत्वाच्या गोष्टींचं प्राथमिक ज्ञान त्यांनी करून घेणं आवश्यक आहे.

त्याचप्रमाणं या स्पर्धेत शिरलेली व्यावसायिकता. नाव विद्यार्थी दिग्दर्शकाचं आणि खरा दिग्दर्शक कुणी वेगळाच. सध्यातरी या स्वरुपात मर्यादित असलेला हा प्रकार नंतर वाढला, तर स्पर्धेचा उद्देशही धोक्यात आणू शकतो या दृष्टीनं विचार होणंही आवश्यक आहे.

कोणत्याही बाबतीत स्वत:ला शहाणं समजून इतरांच्या चुका दाखवण्याचा हा प्रयत्न नाही– कारण ते काही फारसं अवघड नाही.

एका चांगल्या उद्देशानं सुरू केलेल्या या स्पर्धेचं स्वरूप नवीन, तरुण, महाविद्यालयीन रक्ताला आपलं अस्तित्व, प्रयोगशीलता आणि निर्मितोक्षमता व्यक्त करायला वाव देणारंच रहावं हीच इच्छा यामागे आहे. □


डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

**चार्ल्स डार्विन**

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशित

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

विज्ञान

# गॉयटर

मानवी शरीरातील ऊर्जा विनियोगाचे प्रमाण सतुलित ठेवण्यासाठी आयोडिनची शरीराला नितात आवश्यकता असते. मानवी शरीरामध्ये ज्या अनेक अंत स्त्राव ग्रथी असतात त्यापैकी थायरॉइड या कठस्थ ग्रथीमधील थायरॉक्झीन या स्त्रावामध्ये आयोडिन हा महत्त्वपूर्ण घटक असतो. मानवी शरीराची रोजची आयोडिनची गरज सुमारे ७५ मायक्रोग्रॅम्स इतकी असते व ती पूर्ण करण्यासाठी १०० ते १५० मायक्रोग्रॅम्स आयोडिन शरीरात जाणे आवश्यक असते आयोडिनची कमतरता निर्माण झाल्यामुळे थायरॉइड या कठस्थ ग्रथीची वाढ होऊन 'गॉयटर' या रोगाचा प्रादुर्भाव होतो. दिल्लीच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान सस्थेतील एन. कोचुपिलाई यानी भारतातील ग्वायटर पिडित प्रदेशाचा अभ्यास करून या रोगाच्या थैमानाकडे सर्वांचे लक्ष वेधले

भारतामध्ये किमान चार कोटी लोकाना आयोडिनच्या कमतरतेमुळे गॉयटर हा रोग झाला असून देशातील बारा कोटी जनता आयोडिनची कमतरता असणाऱ्या प्रदेशात राहते. हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या तराईच्या प्रदेशातील दहा जिल्ह्यात गॉयटरचे तीन कोटी रोगी आहेत. उत्तर प्रदेशच्या तराई विभागातील बरेक, बस्ती, गोंडा, देवरिया व गोरखपूर तसेच बिहारच्या तराई विभागातील दरभगा, पूर्व चपारण्य पश्चिम चपारण्य, सीतामढी व मुझफ्फरपूर हे ते दहा जिल्हे आहेत. भारतातील गॉयटर ग्रस्त पट्ट्यामध्ये हिमालयाच्या पायथ्यालगत असलेल्या जम्मू-काश्मीर, हिमाचलप्रदेश, पजाबमधील उत्तरेकडील दोन जिल्हे, पश्चिम बगालच्या उत्तर भागातील पाच जिल्हे, सिक्कीम, आसाम, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरा, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या प्रदेशांचासुद्धा समावेश होतो त्याशिवाय महाराष्ट्रातील औरगाबाद व जालना, गुजरातमधील भडोच व मध्यप्रदेशातील शाहडोल आणि सीधी या जिल्ह्यामध्ये गॉयटरचे प्रमाण चिंताजनक आहे.




आयोडिनच्या कमतरतेमुळे थायरॉइड ग्रथीवर जास्त ताण पडतो. आयोडिन निर्मितीच्या प्रयत्नामध्ये थायरॉइडची वाढ होऊ लागते व गळ्याजवळचा भाग सुजून फुगवटा निर्माण होतो शरीराची आयोडिनची गरज भागविण्यास थायरॉइड असमर्थ ठरल्यावर व्यक्ती सुस्त बनते रोग्याला थोडीशी थडीसुद्धा सहन होत नाही. स्नायूमध्ये शैथिल्य येते. मानसिक क्रियावर अनिष्ट परिणाम होऊन या क्रिया मदावतात. लहान मुलाना आयोडिनच्या कमतरतेमुळे मनोदौर्बल्य निर्माण होते शरीरातील लाबट हाडाची वाढ मदावते व त्यामुळे त्याची ऊंची वाढत नाही कित्येक वेळा मुलाची मानसिक वाढ कायमची थाबण्याचा धोका निर्माण होतो क्रेटिनिझम ही विकृती निर्माण होते क्रेटिन्स म्हणजे ठेंगू मुले अशा मुलाची उची कमी असते, चेहरा सुजल्यासारखा दिसतो कातडी जाडसर व खडबडीत बनते लैंगिक इद्रियाची वाढ होत नाही. त्याच्यापैकी अनेक मदबुद्धीची तर किंत्येक मुले मूक-बधीर बनतात

स्त्रियामध्ये आयोडिनच्या कमतरतेमुळे गॉयटरचा प्रादुर्भाव होतोच, पण त्याचबरोबर त्याच्या अपत्यावर अनिष्ट परिणाम होतात मातेमध्ये आयोडिनची कमतरता असल्यास मदबुद्धीची व विकृत मुले जन्माला येतात भारतात उत्तरप्रदेश व बिहारमधील गॉयटरग्रस्त दहा जिल्ह्यापैकी प्रत्येक जिल्ह्यात दर वर्षी जन्माला येणाऱ्या मुलापैकी पाच हजार मुले मानसिकदृष्ट्या कमकुवत व कायमची मतिमंद होण्याची शक्यता असते. या जिल्ह्यामध्ये दर दोन तासाला एक मतिमद मूल जन्माला येते. यावरून गॉयटरच्या भयंकर स्वरूपाची कल्पना येऊ शकेल.

थायरॉइड ग्रथी थायरॉक्झीनची निर्मिती करतात त्यासाठी थायरॉइड ग्रथीना आयोडिनची आवश्यकता असते. व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी आयोडिन आवश्यक असते. जीन फ्रँकाइस कॉइंडेट या स्विस शास्त्रज्ञाने इ स. १८२० मध्ये सर्वप्रथम गॉयटरवर उपाय म्हणून आयोडिनचा वापर सुरू केला. या उपचाराबद्दल प्रथम पासूनच अनेकांच्या मनात शका होती. त्यातच आयोडिनच्या जास्त वापराचे विपरित परिणाम दिसू लागले व गॉयटरवर आयोडिन वापरण्याबद्दल प्रतिकूल मत निर्माण झाले. इ स १८९५ मध्ये युजेन बोमन या सशोधकाने थायरॉइड ग्रथीमध्ये आयोडिन असते हे दाखवून दिले. क्लीव्हलँड, ओहिओच्या डेव्हीस मरीन या शास्त्रज्ञाने इ. स. १९०७ मध्ये केलेल्या सशोधनामुळे थायरॉइड ग्रथीची बेसुमार वाढ झाल्याने होणारा गॉयटर हा आयोडिनच्या कमतरतेमुळे उद्भवतो व त्यावर उपाय म्हणून आयोडिनचा वापर करणे आवश्यक आहे ही गोष्ट जगभर मान्य झाली. गॉयटरवरील उपचारामध्ये आयोडाइज्ड ऑइलची इजेक्शन्स दिली जातात. भारतातील गॉयटरग्रस्त भागात या प्रकारच्या उपचाराचा व्यापक कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. तरच पुढील अनर्थ टळू शकतील.

आयोडिनच्या कमतरतेमुळे थायरॉइडची बेसुमार वाढ होऊन काही वेळा वाजवीपेक्षा जास्त आयोडिन निर्माण होते व रोगी सतत नर्व्हस बनत जातो गळ्याजवळ मोठ्या प्रमाणावर सूज दिसू लागते व ती दिवसेंदिवस वाढत जाते

सागरी किनाऱ्यालगतच्या प्रदेशात आयोडिनची सहसा कमतरता आढळत नाही. किनाऱ्यालगतच्या प्रदेशातील वनस्पतीमध्येसुद्धा आयोडिनचा अश असतो सागरापासून दूर अतर्गत भागात मात्र आयोडिनची कमतरता असू शकते चीनच्या किनाऱ्यावर गॉयटरचा प्रादुर्भाव नाही, परतु अंतर्गत

भाग गॉयटरग्रस्त आहे. जपानमध्ये गॉयटरचा प्रादुर्भाव अजिबात आढळत नाही. जपानी लोकाच्या आहारात मासे, कालवे व इतर सागरी प्राण्याचा समावेश मोठ्या प्रमाणावर असतो सागरी प्राण्यामध्ये आयोडिनचे प्रमाण विपुल असते तथापि फोर्मोसा (तैवान), थायलड, सुमात्रा, जावा, बाली, बोर्निओ या बेटावर मात्र सागरी सान्निध्य असूनसुद्धा गॉयटरचे प्रमाण जास्त आढळते याचे कारण तेथील लोकाच्या आहारविषयक सवयीमध्ये सापडते हे लोक आहारामध्ये मासे व सागरी प्राणी याचा अभावानेच वापर करतात त्यामुळे सागरी सान्निध्य असूनसुद्धा त्याच्या शरीरास आयोडिनचा योग्य प्रमाणात पुरवठा होत नाही आहारामध्ये मासे व सागरी प्राणी याचा सढळ हस्ते वापर केल्यामुळे शरीराला आवश्यक त्या आयोडिनचा पुरवठा होतो सागरी किनाऱ्यालगतच्या प्रदेशात मत्स्याहारी लोकाना गॉयटरला तोड द्यावे लागत नाही ते यामुळेच सागरी किनाऱ्यापासून दूर अतर्गत भागात आहारात माशाचा समावेश नसल्यामुळे शरीराला होणारा आयोडिनचा पुरवठा कमी होतो व गॉयटरचा प्रादुर्भाव होतो.

मासे, कालवे व इतर जलचर प्राण्यामध्ये आयोडिनचे प्रमाण जास्त असते एक किलोग्रॅम गोड्या पाण्यातील माशामध्ये ३० मायक्रोग्रॅम्स आयोडिन असते खाडीतील माशामध्ये हेच प्रमाण ३३० मायक्रोग्रॅम्स असते तर समुद्रातील माशामध्ये आयोडिनचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे दर किलोग्रॅमला सुमारे ९०० मायक्रोग्रॅम्स, इतके असते. माशाच्या लिव्हरपासून काढलेल्या तेलामध्ये, विशेषत. कॉडलिव्हर ऑईलमध्ये याच्या दसपट आयोडिन असते. पुढील कोष्टकामध्ये, १०० मायक्रोग्रॅम आयोडिनची गरज भागविण्यासाठी विविध पदार्थ किती प्रमाणात खावेत याची आकडेवारी दिली आहे.

कोष्टक

१०० मायक्रोग्रॅम आयोडिन पुरविण्यासाठी आवश्यक खाद्यपदार्थांचे प्रमाण.

| | किलोग्रॅम्स |
|---|---|
| १. भाजीपाला | ५ |
| २. धान्य व शेंगा | ४ |
| ३. गोड्या पाण्यातले मासे | ३ |
| ४. दूध | २ |
| ५. अंडी | १ |
| ६. समुद्रातले मासे | ०.१५ |
| ७. कालवे व शिपले | ०.१० |

वरील कोष्टकावरून समुद्रातले मासे, कालवे, शिपले, झींगे इ. सागरी प्राण्याचा नियमितपणे आहारात वापर केल्यास शरीराला आवश्यक त्या प्रमाणात आयोडिनचा पुरवठा होऊन गॉयटरपासून सरक्षण मिळेल, ही गोष्ट लक्षात येण्यासारखी आहे मीठामध्येसुद्धा आयोडिनचा अश असतो परतु त्यासाठी मोठे खडे असलेले काळे मीठच वापरले पाहिजे. आपण पाढरेशुभ्र बारीक मीठ (टेबलसॉल्ट) आहारामध्ये सतत वापरत असतो व त्यायोगे शरीराला आयोडिन मिळू नये अशीच व्यवस्था करीत असतो. मीठ स्वच्छ पाढरे करण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यातील आयोडिन नष्ट होत असते.

—डॉ. सुभाषचंद्र सारंग

# पाश्चात्य देशातील अंधश्रद्धांच्या अंधारात

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

ट्रिस्केडेकाफोबिया या शब्दाचा अर्थ तुम्हाला माहीत आहे? याचा अर्थ आहे १३ या आकड्याची अनाठायी भीती. आपली सर्वांची अशी समजूत असते की पाश्चात्य राष्ट्रातील लोक म्हणजे सगळे विज्ञाननिष्ठा बाळगणारे, कर्मकाडात न गुतणारे, धर्माचे अवडबर न माजवणारे आणि क्षुद्र अधश्रद्धा न बाळगणारे. बहुताशी हे खरे असले तरी वेडगळ अधश्रद्धा बाळगण्याचा मक्ता केवळ भारतीयाकडे नाही हे या ट्रिस्का–का–काम–फोबिया वरून आपल्या लक्षात येईल.

पाश्चात्य राष्ट्रात सर्वात जास्त प्रचलित असणारा अधविश्वास म्हणजे १३ आकडा अपशकुनी मानण्याचा होय. त्यातल्या त्यात १३ तारीख आणि शुक्रवार एकत्र आले तर विचारायलाच नको! अनेक उंच इमारतीना तेरावा मजलाच नसतो. म्हणजे तो असतो, पण त्याला क्रमाक देतात चौदा कारण तेराव्या मजल्यावर जागा भाड्याने घ्यायलाच कोणी तयार होणार नाहीत. आल्प्या फ्रान्स देशात तुम्हाला १३ क्रमाकाचे घर आढळणार नाही, की कोणत्याही हॉटेलात १३ क्रमाकाची खोली आढळणार नाही. अनेक लोक तर मोटारीच्या क्रमाकातही १३ आकडा येणार नाही याची दक्षता घेतात

असे सागतात की येशू ख्रिस्ताच्या अतसमयीच्या भोजनाचे वेळी तो आणि त्याचे १२ शिष्य असे १३ जण तिथे होते तो शुक्रवार होता त्यातील एकाने द्रोह करून येशूस पकडून दिले तेव्हापासून या १३ आकड्याची लोकानी भीती घेतली पण एका ख्रिस्ती धर्मगुरूनी मला सागितले की, या प्रसगाचे आधीच्या काळातही १३ आकडा अशुभ मानत असल्याचे अनेक पुरावे आहेत

युरोपमधील सर्व धर्मनिष्ठ घरातून (आणि विश्वास ठेवा. अशी बरीच घरे आहेत) शुक्रवारी जेवणात मासे असतील कारण शुक्रवारी येशू ख्रिस्ताचे अतिम भोजनसमयी मासाचे पदार्थ होते त्यामुळे शुक्रवारी माससेवन वर्ज्य मानतात.

१६ व्या शतकातील फ्रेंच वैद्य आणि ज्योतिषी नॉस्ट्रॅडॅमसने वर्तवलेल्या 'अचूक' भविष्य कथनाबद्दल बऱ्याच जणाना उत्सुकता वाटते आपल्याकडील काही पुराणमतवादी वृत्तपत्रे नॉस्ट्रॅडॅमसच्या भविष्य कथनाचे वारेमाप कौतुक करत असतात; कारण 'विसाव्या शतकाच्या अखेरीस हिंदू धर्माचा प्रसार सर्वत्र होईल आणि त्याचे राज्य पृथ्वीवर पसरेल' असा अर्थ निघू शकणारे भाकित त्याने वर्तवले आहे म्हणे याच नॉस्ट्रॅडॅमसने असे स्पष्ट लिहून ठेवले होते की, सत जॉर्ज दिनाचे दिवशी शुभ शुक्रवार आला (२३ एप्रिल), सत मार्क दिनाला ईस्टरचा रविवार आला (२५ एप्रिल), जॉन द बाप्टिस्ट दिनी कॉर्पस ख्रिस्ती हा सण आला (२४ जून) तर जगाचा सर्वनाश होईल पण असे

योग १६६६, १७३४, १८८६ आणि १९४३ मध्ये आले होते, आणि जग तर आहे तिथेच आहे.

मात्र एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, पाश्चात्य लोक कुठल्याही विषयाचा परिपूर्ण अभ्यास करण्याचे बाबतीत परिपूर्ण असतात. 'अंधसमजुती, लोकभ्रम आणि गूढ शास्त्रे' यांची जागतिक पातळीवरची जंत्री करणारा कोष १९०३ मध्ये प्रसिद्ध झाला होता. या कोषाचे अनेक खंड होते आणि राजघराण्यापासून सामान्य रयतेपर्यंत हजारोंनी त्याला लेखणीभार लावला होता. १९७१ मध्ये अमेरिकेतील गेल रिसर्च कं तर्फे या ग्रंथाचे पुनर्मुद्रण प्रसिद्ध करण्यात आले आहे. ही जंत्री अ ते ज्ञ पर्यंत सहस्रावधी गोष्टींशी—प्राणी, पक्षी, फुले, सूर्य, तारे, फार काय आरसा, छत्री अशाशी संबंधित अशा अनेक अंध समजुतींनी उतू जात आहे. जन्म, प्रेमसंबंध, विवाह आणि मृत्यू या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टींचेबद्दल तर सहस्रावधी समजुती आहेत

आता नाकतोडयावरून भविष्य कळू शकते, आणि तो मारणे अशुभ असते, हे तुम्हाला ठाऊक तरी होते काय? कोणीही श्रद्धाळू वधू विवाहापूर्वी आपला खास पोषाख चाचणीदाखल देखील चढवणार नाही आणि तिच्या नियोजित वराचे देखत तर नाहीच नाही. शिवाय शनिवारसारख्या अपशकुनी दिवशीही ती लग्नाला उभी रहाणार नाही.

आपल्याकडे शोकवार्ता काळ्या चौकटीत देण्याची प्रथा आहे ती आपण पाश्चात्य वृत्तसृष्टीतूनच उचलली आहे तिथे अंत्यसंस्काराचे वेळी काळे कपडे वापरण्याची पद्धत आहे. त्यातून ती आली आहे. पण हे काळे कपडे तरी का वापरायचे तर सैतानाला गंडवण्याकरता! सैतान नवे नवे आत्मे शोधण्याच्या प्रयत्नातच असतो, पण त्याला काळा रंग मात्र दिसू शकत नाही! आहे की नाही युक्ती?

आकड्याच्या शुभाशुभ कलाचे १३ हे एकमेव उदाहरण नव्हे अनेकजण ३ हा आकडा शुभ मानतात तर इतर कोणी ७. विशेषत: जुगारी मंडळी अशा गोष्टींवर नितांत विश्वास बाळगणारी आढळतात.

मी एकदा नवीन गाडी घेतली तिची नोंदणी करण्याकरता वाहतुक कचेरीत गेलो होतो. तिथल्या कारकुनाने विचारले,'तुम्हाला काही विशिष्ट क्रमांक वगैरे पाहिजे काय? बरेच लोक त्याचा नशिबवान आकडा असणारा क्रमांक मागतात. 'मी उत्तरलो' 'तसे काहीही नाही. जो ओळीत असेल तो द्या. फार तर लक्षात ठेवायला सोपा असला तर बरे!'

'मग हा १७१० देऊ का? शून्य शेवटी असणारा नको असतो कोणाला अशुभ म्हणून त्यामुळे बरेच दिवस मोकळा राहिलाय!'

मी—'मग तर अवश्य द्या!' पुढे अनेक वर्षे मी मी ती गाडी वापरत होतो पण काहीही अशुभ घडले नाही.

१३ तारखेला आणि शुक्रवारी जहाजे सहसा प्रवासाला निघणार नाहीत. रात्री १२ वाजून १ मिनिटांनी निघतील. पण शुक्रवारी दिवसा नाही समुद्र प्रवासाचे बाबतीत अशा शेकडो अंध समजुती अद्याप प्रचलित आहेत राजघराण्यातील व्यक्ती जहाजावर असेल तर ते कधी बुडत नाही अशी दीर्घकाळ समजूत होती. आता प्रत्येक जहाजावर राजा कसा काय येऊ शकणार? मग राजमुद्रा असणारे नाणे डोलकाठीच्या तळाशी ठोकण्याचा प्रघात पडला. अद्यापही तो चालूच आहे असे नाणे ठोकलेल्या शेकडो नावा बुडाल्या तरी!

## विक्षिप्त समजुती

जहाजावर कोणी मृत झाल्यास त्याची शवपेटी समुद्रात सोडतात पण ती जहाजाच्या डाव्या बाजूकडून सोडणे अशुभ समजतात. फक्त प्राणी या बाजूने सोडले जातात अशाच काही विक्षिप्त समजूती—

समुद्रपक्षी जमिनीवर आल्यास हवामान वादळी होते

हाडाचे चूर्ण मद्यात मिसळून प्याले असता जुलाब बंद होतात

कडक थंडी पडली नसेल तर पुढे मृत्यूचे प्रमाण वाढते

वाटाणे सोलताना ९ वाटाणे असणारी शेंग सापडल्यास त्यातला एक दाणा डाव्या खांद्यावरून मागे टाकावा, म्हणजे नशीब फळफळते

न्याहारीच्या आधी गाणे गुणगुणल्यास रात्रीच्या आत रडण्याची पाळी येते

लाल व निळा रंग शुभ असतो

हेमलॉकचे झाड अशुभ असते. या उलट बर्चची फांदी दारावर टांगल्यास सैतानापासून घराचा बचाव होतो.

काही अपशकुनावर लगेच अक्सीर इलाजही सांगितले जातात उदा. मीठ सांडल्यास त्यातले चिमूटभर डाव्या खांद्यावरून मागे टाकावे

आरसा फुटल्यामुळे होणारा अपशकून फुटक्या आरशाचे काही तुकडे वहात्या पाण्यात टाकल्यास दूर होतो. अन्यथा ७ वर्षे वाईट जातात.

आता त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट अशी की ज्या गोष्टी काही देशात अशुभ मानतात त्या अन्यत्र शुभ मानतात. सफरचंदाच्या झाडाला अवेळी मोहोर आल्यास इंग्लंडमध्ये ते मृत्यूचे सूचक मानतात, तर बाकी युरोपात शुभलक्षण समजतात काळं मांजर उत्तर अमेरिकेत अगदी वाईट मानले जाते तर इतरत्र ते सुदैवाचे लक्षण मानतात. आजच्या आधुनिक युगातले अवकाशवीरदेखील पूर्वतयारीच्या वेळी काहीही अडचण उद्भवली नाही की ऐन उड्डाणाचे वेळी कसे होईल या काळजीत पडतात.

या समजुतीचे मूळ नाटयक्षेत्रातील जुन्या समजुतीमध्ये असावे रंगीत तालीम विनाअडथळा पार पडली तर खुद्द प्रयोगाचे वेळी फज्जा उडणारच अशी या मंडळीची खात्री असते फार काय प्रयोगापूर्वी कलाकारांना सुयश चिंतणेदेखील मना असते. शुक्रवारी नवीन नाटकाचा आरंभ करीत नाहीत. पहिल्या रांगेत चकणा प्रेक्षक असेल तर प्रयोग कोसळलाच म्हणून समजा—असे अनेक अंधसमज हे लोक श्रद्धेने पाळतात. पिवळा रंग अत्यंत अशुभ, रंगपटात काळे मांजर आल्यास शुभचिन्ह मात्र मांजर पूर्ण काळे पाहिजे. नेहमी उजवा मोजा व बूट प्रथम घालावा—हे आणखी काही समज.

बहुतेक कलाकार शकुनाची अंगठी, ताईत पेटी वगैरे वापरतात. तलुला बँकहेड ही सुप्रसिद्ध नटी जो कोणी जे सांगेल त्यावर विश्वास ठेवून त्या शकुनाच्या वस्तू जवळ बाळगत असे. तिच्या वडिलांनी दिलेला एक ससाचा पंजा अखेरपर्यंत तिच्याजवळ असे. आपणास भेटायला येणाऱ्याने प्रथम उजवा पाय खोलीत टाकून आत आले पाहिजे असा तिचा सक्त दंडक होता कुणी चुकून डावा पाय टाकून आलाच तर त्याला परत पाठवून

पुन्हा योग्य तन्हेने आत यावे लागे.

एक सुप्रसिद्ध टेनिस शिक्षकाने सांगितले होते की, एखादी रॅकेट, वा कोर्ट, वा शर्ट वा बॉल 'लकी' आहे असे मानण्यापर्यंत तुमच्या खेळाची पातळी कधीही खाली जाऊ देऊ नका. पण अनेक खेळाडू अशा समजुती बाळगून असतात

अर्थात याचा अर्थ भारतीयानी अशा समजुती बाळगणे समर्थनीय आहे असा नव्हे मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच असतो, त्यावर मात करून शास्त्रीय दृष्टीने विचार करण्यास शिकले पाहिजे.

अशा तन्हेने विचार करून असल्या किरकोळ अंध समजुतीनाच काय पण प्रचलित धर्म, धर्मपीठे, प्रार्थनामदिरे, धर्मोपाध्याय आणि साक्षात परमेश्वर यानाही विरोध करणारे अनेक विचारवत पाश्चात्य राष्ट्रात होऊन गेले आणि अद्यापही कार्यरत आहेत. वरील सर्व गोष्टी माणसाच्या विचारशक्तीवर अनावश्यक आणि अशास्त्रीय बंधने घालतात आणि समाजाला त्यापासून होणाऱ्या फायद्याच्या तुलनेने या धर्मसस्थामुळे होणारे तोटे जास्त असतात असे हे लोक मानतात. प. जर्मनीमधील फ्राईबुर्ग शहरातील बुटे लिस्टे या 'लोकशाही व निसर्गरक्षण' यासाठी झगडणाऱ्या सस्थेने गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात एक 'चर्चविरोधी सप्ताह' साजरा केला. त्याची जाहिरात म्हणून एक भित्तीपत्रक सर्वत्र लावण्यात आले होते त्यावर एका धर्मोपदेशकाचे व्यगचित्र होते. पण तेवढेही तिथल्या सनातनी मंडळीना न खपल्यामुळे त्यानी याविरुद्ध तक्रार केली आणि 'धार्मिक भावना दुखवून सार्वजनिक शाततेचा भग होईल अशी कृती केल्याबद्दल' या सस्थेच्या चौघा कार्यकर्त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागितली. हे भित्तीपत्रक लावायला बंदी करण्यात आली आहे. पण खटल्याचा निकाल लागलेला नाही. खोमेनी वृत्तीचे लोक फक्त मध्यपूर्वेतच असतात ही समजूत या हकीगतीने खोटी ठरते.

## ख्रिश्चन सायन्स

इथे फक्त धार्मिक भावनाचा प्रश्न होता. धार्मिक अधश्रद्धाना बळी पडून प्रत्यक्ष आपल्या मुलाचा प्राण गेला तरी त्याचे समर्थन करणारी मडळी असतात आणि तीही अमेरिकेत यावर तुमचा विश्वास बसेल काय? देवताना सतुष्ट करण्याकरता मुलाचा बळी देणे, भूतबाधा झाली आहे असे समजून बेदम मारहाण करणे, सर्पदश वा कावीळ झाली असता शास्त्रीय उपचार न करता मांत्रिकाकडे जाणे या अधश्रद्धामुळे भारतात दरवर्षी शेकडो निरपराध जीव प्राण गमावतात, पण हीच गोष्ट अमेरिकेतही चालते आणि दैवदुर्विलास म्हणजे या अत्यंत अशास्त्रीय पद्धतीचा अवलब करणाऱ्या धर्मपथाचे नाव आहे 'ख्रिश्चन सायन्स'! त्याचे असे झाले की, मेरी बेकर एडी या नावाची स्त्री १८६६ मध्ये जबर आजारी पडली. नेहमीच्या उपचाराने तिला बरं वाटले नाही, मात्र नव्या करारातील येशूने बऱ्या केलेल्या रुग्णाईताच्या हकिगती वाचून तिला बरे वाटले या अनुभवावर आधारित 'शास्त्र आणि आरोग्य' हे तिने १८७५ मध्ये प्रसिद्ध केलेले पुस्तक या पथीयाचा धर्मग्रंथ बनले. 'श्रद्धाचिकित्सा' (Faith Healing) हा या पथीयाचा आग्रह असतो 'ख्रिश्चन सायन्स मॉनिटर' हे या पंथाचे मुखपत्र याच एडीबाईनी सुरू केले

आता कोणी वयात आलेला नागरिक माझा 'श्रद्धा चिकित्सेवर' विश्वास आहे असे सागून आजारीपणात वैद्यकीय उपचार नाकारू लागला तर कायद्याने त्याला औषधोपचार घेण्याची सक्ती करता येणार नाही. पण एकाद्या लहान बालकाला काही रोग झाला, किंवा अपघात झाला आणि त्याचे या पथाचे पालक त्याला आम्ही श्रद्धा-चिकित्सेने बरे करू असे म्हणून आधुनिक उपचार नाकारू लागले तर काय करायचे? काही वर्षापूर्वी 'सेव्हन्थ डे ॲडव्हेंटिस्ट' पथाच्या एका जोडप्याने आपल्या धर्मश्रद्धाना बाधा येते या कारणास्तव आपल्या मुलाला जीव वाचण्यासाठी आवश्यक असणारे रक्त भरू देण्यास नकार दिला होता आणि रुग्णालयाच्या अधिकाऱ्याना न्यायालयात धाव घेऊन आईवडलाच्या इच्छेविरुद्ध रक्तदान करण्याचा हुकूम मिळवावा लागला होता. पण अमेरिकेतीलच काही राज्यातील कायद्यातच अशा तरतुदी आहेत की, न्यायालयानाही असे निकाल देऊन अधधर्मश्रद्धाळूच्या मुलाना वाचवता येणार नाही.

मुलाना निष्काळजीपणाने वागवणे वा त्रास देणे (Child Abuse) याविरुद्ध अमेरिकेत कायदे आहेत. मात्र ओहायओ राज्यातील या कायद्यात एक सूट दिलेली आहे 'मान्यवर अशा धर्मप्रणालीचे तत्त्वानुसार, जर एकाद्या बालकाला, वैद्यकीय चिकित्सेऐवजी, प्रार्थनेद्वारे किंवा अध्यात्मिक चिकित्सेद्वारे उपचार केले जात असतील, तर ते या कायद्यातील कोणत्याही कलमानुसार दुर्लक्षित किंवा दुरुपचारित बालक मानले जाणार नाही'

हे कलम रद्द करण्याचा एक प्रयत्न १९८४ मध्ये करण्यात आला पण ख्रिश्चन सायन्स पथाच्या ताकदवान गटाने तो हाणून पाडला. अमेरिकन घटनेने दिलेल्या धर्म स्वातंत्र्यावर गदा आणणारे हे कृत्य होईल असा त्याचा दावा होता. पण धर्मस्वातंत्र्य म्हणजे एकाद्या निष्पाप बालकाचे प्राण घेण्याचे स्वातंत्र्य नव्हे, आणि राज्यव्यवस्था आणि धर्मव्यवस्था याची पूर्ण फारकत असणाऱ्या अमेरिकन घटनेनुसार अशा तन्हेने एकाद्या धर्माच्या अनुयायाना सर्वसामान्य कायद्यातून सवलत देणे हेच घटनाबाह्य आहे, असा युक्तिवाद करून या कलमाविरुद्ध अमेरिकन नास्तिक मचाने पुन्हा लढा उभारला आहे. पाहू त्याचा काय निकाल होतो ते □


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा

मला निसटलंच पाहिजे!

अनुवाद : श्रीकात लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

## प्रकाशित झाले

वयात येण्याचे दिवस म्हणजे मुलीच्या आयुष्यातले सर्वात नाजुक दिवस. या दिवसात तिच्या शरीरात तर नाना घडामोडी होतातच, पण तिचं मनही नवा आकार घेतं. समाजाच्या तिच्याकडून अपेक्षा बदलतात. एकाच वेळी या अनेक बदलांना तिनं सामोरं कसं जावं हे सांगणारं म्हणजेच ' यौवनाचा अर्थ ' सांगणारं पुस्तक.

॥ वयात येताना ॥

## ॥ वयात येताना ॥

# ॥ वयात येताना ॥

**मंगला गोडबोले**
**डॉ. वैजयंती खानविलकर**

भरपूर रेखाचित्रे, उत्कृष्ट कव्हर, **किंमत रु. २५**
२५ रु. मनीऑर्डर / ड्राफ्टने पाठविल्यास
पुस्तक पोस्टाने घरपोच येईल.

## राजहंस प्रकाशन

| | |
|---|---|
| १०२५ सदाशिव पेठ | C/o श्री. वा. र. गोडे |
| नागनाथ पाराजवळ | ४१ भवानीशंकर रोड |
| पुणे ४११०३० | जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर |
| | दादर (प.) मुंबई ४०० ०२८ |
| दूरध्वनी : ४४३४५९ | दूरध्वनी : ४२२५४५५ |